म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : ...११२५...........
दा.क्र. : २९८२५

IRBK-0121825

# कार्टी प्रेमात पडली

रत्नाकर मतकरी

IRBK-0121825

मॅजेस्टिक
प्रकाशन

# कार्टी प्रेमात पडली

रत्नाकर मतकरी

IRBK-0121825

मॅजेस्टिक प्रकाशन

आवृत्ती पहिली :
ऑगस्ट १९८६

© सौ. प्रतिमा मतकरी
राधा निवास,
टिळक रोड, मुंबई ४०००१४.

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
२१६, प्रसाद चेंबर्स, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०.

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : २० रुपये

लक्ष्मीकांत बेर्डे,
विजय कदम
आणि अजय वढावकर

या तरुण विनोदवीरांना-

DRM No. 661/85

प्रयोगापूर्वी खालील पत्त्यावरून अनुमती घेणे आवश्यक.

सौ प्रतिभा मतकरी,

राधा निवास, टिळक रोड, दादर, मुंबई ४०० ०१४.

'कार्टी प्रेमात पडली' या नाटकाचा पहिला प्रयोग माऊली प्रॉडक्शन्सतर्फे दि. ११ ऑगस्ट, १९८५ रोजी सकाळी ११ वाजता, रंगायतन, ठाणे येथे झाला.

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शक | : | दामू केंकरे |
| नेपथ्य | : | सखाराम भावे |
| रंगभूषा | : | प्रदीप आणि चंदू |
| वेशभूषा | : | श्रीकांत धोंगडे |
| ध्वनी | : | नितिन सुखठणकर |
| प्रकाश-योजना | : | कृष्ण दासरी |
| रंगमंच-व्यवस्था | : | अशोक पराडकर, परशुराम कुंभार आणि राजू |
| छायाचित्रे | : | नंदू कुबल |
| निर्मिती | : | उदय धुरत |
| सूत्रधार | : | प्रमोद धुरत |

भूमिका (प्रवेशानुक्रमे):

| | | |
|---|---|---|
| गजा | : | अजय वढावकर/विश्वास जोशी |
| लोकनाथ लुकतुके | : | लक्ष्मीकांत बेर्डे |
| सदू टेकाडे | : | विजय कदम/वामन केन्द्रे |
| आप्पाराव वाडकर | : | दामू केंकरे |
| इन्स्पेक्टर धोंड | : | जयवंत वाडकर |
| सोनाली | : | वर्षा उसगावकर/सुप्रिया मतकरी |
| रविकिरण रत्नपारखी | : | चेतन दळवी/विश्वास जोशी |
| चंद्रिकाबाई | : | मनोरमा वागळे |
| ब्रह्मकुमारी | : | रागिणी सामंत |
| माला | : | अंजली वळसंगकर |

# निवेदन

'कार्टी प्रेमात पडली' या नाटकाला, सुप्रसिद्ध विनोदी लेखक पी. जी. वुडहाऊस यांच्या, जगभरच्या असंख्य वाचकांना विलक्षण आवडलेल्या, 'दि स्मॉल बॅचेलर' या कादंबरीचा आधार आहे.

नाव जरी 'बॅचेलर'वरून दिलेले असले, तरी या कादंबरीत सगळ्याच पात्रांना जवळजवळ सारखेच महत्त्व आहे. नाटकाला अधिक सुसूत्रता यावी, म्हणून मी लोकनाथ लुकतुके आणि त्याचे परोपकार यांच्यावर थोडा अधिक भर दिला आहे.

नामकरणाचे श्रेय निर्मात्यांना आहे.

— रत्नाकर मतकरी

## रत्नाकर मतकरी यांची इतर विनोदी नाटके

| | |
|---|---|
| ब्रह्महत्या | १९६७ |
| विच्छाडबाजलं | १९७२ |
| अजून यौवनात मी | १९७९ |
| चि. सौ. कां. चंपा गोवेकर | १९८१ |
| वटवट सावित्री | १९८५ |

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र... नों. दि ........
दि. ................ क्र. ................

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ महालक्ष्मीच्या ‘ चंपूताई सदन ’ या जुन्या पाच मजली इमारतीच्या पाचव्या मजल्यावरचा एक छोटासा फ्लॅट. जिला दिवाणखाना म्हणता येईल, अशी एक छोटीशी खोली. तिच्या पलीकडे तिच्याहूनही लहान अशी एक बेडरूम. एक सूक्ष्म किचन आणि बाथरूम–टॉयलेट, अशी या फ्लॅटच्या तुटपुंज्या जागेची वाटणी केलेली. बाहेरचा दरवाजा आणि आतल्या खोलीचा दरवाजा हे दोन्ही आपल्याला दिसतात. स्वयंपाकघर बाथरूम, इत्यादींकडे जाणारा एक पॅसेज. समोरच दोन मोठ्या खिडक्या. एक मोठा आणि एक छोटा–असे केनचे दोन दिवाण, आणि आणखी एक दोन मोठे मोढे, असं त्या मानानं स्वस्तात मिळणारं, पण कलात्मक फर्निचर.

भिंतीवर एक मॉडर्न आर्टचं, खोलीच्या मानानं प्रचंड चित्र. दोन सॉफ्टबोर्डस्. त्यांच्यावर असंख्य चित्रं, फोटो, कात्रणं इत्यादी चिकटवलेली. कोपऱ्यात एक टेबल. टेबलवर हँगिंग लॅम्प. तोही केनचाच. खोलीच्या भिंतीवर आणखी एक दिवा.

टेबल, सोफा आणि जमिनीवर सुद्धा पुस्तकं, ड्रॉइंग पेपरच्या सुरळ्या, अर्धवट रंगवलेली चित्रं, रंगाचं सामान इत्यादींचे वेडेवाकडे ढीग. त्यातच सिगारेटची पाकिटं, राख हीही पडलेली. एकंदरीत खोली अत्यंत अव्यवस्थित. पाहिल्याबरोबरच कळतं, की इथं एक अविवाहित कलावंत राहतो.

पडदा उघडताक्षणी दिसतो, तो वरकामाचा माणूस गजा. हा विलक्षण हास्यास्पद रीतीनं खोलीची आवराआवर करीत आहे. म्हणजे एक दिवाण रिकामा करण्यासाठी तिथल्या वस्तू दुसऱ्या दिवाणावर टाकणं, दुसऱ्या दिवाणावरच्या वस्तू खाली फेकणं, जमिनीवर एक मोठा ढीग करून त्यावर रंगीत चादर घालून तो नजरेआड करणं वगैरे. हे चाललेलं असताना भसाड्या आवाजात कुठलंतरी हिंदी सिनेमातलं लोकप्रिय गाणं तो म्हणत आहे आणि शक्यतो गाण्याच्या तालातच

सामानाची फेकाफेक करीत आहे.
गजा सुमारे तिशीचा. वर्णानं काळा. थोडा रासवट, पण एकूण लाघवी. खोलीचं तो जे काय करीत आहे, ते करता करताच त्याला एक वर्तमान-पत्र सापडतं. तो ते पसरून वाचू लागतो. अचानक त्याच्या नजरेला पडलेल्या एका गोष्टीनं तो आश्चर्यचकित. ]

गजा : च्या आयला ! ( परत लक्षपूर्वक वाचू लागतो. ) सुखी संसाराचा मार्ग लुकतुक्यांच्या दारावरून जातो....शंभर टक्के यशासाठी भेटा...प्राध्यापक लोकनाथ लुकतुके ! काही काळजी आहे ? चिंता आहे ? पंचाईत आहे ? (स्वतःशीच) अरे, होय ना ! म्हणून काय जीव द्यायचाय् का ? ( वाचीत ) मग त्यासाठी भेटा : प्राध्यापक लोकनाथ लुकतुके : चंपूताई सदन, गच्चीतली खोली. महालक्ष्मी, मुंबई. च्याआयला....म्हंजे इथलाच पत्ता की ! हाय काय हे नस्तर ?

[ दारावरची बेल वाजते. गजा दार उघडतो. एक पस्तिशीचा लंबाचौडा गृहस्थ काखोटीला दोन–चार पाट्या आणि हातात पॅड वगैरेसारखी थोडी स्टेशनरी घेऊन आत घुमतो. त्यानं छोटी टोकदार दाढी ठेवलेली. डोळ्यांवर चश्मा. एकूण हालचालींत काहीसा तऱ्हेवाईकपणा. ]

गजा : शंभर वर्षं आयुष्य आहे, प्राध्यापक लोकनाथ लुकतुके ! आत्ता तुमचीच जाहिरात वाचत होतो !

[ लोकनाथ त्याच्याकडे लक्ष न देता भिंतीवर पाट्या लावू लागतो. 'लग्न करताना दहा वेळा विचार करा ', ' विचार नेमक्या शब्दांत मांडा ', ' थिंक थ्राइस ', ' नको त्या गोष्टी करण्यापेक्षा स्वस्थ बसा '... इत्यादी मजकूर पाट्यांवर. पाट्या लावून झाल्यावर लोकनाथ टेबलवरची पुस्तकं ढकलून थोडी जागा तयार करतो व तिथे स्टेशनरी मांडतो. ]

गजा : च्याआयला ! साहेब, तुम्ही इथं आमच्या घरात तुमचं ऑफिसच थाटलं की.

लोकनाथ : थोड्या दिवसांपुरतं ! एकदा हा धंदा जोरात चालायला लागला, की नरीमन पॉइंटला काढतो, की नाही बघ, ऑफिस. तुझ्या सदूशेठच्या या गच्चीतल्या टीचभर खोलीला मग विचारतो कोण !

गजा : तुम्ही विचारलंय् सदूशेठना !

लोकनाथ : विचारायला कशाला हवं ! सदू माझा एकदम जीवश्च कंठश्च मित्र. मी आणि तो दोन का आहोत ? माझं घर, ते त्याचं घर. त्याचं घर, ते माझं....

गजा : ऑफिस...

लोकनाथ : 'चुकते कुठे ?' मालिकेतल्या माझ्या 'घराच्या जागेचा वापर' ह्या चव्वेचाळिसाव्या पुस्तिकेत मी म्हटलय् ना, गजा, ते वाच तू... आपल्या जागेचा वापर करायला मित्रांना कधीही मनाई करू नका !

गजा : नाही करीत. ( आवराआवर करण्याचे काम पुन्हा चालू करतो. )

लोकनाथ : तू आवरतोय्स, की पसारा करतोय्स, गजा ? आणि किती अनावश्यक हालचाली करतोय्स ? ती माझी 'घराची शोभा' पुस्तिका क्रमांक चौसष्ट वाच, म्हंजे तुझे श्रम आणि वेळ वाया जाणार नाहीत.

गजा : आणि पुस्तका वाचण्यात वाया जातील, ते...?

लोकनाथ : उर्मटपणा करू नकोस....जा...सद्याला उठव. म्हणावं, आठ वाजून गेले. नेहमी सकाळी उठून मोकळ्या हवेत फिरून यावं...हजारदा सांगितलं, तरी लोळत पडतो, डुकरासारखा. जा....उठव त्याला.

गजा : नाही येणार उठवता ..

लोकनाथ : का नाही येणार ?

गजा : कारण सदूशेठ घरात नाहीत. सकाळीच उठून बाहेर गेले...मोकळ्या हवेत फिरून यायला.

लोकनाथ : काय ? सांगतोस काय ? सदू आणि फिरायला ! कधीपासून जायला लागला ?

गजा : गेला, आठवडाभर रोज जातात.

लोकनाथ : आणि परत कधी येतो ?

गजा : कधी दहा मिनिटांत येतात, तर कधी दुपारपर्यंत येत नाहीत. ते सगळं त्या पोरीवर अवलंबून.

लोकनाथ : म्हंजे ? पोरीबरोबर जातो ?

गजा : बरोबर जाण्याइतकं नाही जमलेलं. नुसतं लाईन मारणंच चाललंय्.

लोकनाथ : शुद्ध बोल, गजा. शुद्ध बोल. वाच, वाच ती पाटी—नेहमी नेमके शब्द वापरावेत.

गजा : लाईन मारणं हेच नेमके शब्द आहेत. या अर्थाचे, याहून नेमके शब्द तुम्हांला माहीत असले, तर सांगा.

लोकनाथ : अरे, पण हा करतो काय ? ते तर सांगशील ?

गजा : रोज चिकने चिकने कपडे घालून....

लोकनाथ : (ऐकवत नसल्याप्रमाणे) भयंकर–भयंकर आहे तुझी भाषा ! चिकने चिकने म्हंजे चांगले कपडे, असं म्हणायचंय् का तुला !

गजा : तेच ते ! त्यावरून बघा, मी अचूक तोडली.

लोकनाथ : काय तोडली ? हां–म्हंजे अंदाज केला.

गजा : का काय तरी चौऱ्यायूशी पंच्यायूशी आहे !

लोकनाथ : चौऱ्यायूशी पंच्यायूशी, म्हंजे...पोरींची भानगड ?

गजा : म्हणून एके दिवशी सुममध्ये त्याच्या पाठीमागून गेलो. तर हे आपले एका घरासमोर ध्यान लावून उभे...त्या घरातनं एक सोंगटी बाहेर पडली.

लोकनाथ : सुम काय...सोंगटी काय लाईन काय...मी सांगतो, गजा, तुला... माझी शुद्ध भाषेवरची पुस्तका वाच, नाहीतर तुझ्याशी नुसत बोलूनसुद्धा माझी मराठी बिघडायची लाईन....(जीभ चावून) आपलं, माझं मराठी...

गजा : पुढं ऐका तर ती परडी पुढं आणि हे असे इंजिनासारखे फासफुस सुस्कारे सोडीत तिच्या मागं....

लोकनाथ : सांगतोस काय ?

गजा : आई शप्पथ ! गेला आठवडाभर रोज हा प्रकार चाललाय्. ते मागं... ती पुढं....ते मागं ! ती पुढं ! ते मागं...त्यांच्या पाठोपाठ मी...त्यांच्या पाळतीवर....

लोकनाथ : भयंकर लक्षणं ! इंजिनासारखे सुस्कारे म्हजे....

गजा : फास फुस...फास फुस असे....

लोकनाथ : म्हंजे नक्की हा प्रेमात पडलाय् ! आहे कोण ही सोंगटी ? आपलं.... मुलगी !

गजा : कोण आहे, कोण जाणे ! पण दिसायला मात्र, एकदम का ऽ च !

लोकनाथ : ( हैराण होऊन ) अरे, पण काऽच म्हजे काय ! गोरी, का उंच ! का ठेंगणी !

गजा : उंच नाय नि ठेंगणी नाय ! एकदम गरा आहे बघा, गरा !

लोकनाथ : गजा ! पुन्हा कधी माणसासारख्या माणसाचा उल्लेख गरा म्हणून केलास ना, तर तुला...

[ लॅच–कीने दरवाजा उघडून सदू टेकाडे आत येतो. पंचविशीचा, काहीसा लाजरा, अधूनमधून गोंधळणारा असा तरुण. अंगात सकाळी धावायला जाण्याचा पोशाख. शॉर्ट पॅण्ट, पुलोव्हर, पायांत कॅनव्हासचे शूज्, असा. ]

लोकनाथ : बरा आलास ! सदू, हा गजा तुझ्याविषयी हे काय सांगतोय्, ते खरं आहे ?

सदू : वाईट सांगत असला, तर खोटं आहे. चांगलं सांगत असला, तर खरं आहे.

लोकनाथ : तो म्हणतो, तू प्रेमात पडलाय्स !

गजा : मुळीच नाही. मी नुसतं म्हटलं, की सदूशेठ इंजिनासारखे फासफुस...

लोकनाथ : ( त्याला हातानं गप्प बसवीत ) मी काय विचारतोय् ? तू प्रेमात पडलाय्स, हे खरं आहे, की खोटं !

सदू : म्हंजे तसं अजून–मला नीटसं काही समजत नाहीये, रे ! कसं होतं प्रेमात पडलं, की !

लोकनाथ : मला विचारू नकोस. मी असला मूर्खपणा जन्मात करणार नाही. 'चुकते कुठे ?' क्रमांक चाळीस वाचलीस ? 'लग्न करावे कसे....?'

गजा : ( मध्येच ) कसे ?

लोकनाथ : डोके वापरून ! प्रेमात पडून नव्हे ! तुला माहीतेय्, सदू, फक्त डोक्यानं अधू असलेली माणसंच प्रेमात पडतात...

सदू : ( रागावून ) म्हंजे मी डोक्यानं अधू !

लोकनाथ : नाहीतर काय ! जिचं नाव–गाव माहीत नाही, जी तुझ्याशी अजून दोन शब्द बोलली नाही–अशा काचेच्या– आपलं...मुलीच्या तू प्रेमात पडलास !

सदू : ए हे....ए हे....! तू मला इतका काही अगदी हा समजू नकोस हां. तसे दोन शब्द बोलली ती माझ्याशी...आज सकाळीच !

गजा : (उत्साहाने) त्याचं काय झालं...तिच्याबरोबर तिचा कुत्रा होता ना... तो एकदम तिच्या हाताला हिसडा देऊन पळत सुटला ! तशी सदूशेठ त्याच्यामागं धावले आणि तेवढ्यात एक स्कूटर आली...तिला चुकवून...

[ सदू थक्क होऊन त्याच्याकडे पाहत राहिलेला... ]

सदू : तुला काय माहीत !

लोकनाथ : तो तुझ्या पाळतीवर असतो !

सदू : गजा साल्या, तेरी ये हिम्मत ! कमीने कुत्ते...

गजा : (आत पळत) मी तुमच्यासाठी चहा ठेवलाय्– घेऊन येतो....

लोकनाथ : मग पुढं काय झालं...!

सदू : मी तिला तिचा कमीना कुत्ता–आपलं कुत्रा परत आणून दिला. तेव्हा ती इतकं गोड हसली ! अणि माझ्याशी दोन शब्द बोलली. काय म्हणाली, माहीतेय् ?

लोकनाथ : थँक यू !

सदू : आं ? – तुला कसं कळलं ?

लोकनाथ : वाटलं काय ! मी लोकनाथ लुकतुके आहे !

[ गजा चहाचे दोन कप घेऊन येतो. ]

गजा : सदूशेठ, लुकतुक्यांनी बघा, आपल्याकडे दुकान काढलंय्.

सदू : दुकान ? (पाट्यांकडे लक्ष जाऊन) खरंच ! काय, आहे काय हा प्रकार ?

लोकनाथ : दुकान नाही, रे बाबा ! कन्सल्टन्सी आहे !

सदू : म्हंजे हा तुझा नवीन उद्योग दिसतोय् ! लेका लोक्या, तू आयुष्यात सेटल तरी कधी होणार ? शाईच्या पुड्या बनवण्यापासून ते बायकांसाठी वर्तमानपत्र काढण्यापर्यंत सगळे उद्योग तू आजवर केलेस !

लोकनाथ : पण हा उद्योग फायनल ! सदू, मला बघ.... (गहिवरून) या कामात

स्वतःचा सूर सापडलाय्! आजवर 'चुकते कुठे' मालिकेत सत्त्याहत्तर पुस्तिका लिहूनही मला माझं चुकतं कुठं, हे समजलं नव्हतं!

सदू : आता समजलं!

लोकनाथ : अरे, आजवर माझ्या गाठी इतका अनुभव जमा झालाय्! त्याचा फायदा मी जगाला का देऊ नये? आज जगात माणसांसमोर इतक्या समस्या आहेत– आपण थोडीशी फी घेऊन त्यांना मार्गदर्शन का करू नये! आपलं पोट जाळताना मानव जातीचं जमेल तेवढं कल्याण का करू नये!

गजा : साहेबांनी तशी जाहिरात दिलीय् पेपरात.

लोकनाथ : (फेरीवाल्यासारखं भराभरा बोलत) त्वरा करा...त्वरा करा....तुमच्या अडचणींचा, तुमच्या चिंतेचा, तुमच्या काळजीचा, तुमच्या संकटाचा, एकदाचा सोक्षमोक्ष लावून टाका. तुमचा नवरा तुम्हांला नांदवत नाही? तुमची बायको पैसे उधळते....? तुमचा डावा डोळा लवतो? तुमचा घरमालक नोटिस पाठवतो! तुमचे पाव्हणे जात नाहीत? छत्तीस व्याधींवर एकच उपाय – आजच संपर्क साधा – सत्त्याहत्तर पुस्तिकांचे आंतरराष्ट्रीय लेखक-प्राध्यापक लोकनाथ लुकतुके....भेटाल, तर सुटाल! चुकाल, तर सुखाला मुकाल! सुखाचा मार्ग–

गजा : हा असा– आपल्याच घरावरून जातो, बरं का, साहेब!

[ चहाचे कप उचलून किचनमध्ये जातो. ]

सदू : लोकनाथ, भलतीच थोर आणि उदात्त आहे तुझी कन्सल्टन्सी! अद्यानं महिनाभरात निदान अर्धी तरी मुंबई सुखी आणि संकटमुक्त होणार, यात शंका नाही. तुझ्या कन्सल्टन्सीचं पहिलं गिऱ्हाईक–मिस्टर सदू टेकाडे! म्हंजे मीच! काहीही कर, लोक्या! आणि माझं त्या मुलीशी जुळवून दे....!

लोकनाथ : सदू– प्रेमात पडणं हा शुद्ध आचरटपणा आणि व्यवहारशून्यतेचा कळस आहे. पण तू गिऱ्हाईक म्हणून आल्यानंतर तुझी अडचण दूर करणं हे माझं काम आहे. ओ. के. आय् टेक युवर केस इन हॅण्ड! पाहतो, तुझं जुळवून देता येईल का!

सदू : ग्रे....ट! लोकनाथ, तुझे उपकार मी जन्मात....

[ दारावरची बेल वाजते. गजा जाऊन दार उघडतो. दारात एक पन्नाशी उलटलेले गृहस्थ. गळ्याला मफलर, अंगात धोतर, लांब डगला आणि डोक्यावर हॅट ! हातात काठी. हा गृहस्थ शुद्ध बोलतानाही कोकणी हेलानं बोलतो. आणि कधी कधी तर तो पूर्ण मालवणीच बोलतो. ]

गृहस्थ : ते सुखाचा मार्गवाले...इथंच राहतात का ?

गजा : राहतात शेजारच्या बिल्डिंगमध्ये. पण ऑफिस आमच्याकडे काढलंय् त्यांनी ! या ना, आत या.

सदू : काँग्रॅच्युलेशन्स, लोकनाथ. तुझं दुसरं गिऱ्हाईक आलेलं दिसतंय्. मी जातो आत !

[ बेडरूममध्ये जातो. गजा गृहस्थांना घेऊन आत येतो. ]

गजा : ( लोकनाथचा निर्देश करून ) हे ते मार्गवाले. ( घरात जातो. )

गृहस्थ : माझं नाव – काय बरं – माझ्या नीटशी लक्षात राहत नाहीत नावं.

लोकनाथ : स्वतःचं नाव सुद्धा !

गृहस्थ : स्वतःचं नाव तसं आठवतं....पण जरा वेळ लागतो. हां–आठवलं. मी आप्पाराव वाडकर. म्हंजे सावंतवाडीचे आम्ही, म्हणून वाडकर. जुनं सरदार घराणं आमचं. कुठून दुर्बुद्धी झाली, आणि कोकणातून मुंबईत आलो ! ( मध्येच मालवणीत ) शिरा मार या मुंबैक् !

लोकनाथ : ( दचकून ) आं !...हां, पण तुमचा प्रॉब्लेम काय आहे, ते जरा स्पष्ट कराल का ?

आप्पाराव : काय म्हणालात ? हां...प्रॉब्लेम ! म्हंजे त्याचं काय आहे, प्रोफेसरसाहेब, माणसाकडे सोताचो पैसो होयो. बायलेच्या ओंजळेन् पाणी पिऊक् लागाक् नको.

लोकनाथ : तुम्ही जरा शुद्ध मराठीत बोलाल का !

आप्पाराव : बोलतंय् ना–बोलतंय्, हां....तर काय सांगत होतो ? एकेकाळचे आम्ही भलते श्रीमंत ! माझ्या आजोबांनी आजीला पन्नास हजाराला विकत घेतली...

लोकनाथ : आजीला पन्नास हजाराला विकत घेतली !

आप्पाराव : माळ हो, खऱ्या रत्नांची. आजीला पन्नास हजाराला रत्नांची माळ विकत घेतली. एवढे आम्ही श्रीमंत होतो. आज तीन लाख तरी किंमत असेल तिची. कोणाची ! माळेची. पुढं ती गेली.

लोकनाथ : माळ गेली ? अरेरे !

आप्पाराव : माळ नाही, हो ! आजी गेली.

लोकनाथ : हां, मग हरकत नाही.

आप्पाराव : माळ राहिली, बाकी सगळी इस्टेट वाडवडिलांनी चैनीत घालवली. आता ती माळसुद्धा सोनालीला... सोनाली म्हंजे माझी मुलगी, तर ती माळ सोनालीला लग्नात द्यायची, अशी तिच्या आईची शेवटची इच्छा.

लोकनाथ : शेवटची–म्हंजे त्या ...? पण आत्ता तर म्हणालात, की बायकोच्या ओंजळीनं...

आप्पाराव : ती दुसरी. अंहं–ही दुसरी ! आमच्या घराण्याचं नाव मोठं, म्हणून श्रीमंताची मुलगी मिळाली. पण काम भारी आहे, माझ्या हातात पैसे नायत्–म्हणून मुठीत ठेवायला बघते मला ! त्याकरता तुमची जाहिरात वाचून आलो ! काय तरी रस्ता काढा, पण घरात परत माझी सत्ता चालायला हवी !

लोकनाथ : त्यासाठी आधी तुमच्या हातात पैसा यायला हवा.

आप्पाराव : तो येणार कुठून ? घरात माझ्या मालकीचं त्या रत्नहाराशिवाय कायच नाय !

लोकनाथ : मग असं का नाही करीत ? तो रत्नहारच तात्पुरता गहाण का नाही टाकत ? त्याचे तीन लाख आले, तर एखाद्या चांगल्या कंपनीचे शेअर्स घेऊन मजेत राहता येईल तुम्हांला.

आप्पाराव : असं म्हणता ?

लोकनाथ : अहो, बघता बघता तीन लाखांचे सहा लाख होतील. सहाचे बारा... बाराचे—

आप्पाराव : पुरे पुरे ! आणखी कशाला ! नुसते तीनचे सहा झाले, म्हंजे माझ्या घरातल्या वाघिणीची शेळी होईल, बघा. पण मग लग्नात सोनालीला काय द्यायचं ?

लोकनाथ : लग्नात ? (क्षणभर विचार करून) डुप्लिकेट ! डुप्लिकेट हार द्यायचा.

आप्पाराव : नाय, बुवा, खुद्द स्वतःच्या पोरीला फसवायचं ! ते नाही माझ्यानं होणार !

लोकनाथ : अहो तात्पुरतं फसवायचं ! त्यातून तुम्ही काय मुलीचं लग्न अगदी उद्याच करणार आहात ? तीनचे सहा लाख झाले, की पुन्हा तोच रत्न-हार तिला परत करा, म्हंजे झालं.

आप्पाराव : हे बरं सांगितलंत ! म्हंजे पैसे मिळतील आणि रत्नहार पण जागच्या जागी. एकदा थोडा पैसा येऊ दे हातात. मग दाखवतो आमच्या चंडिकेला, घराचा खरा मालक कोण आहे, ते ! भारी मुरडताहा माहेरच्या पैशार !

लोकनाथ : मग दुपारी या हार घेऊन, आपण कारागिराकडे जाऊ. तो तुम्हांला डुप्लिकेट रत्नहार करून देईल ! तुमच्या हातात पैसे आले, की माझं कमिशन द्या.

[ दारावरची बेल वाजते. गजा जाऊन दार उघडतो. ]

लोकनाथ : या तुम्ही आता...माझं गिऱ्हाईक आलेलं दिसतंय्.

गजा : ( घाईघाईनं येऊन ) पोलिस इन्स्पेक्टर आलेत.

आप्पाराव : बाप रे...पोलिस ! हे काय आणखी लचांड ! आता आपल्याला पकडतील!

लोकनाथ : नाही, हो, पकडतील कशाला ! आपण काय गुन्हा थोडाच केलाय् !

आप्पाराव : तरी पण मी तोंड चुकवून जातो, नायतर तुमचा साथीदार म्हणून मला धरून नेतील....

[ डोक्यावरची हॅट तोंडावर धरतात. त्यामुळं एवढंच होतं, की समोरून येणाऱ्या इन्स्पेक्टर धोंड या जाडजूड भारदस्त इसमावर ते सरळ जाऊन आपटतात. मग मागे सरतात.
धोंड त्यांच्यावर चढाई केल्यासारखा पुढं होतो. असं करीत दोघंही फर्निचरला एक वळसा घालतात. तेव्हा कुठं आप्पारावांना दार सापडतं. ते पळ काढतात. जाईपर्यंत हॅट मात्र तोंडावर कायम. ]

इन्स्पेक्टर : हा कोण होता ?

लोकनाथ : तो ना ? तो एक गरीब स्वभावाचा श्रीमंत गरीब होता !

इन्स्पेक्टर : असं ? पण त्यानं तोंडावर हॅट का धरली होती !

लोकनाथ : त्याला गालगुंड झालंय्, चेहरा विद्रूप दिसतो ना, म्हणून.··
इन्स्पेक्टर : आणि आता ज्यानं दार उघडलं, तो....

[ गजा आत पळतो. ]

लोकनाथ : तो इथला वरकामाचा माणूस आहे!
इन्स्पेक्टर : त्याचा चेहरा कुठंतरी पाहिल्यासारखा वाटतो!
लोकनाथ : त्याच्या तोंडावर हॅट नव्हती ना, म्हणून!
इन्स्पेक्टर : अस्सं. मी पोलिस इन्स्पेक्टर धोंड. तुम्ही लोकांना मार्गदर्शन करता, म्हणे—
लोकनाथ : हो...पण त्यात बेकायदेशीर असं काही नाहीये!
इन्स्पेक्टर : त्यासाठी नाही मी आलो. मार्गदर्शन हवंय्, म्हणून आलोय्.
लोकनाथ : अहो, पण पोलिस आधीच बारा गावचं पाणी प्यायलेले असतात. त्यांना कोण काय शिकवणार!
इन्स्पेक्टर : मला कविता करायला शिकायचंय्.
लोकनाथ : कविता? पोलिस इन्स्पेक्टरला कवितेमध्ये गोडी, हे मी तरी पहिल्यांदाच ऐकतोय्.
इन्स्पेक्टर : का? तुम्ही 'अर्धसत्य' सिनेमा पाहिला नाही वाटतं? त्यातला पोलिस—
लोकनाथ : ठीक आहे! बसा! शिकवा म्हणताय्, तर शिकवतो. आठवड्यातून तीन वेळा, असे महिनाभर या. माझी फी महिना तीनशे रुपये. महिनाभरातली प्रगती पाहून त्यानंतर....
इन्स्पेक्टर : ठीक आहे....तर मग आताच सुरू करू या.
लोकनाथ : पहिला धडा हा, की काव्य सुचण्यासाठी जिवंत अनुभव हवा. या खिडकीतून खाली बघा...आणि मला सांगा—तुम्हांला काय दिसतंय्?
इन्स्पेक्टर : शेजारच्या बिल्डिंगचा सर्व्हन्ट्स्चा जिना दिसतो. डेन्जरस! या जिन्यावरून चोर चढला, तर सरळ या खिडकीतून आत येऊ शकतो. सीधा खालच्या ग्रीन चिकन् हॉटेलात गेलाय् हा जिना!
लोकनाथ : ग्रीन चिकन राहू द्या, हो!
इन्स्पेक्टर : छे छे— राहू देऊन कसं चालेल! बंदच करायला हवं ते! एक ना एक दिवस साल्यांना रेड हॅण्डेड् पकडतो, की नाही, पाहत राहा! लायसन्स

नसताना खुशाल दारू विकतात भडवे !

लोकनाथ : काय हे, काय हे, घोंड ! ही काय कवीची भाषा झाली !

इन्स्पेक्टर : नाही. पोलिसची झाली ! तरी इथं म्हणून इतकी सौम्य ! पोलिस स्टेशन-वरची भाषा तुम्ही ऐकायला हवी !

लोकनाथ : काही नकोय् ऐकायला. आता समोर बघून सांगा– म्हंजे ग्रीन चिकन दिसायचं नाही. हं, आता काय दिसतं ?

इन्स्पेक्टर : (मिटकी मारून) भलताच मस्त देखावा दिसतो !

लोकनाथ : मस्त बैल असतो ! दृश्य सुंदर असतं. नेमके शब्द वापरा.

इन्स्पेक्टर : बरं, खाली पाहिलं, की सुंदर दृश्य दिसतं.

लोकनाथ : चूक, साफ चूक, इन्स्पेक्टर, तुम्हांला कविता करायचीय् ना ? मग दृश्य सुंदर दिसून कसं चालेल ?

इन्स्पेक्टर : नाही चालणार ?

लोकनाथ : बिलकुल नाही. जे दिसतंय्, ते भेदक आहे.

इन्स्पेक्टर : भेदक !

लोकनाथ : दाहक आहे. ते पाहताना तुमचं काळीज पिळवटतं. रस्त्यातून चालणाऱ्या हजारो लोकांसाठी तुमचं हृदय रक्तबंबाळ होतं.

इन्स्पेक्टर : काय नाय, साहेब, आजकालची पब्लिक साली भलतीच हॅबिस झाली आहे !

लोकनाथ : अंहं.... हे तुमचं पोलिस म्हणून झालेलं मत.! पोलिस वेगळा.... कवी वेगळा ! पोलिस म्हणून तुमचा जनतेवर खुन्नस असला, तरी कवी म्हणून तुमचं मन जनतेसाठी मळमळतं, तळतळतं, जळजळतं.

इन्स्पेक्टर : —मळमळतं !

लोकनाथ : आता या नव्या दृष्टीतून कविता लिहा आणि पुढल्या वेळी ती मला आणून दाखवा. का ? आता कसल्या विचारात पडलात ? अजून तुमचं काळीज पिळवटायला नाही का लागलं ?

इन्स्पेक्टर : काळीज पिळवटतंच आहे, हो, शिवाय मी मघाच्या त्या नोकराचाही विचार करतोय्. जरा बोलावता का त्याला ?

लोकनाथ : बोलावतो की. (हाक मारीत) गजा...

गजा : (येता येता) गेला का तो जाड्या ! गेला ?

लोकनाथ : नाही ! तोच तुला बोलावतोय्.

गजा : बाप, रे....

इन्स्पेक्टर : माझी खात्री आहे, गजा...मी तुझा चेहरा कुठंतरी पाहिलाय्!

गजा : माझ्या जुळ्या भावाला पाहिलं असेल, साहेब, तुम्ही. आम्ही एकदम सारखे दिसतो, बघा.... एकाला झाकावा, दुसऱ्याला काढावा... दुसऱ्याला झाकावा, एकाला काढावा.... एका वेळेस एकाला झाकलं नाही, ना, तर जाम गोंधळ होतो, बघा. आई तर म्हणायची...

इन्स्पेक्टर : मी तुझ्या भावाला पाहिलेलं नाही...तुझे फोटो पाहिलेयत...एक असा ...आणि दुसरा....( बाजूनं ) असा....

गजा : ( खचून जातो...तरीही ) असेल! मागे एका सौंदर्यस्पर्धेत पाठवले होते मी माझे फोटो!

इन्स्पेक्टर : अंहं, सौंदर्यस्पर्धेत नाही. पोलिस स्टेशनवर पाह्यलेत. मला वाटतं, तुला तिथंच नेऊन एकदा खात्री करून घ्यावी...

गजा : ( ओरडत ) सदूशेठ.... धावा धावा... वाचवा... सदूशेठ, हा घोडा मला....

[ सदू टेकाडे बाहेर धावत येतो. आता त्याच्या अंगावर घरातला पोशाख. ]

सदू : सोडा....सोडा त्याला, अहो, केलं काय त्यानं!

इन्स्पेक्टर : ( गजाला सोडून देत ) मिस्टर सदूशेठ, तुम्हांला एका गोष्टीबद्दल वॉर्निंग देणं हे माझं कर्तव्य आहे ...तुमचा हा गजा आहे ना...

सदू : हो, भलताच विश्वासू आहे...

इन्स्पेक्टर : त्याच्यावर भलताच विश्वास टाकू नका. तो एकेकाळी तुरुंगात होता...

सदू : ( धक्का बसून ) काय म्हणता! अहो, तुमची काहीतरी चूक....

इन्स्पेक्टर : बिलकुल नाही. दीड वर्षांपूर्वी त्याला भुरट्या चोरीबद्दल एक वर्षाची सजा झाली. त्या वेळेस काढलेले त्याचे फोटो आहेत पोलिस स्टेशनवर. कुठल्या बदमाशानं पाठवला याला तुमच्याकडे!

सदू : बदमाशानं! ( लोकनाथकडे हात करून ) यानीच शिफारस केली.

इन्स्पेक्टर : मग ठीक आहे. पण जरा काळजी घ्या. मौल्यवान वस्तू उघड्यावर टाकू नका. नाहीतर परिणाम वाईट होतील. एकदम भेदक!

सदू : भेदक!

इन्स्पेक्टर : दाहक, काळीज पिळवटेल. रक्तबंबाळ होईल. जळजळेल. भळभळेल, तळतळेल.... (जातो.)

सदू : गजा...., खरं आहे, इन्स्पेक्टर धोंडानी सांगितलं, ते!

गजा : शंभर टक्के खरं.

लोकनाथ : तुझ्या चेहऱ्यावरनं तर तसं वाटत नाही. इतका सज्जन दिसतोस आणि चोऱ्या कशा करायचास!

गजा : सांगू? जिथं चोरी करायची, तिथं मी आधी नोकर म्हणून राह्यचो. मालकाचा विश्वास संपादन करायचो.

सदू : (किंचाळून) काय!

गजा : आणि नंतर, संधी मिळाली, की एकदम सगळं गोळा करून पळ काढायचो.

लोकनाथ : आणि तशी संधी तुला मिळायची ?

गजा : न मिळायला काय झालं? मालक लोक जाम बावळट असतात.

सदू : काय म्हणालास?

गजा : नाही...तुमच्यासारखे थोडे मालक हुशार पण असतात! अशा मालकांच्या बाबतीत मी काय करायचो माहीतेय्? क्लोरोफॉर्म!— गुंगीचं औषध! त्याचा बोळा मालकाच्या नाकाशी धरून त्याला बेशुद्ध करायचो आणि—

सदू : पुरे, माझ्यानं नाही ऐकवत. काय भयंकर माणूस मी घरात ठेवलाय्! (लोकनाथला) म्हंजे आता हा एक दिवस माझ्या नाकाशी गुंगीच्या औषधाचा बोळा धरून इथं काय असेल नसेल, ते...

गजा : नाय नाय नाय नाय—बिलकुल घाबरू नका....मी तसलं काही करणार नाही. अहो, चोरीच करायची असती, तर मी तुमच्यासारख्या गरीब पेंटरच्या घरी कामाला राह्यलो असतो का?

सदू : म्हंजे? आता तू कधीच चोरी करणार नाहीस?

गजा : अं हं!

लोकनाथ : का?

गजा : कारण आता मी सुधारलोय्.

लोकनाथ : सुधारलायस! कशामुळं?

गजा : प्रेम, साहेब, शुद्ध प्रेम!

सदू : काय सांगतोस ! माझ्यावरच्या प्रेमानं तू सुधारलास !
गजा : तुमच्यावरच्या नाही, साहेब....मालावरच्या
लोकनाथ : अरे, पण मालावरच्या प्रेमानंच तू चोऱ्या करायचास ना !
गजा : तो माल नाही, साहेब. ती माला.... भलतीच गुणी छोकरी आहे, साहेब, ती. ( थांबून ) पाकीट मारण्यात तिचा हात कोणीच धरणार नाही !
सदू : ती पाकीट मारते ?
गजा : कला असते, साहेब, एकेकाच्या हातात ! पण मी तिला म्हटलं, की लग्नानंतर कलाबिला सगळं बंद ! मी तर विचार करतोय्, की इथलं काम पण सोडून द्यायचं न् टेलरिंग शॉप काढायचं. तेवढं शिवणकाम येतं, साहेब, आपल्याला.
लोकनाथ : एकूण तुम्ही दोघंही आता सुधारलाय् ?
गजा : होय, साहेब. वाईट वाटतं, बघा. सगळी मजा जाणार आता. पण करायचं काय ? संसार करायचा, तर तुरुंगाच्या वाऱ्या करून कसं चालेल ? ( लोकनाथला ) तुम्ही म्हणता, ते बरोबर आहे, साहेब. लग्न, प्रेम, हा सगळा मूर्खपणा आहे. माणूस कामातून जातो, बघा !
सदू : तुला काय वाटतं, गजा...इतकं ऐकल्यानंतरसुद्धा मी तुला कामावर ठेवावं ?
गजा : बिलकुल ठेवू नये, साहेब. अजिबात ठेवू नये. ठेवलं, तर तुमच्यासारखे मूर्ख तुम्हीच. पण, साहेब, तुम्ही ठेवाल.
सदू : का ? मी मूर्ख आहे ?
गजा : मूर्ख नाही, साहेब. दयाळू आहात.

[ दारावरची बेल वाजते. ]

गजा : बघा—सत्य आहे.
लोकनाथ : असू दे. बहुतेक माझं गिऱ्हाईक आलेलं दिसतंय् ! तुम्ही चला आत.

[ सदू आणि गजा आत जातात. लोकनाथ दार उघडतो. बावीस-तेवीस वर्षांची एक सुंदर तरुणी दारात येते. ]

लोकनाथ : या या...प्रोफेसर लोकनाथ आपलीच वाट पाहताहेत.

तरुणी : अय्या, त्यांना काय माहीत मी येणार, ते!

लोकनाथ : त्याना काय माहीत नसतं? मुंगीसुद्धा लोकनाथांची नजर चुकवून साखर पळवू शकत नाही, असं म्हणतात.

तरुणी : (आत येत) कोण म्हणतात?

लोकनाथ : स्वतः लोकनाथ.

तरुणी : कुठायत प्राध्यापकसाहेब!

लोकनाथ : मीच प्राध्यापक लोकनाथ.

तरुणी : तुम्ही? नावावरून मला वाटलं होतं....कोणी भारदस्त माणूस असेल.

लोकनाथ : दिसण्यात भारदस्तपणा नको! विचारात हवा...बसा. (तिच्यावर छाप पाडण्यासाठी) बसला फार वेळ थांबावं लागलं, वाटतं....!

तरुणी : अय्या, 'आमची कार आहे. पण मी आजच बसनं आले, हे तुम्हांला कसं कळलं?' असं मी चकित होऊन मुळीच विचारणार नाही. कारण हे तिकीट तुम्ही पाहिलंय्!

[घड्याळाच्या पट्ट्यातील तिकीट काढून टाकते.]

लोकनाथ : बसा ना, तुमचा प्रॉब्लेम काय आहे!

तरुणी : तसं आमचं घराणं खूप प्रसिद्ध आहे. सावंतवाडीचे सरदार वाडकर माहीत असतील ना तुम्हाला? तेच.

लोकनाथ : (चमकून) वाडकर?

तरुणी : मलबार हिलवर 'चंद्रिकाविहार' म्हणून बंगला आहे आमचा. आईचं नाव दिलय् बंगल्याला. आईचं म्हणजे दुसऱ्या—सावत्र! मी आप्पाराव वाडकरांची मुलगी...मख्खी!

लोकनाथ : (संबंध लागून आश्चर्यचकित, पण स्वतःला सावरून) सोनाली!

सोनाली : (चकित होऊन) पण मी माझं नाव सांगितलेलं नव्हतं.

लोकनाथ : (रुबाबात खांदे उडवून) माझं नाव प्राध्यापक लोकनाथ! आता बोला, काय विचारायचंय्?

सोनाली : जे विचारायचं आहे, ते अतिशय गुप्त स्वरूपाचं आहे.

लोकनाथ : मग सांगूनच टाका.

सोनाली : मला तुमचा सल्ला हवा आहे. मी एका माणसाच्या प्रेमात पडले आहे.

लोकनाथ : चूक! फार मोठी चूक करताय् तुम्ही! माझी 'लग्न कसे करावे' ही पुस्तिका वाचा! 'प्रेमात पडण्याचे दुष्परिणाम' ही पुस्तिका वाचा... मग तुमच्या लक्षात येईल, की प्रेम करणं हा मूर्खपणा आहे.

सोनाली : (रडवेली) खरंच मूर्खपणा आहे!

लोकनाथ : अगदी शंभर टक्के! बरं झालं. तुम्ही योग्य वेळी माझ्याकडे आलात. नाहीतर पुढं तुम्हांला घोर संकटात पडावं लागलं असतं!

सोनाली : एक माणूस दररोज माझ्या मागं मागं येतो. माझ्याकडे प्रेमानं रोखून पाहतो. तासन्तास माझ्या घरासमोर उभा राहतो. तुमचं म्हणणं-मी त्या माणसाला यापुढं मुळीच उत्तेजन देऊ नये!

लोकनाथ : उत्तेजन? पुढच्या वेळी तो तुमच्या घरासमोर तर सोडाच, पण मलबार हिलच्या पायथ्याशी जरी दिसला ना, तरी तुम्ही पोलिसांना बोलावून त्याला अटक करा. खुशाल मागं मागं येतो, म्हंजे काय! आता तुमच्या मागं आला, तर सरळ थोबाडीत ठेवून द्या.

सोनाली : (अधिकच रडवेली.) मला वाटलं होतं... तुम्ही जरा वेगळा सल्ला द्याल. त्याला पोलिसांच्या हवाली करायचं.... थोबाडीत मारायची... यासाठी मन फारच घट्ट करावं लागेल मला. पण म्हंजे हे तुमचं फायनल आणि अचूक मार्गदर्शन समजू ना मी!

लोकनाथ : निःसंशय! याक्षणी कदाचित तुम्हांला ते पटणार नाही. पण पुढं आयुष्यभर तुम्ही माझे उपकारच मानाल! (ती रडू लागते.) अरे अरे. तुम्हांला फारच वाईट वाटलेलं दिसतंय्! पण मी तरी काय करू? मिस् सोनाली, सत्य कटु असतं. पण अप्रिय असलं, तरी योग्य तेच मार्गदर्शन करणं हे माझं काम आहे! अरे बाप रे, तुमची अवस्था भलतीच खराब झालेली दिसतेय्! (हाक मारून) गजा...जरा पाणी आण, रे...लौकर!

[गजा पाणी घेऊन येतो. सोनालीला पाहून चमकतो.]

गजा : आं! साहेब....या...! याम् याम् याम्...सडूशेठ...

[ उलटा आत पळतो. ]

सोनाली : ( घटाघटा पाणी पिते. ) जाते मी....( पर्समधून पंचवीस रुपयांच्या नोटा काढून देत ) ही तुमची फी...

लोकनाथ : मी येऊ का खालपर्यंत सोडायला? तुमची तब्येत ठीक दिसत नाही...

सोनाली : नको. जाईन मी.

[ सदू धावतच बाहेर येतो. ]

सदू : ( सोनालीला ) थांबा...तुम्ही ! तुम्ही कशा इथं ?

सोनाली : ( चकित होऊन ) तुम्ही ! ( मग निर्धारानं ) माझ्याशी बोलू नका. पुन्हा मलबार हिलच्या पायथ्याशी जरी दिसलात, तरी यांच्या सल्ल्याप्रमाणं मी तुम्हांला पोलिसांच्या हवाली करीन.

सदू : पण मी....माझं ऐकून तरी घ्या....

सोनाली : माझ्या मागं मागं येता काय ? ( खाडकन् त्याच्या थोबाडीत मारते. ) मी जाते. पुन्हा तुम्हाला भेटणार नाही. ऊं...हूं...हूं....हूं.... ( मोठमोठ्याने रडत जाते. )

लोकनाथ : म्हंजे....? सद्या...ही–ही...

सदू : हो ! ती–तीच ती ! आणि असं वागण्याचा सल्ला तूच दिलास तिला. माझ्या सगळ्या स्वप्नांचा तू बसल्या जागी चक्काचूर केलास ! खड्ड्यात गेलं तुझं मार्गदर्शन आणि मानवजातीचं कल्याण. आजपासून तुझी कन्सल्टन्सी बंद !

[ संतापानं टेबलवरची स्टेशनरी भिरकावून देतो. भिंतीवरच्या पाट्या काढून इकडेतिकडे फेकू लागतो– ]

लोकनाथ : ( त्याचा हात पकडून ) हां....हां...कन्सल्टन्सी कशी बंद होईल ? एवढ्या तेवढ्यानं माघार घेणारा हा प्राध्यापक लोकनाथ नव्हे ! डोन्ट वरी, माय् डिअर क्लायंट ! आजच मी सोनालीला पटवतो....

सदू : काय म्हणालास ?

लोकनाथ : पटवतो की, तिनं तुझ्या प्रेमाला दाद द्यावी–स्ट्रॅटेजी नंबर वन, स्ट्रॅटेजी नंबर टू– तू स्वतः तिच्याकडे जायचंस.

सदू : मी...? प्रत्यक्ष स्वतः मी ? म्हंजे पर्सनली....( आवंढा गिळून ) तिच्याकडे ? ( गाल चोळतो. )

लोकनाथ : काही घाबरू नकोस. तोपर्यंत माझ्या स्ट्रॅटेजी नंबर वनमुळं तुझा रस्ता एकदम क्लिअर झालेला असेल. आज संध्याकाळीच तिच्याकडे जा.

सदू : पण तिनं कशाला आलात, म्हणून विचारलं, तर ?

लोकनाथ : तर–तर...तो कुत्रा, रे...सकाळी पळालेला....

सदू : कुत्रा ? त्याचं काय ?

लोकनाथ : त्याला बघायला आलो, म्हणून सांग. चल, मी पाठ करून घेतो तुझं भाषण. अरे, हा लोकनाथ असताना तुला कसली भीती ? म्हटलंच आहे ना, लोकां सांगे ब्रह्मज्ञान । उद्धरी कोरडे पाषाण !

**काळोख**

## प्रवेश दुसरा

[ काळोखात आनंदी नृत्य संगीत. हळू हळू रंगमंच उजळतो, तेव्हा दिसतं, ते चंद्रिका विहार बंगल्याच्या तळमजल्यावरच पाठीमागच्या भागातलं एक दालन. याला एक दार बाहेरून येण्यासाठी आणि दुसरं बागेत जाण्यासाठी. वर जाण्यासाठी एक जिना. या दालनात घरची मंडळी तेवढी वावरतात. बाकी पाहुण्याचा वावर पलिकडच्या दिवाणखान्यात.

दिवाणखान्यात चंद्रिकाबाईंच्या वाढदिवसाची पार्टी चालू आहे. त्यामुळे हसण्या-बोलण्याचे बरेच आवाज. स्टिरिओवर ध्वनिमुद्रित संगीत. दालनामधल्या एका सोफ्यावर रविकिरण रत्नपारखी हा सुटाबुटातला जाडगेला तरुण बसला आहे. पंचविशी उलटली असली, तरीही तो अजून ग्लॅक्सो बेबीसारखा दिसतो. तसाच लाडात बोलतो. त्याच्या समोरच्या टेबलवर आईस्क्रीमचे तीन रिकामे कप आहेत. चौथा त्याच्या

हातातला कपही संपण्याच्या वाटेवर आहे. आईस्क्रीम खाण्यात त्याची इतकी तंद्री लागली आहे, की चंद्रिकाबाई आत आल्याचं त्याला कळत सुद्धा नाही.
चंद्रिकाबाई हे एक मध्यमवयीन प्रस्थ. ही देखणी, पण उग्र प्रकृतीची, धारदार बोलणारी स्त्री. अंगावर पार्टीसाठी नेसलेला भरजरी शालू. ]

चंद्रिका. : रविकिरण, बाहेरच्या दिवाणखान्यात पार्टी चाललीय्.... आणि तुम्ही एकटेच काय बसलात इथं...आयस्क्रीम खात?

रविकिरण : नाही. इथं जरा मन एकाग्र करून खातोय्. तिथं सगळ्यांची गडबड—

चंद्रिका. : सोनालीपासून दूरदूर राहाताय् तुम्ही! तिची जरा खबरबात घ्या वर जाऊन! एकटीच रडत बसलीय् ती.

रविकिरण : असं? मग मी जातो तिच्याबरोबर रडायला, आपलं बोलायला. पण ती रडतेय् कशासाठी?

चंद्रिका. : कोण जाणे! कालपासून तिचं काहीतरी बिनसलंय्. मध्येच रडते काय, चिडते काय, आदळआपट करते काय...

रविकिरण : बाप रे...मग दूरच राहिलं पाहिजे तिच्यापासून. (तंद्री लागल्याप्रमाणे) काय सांगू तुम्हांला, चंद्रिकाबाई, आजची तुमच्या वाढदिवसाची पार्टी माझ्या जन्मभर लक्षात राहील. विशेषतः दही-मटण म्हंजे आयुष्यातला एक फार थरारक अनुभव होता. आणि बोटी कबाब... अहाहा...

चंद्रिका. : (चिडून) रविकिरण....तुम्ही खाण्यावरचं लक्ष थोडं कमी करून सोनाली-कडे थोडं अधिक लक्ष दिलंत, तर...

रविकिरण : कसं देणार लक्ष! मला पाहिलं, की सोनाली टूथपेस्टच्या ॲड फिल्ममध्ये दाखवतात, तसं दुसरीकडे तोंड फिरवते.

चंद्रिका. : तिला श्रीमंत माणसं आवडत नाहीत

रविकिरण : अहो, पण असतो एखादा माणूस श्रीमंत. त्यात त्याची काय चूक! त्यातनं आम्ही स्वतःच्या प्रयत्नानं थोडेच श्रीमंत झालोत! नशिबानंच आम्हांला श्रीमंत म्हणून जन्माला घातलं, त्याला आमचा काय इलाज!

चंद्रिका. : कार्टीचं लक्षणच दळभद्री. आज इतकी मोठमोठी माणसं बोलावली होती पार्टीला....बॉम्बे डाइंगचा मॅनेजर.... वेस्टर्न इंडियाचा भाऊ, मोहन

मिकिन्सचा मेहुणा. पण सोनाली एकाशीही धड बोलली असेल, तर शपथ!

रविकिरण : हो ना, एअर इंडियाला तर उडत गेलात, म्हणाली! बाकी आजच्या कोंबड्या मात्र केवळ अविस्मरणीय....

चंद्रिका. : आजकालच्या पोरी या अशाच. त्यातून वय कोवळं!

रविकिरण : कोवळ्या असल्या, तरी होत्या भरदार.

चंद्रिका. : नुसतं बघून घ्यावं त्यांच्याकडे.

रविकिरण : का? टेस्टही चांगली असते.

चंद्रिका. : टेस्ट कसली चांगली! ज्याला त्याला नाकं मुरडतात.

रविकिरण : पण शिजल्या होत्या उत्तम.

चंद्रिका. : कुणाबद्दल बोलताय् तुम्ही?

रविकिरण : कोंबड्या, हो, आजच्या. अजून चव जात नाहीये तोंडातली.

चंद्रिका. : कशी जाईल! खाण्याशिवाय दुसरं काही तुम्हांला सुचेल तर ना? अशानं सोनाली जाईल हातची आणि तुम्ही बसाल...

रविकिरण : चुरमुरे खात! असंच ना!

[आप्पाराव हातात एक आईस्क्रीमचा कप घेऊन येतात.]

आप्पाराव : (चंद्रिकाबाईंना) तू आधी भायेर जा, बघू या. सगळे विचारताहेत चंडिका खंय! चंडिका खंय...? तू बसलंय् हंय फाते मारीत आणि त्या गोप्चिडांनी माझो जीव खाल्लो.

[आईस्क्रीमचा कप खाली ठेवतात. रविकिरण तो आपल्यासमोर ठेवतो.]

आप्पाराव : जा जा आधी. बघ, कोण कोण जाऊक् निघाले आसत! तेंका घालवून दी!

चंद्रिका. : थोडा वेळ तुम्ही पाहुण्यांकडे लक्ष दिलंत, तर? एक काम व्हायचं नाही तुमच्या हातून! (जातात.)

आप्पाराव : (रविकिरणकडून आईस्क्रीमचा कप घेतात.) चंद्रिकेला मुद्दामच घालवून दिलं. मला तुझ्याशी थोडं प्रायव्हेट बोलायचं होतं. (कप खाली ठेवतात.)

रविकिरण : (आप्पांच्या पुढ्यातला कप उचलून खायला सुरुवात करीत) प्रायव्हेट?
आप्पाराव : अरे, तो कप माझा होता!
रविकिरण : चालेल! त्यात काय एवढं? पण प्रायव्हेट काय बोलायचं होतं तुम्हांला?
आप्पाराव : समज, उद्या मला तीन लाख रुपये मिळाले– समज, म्हटलं हां.... समज मिळाले, तर मी कुठल्या कंपनीचे शेअर घेऊ?
रविकिरण : (आईस्क्रीमवर ताव मारीत) फस्सक्लास कंपनी सांगतो. आताच डॅडींनी तिचे चार लाखांचे शेअर घेतले. अनिअन कार्बाईड. कांद्यापासून गॅस तयार करतात. कंपनी भलतीच फॉर्मात आहे. भांडवल चिक्कार मोठं आहे त्यांचं. सहज मिळतील तुम्हांला तीन लाखांचे शेअर्स!
आप्पाराव : बरं बरं.... पण कुठं बोलू नकोस हां! आमच्या त्या चंडिकेकडे तर नकोच नको!

[चंद्रिकाबाई लोकनाथला घेऊन येतात.]

चंद्रिका. : (आप्पारावना) अहो, हे बघा कोण आलेत ... प्रत्यक्ष 'चुकते कुठे' मालिकेचे लेखक! तुमच्याकडे आलेत, म्हणे. (लोकनाथला) आलेच मी. तुम्ही पाच मिनिटं बोला आमच्या मिस्टरांशी. लगेच कंटाळून बाहेर याल तुम्हीही... (जातात.)
आप्पाराव : (लोकनाथला) केलंत माझं काम?
लोकनाथ : (रविकिरणकडे नजर टाकून आप्पारावला) श्श.... काम झालंय्, पण जरा घोटाळा झालाय्.
आप्पाराव : घोटाळा? तो कसा काय?
लोकनाथ : (रविकिरणला) माझं काम कराल एक? आत्ता चंद्रिकाबाईंनी एक मिठाईचं छोटंसं बॉक्स् टेबलवर ठेवलंय्, ते जरा घेऊन याल?
रविकिरण : (उत्साहानं) मिठाईचं बॉक्स ना? आणतो की! (लगबगीनं जातो.)
लोकनाथ : दारातच मिठाईचं बॉक्स माझ्या हातून काढून घेतलं चंद्रिकाबाईंनी, मग मी तरी काय करणार?
आप्पाराव : जाऊ दे, हो, मिठाईचं काय मोठंसं?
लोकनाथ : तुमच्या लक्षात नाही आलं. त्या मिठाईच्या बॉक्समध्ये मिठाई नव्हती.
आप्पाराव : मिठाई नव्हती?

लोकनाथ : रत्नहार होता....नकली....
आप्पाराव : मग तो मिठाईच्या बॉक्समधून कशाला आणला !
लोकनाथ : नाहीतर नकली रत्नहाराला दागिन्याचं बॉक्स कोण देणार !

[ रविकिरण मिठाईचं बॉक्स घेऊन येतो. ]

आप्पाराव : इकडे द्या ते.
रविकिरण : नो नो नो, मला जरा नमुना तर बघू द्या.
लोकनाथ : अहो, पण त्यात मिठाई नाहीय्.
रविकिरण : फसवता काय मला ! आता तर म्हणालात, मिठाईचं बॉक्स आहे. थांबा, मीच उघडतो.
लोकनाथ : हां हां....उघडू नका.
आप्पाराव : माझ्याकडे आणा, बघू या.

[ तिघांची लहानशी रस्सीखेच होते. त्यात बॉक्स उघडतं. ]

रविकिरण : बघा, आहे ना मिठाई, खोटं बोलत होता काय !

[ भराभर आतली मिठाई खाऊ लागतो. ]

लोकनाथ : अरेच्चा ! बॉक्स बदललं वाटतं ?
आप्पाराव : तर... बाहेर आज मिठाईची बॉक्सं रगाड आणली आहेत त्या दळिद्री पाव्हण्यांनी.
लोकनाथ : चला, आपण बघून येऊ या...

[ लोकनाथ आणि आप्पाराव घाईघाईने जातात. ]

रविकिरण : चमत्कारिकच आहेत. खायचं नव्हतं, तर हे बॉक्स आणायला सांगितलं कशाला ? आता सगळं मलाच संपवावं लागणार !

रविकिरण : (आप्पांच्या पुढ्यातला कप उचलून खायला सुरुवात करीत) प्रायव्हेट ?

आप्पाराव : अरे, तो कप माझा होता !

रविकिरण : चालेल ! त्यात काय एवढं ? पण प्रायव्हेट काय बोलायचं होतं तुम्हांला ?

आप्पाराव : समज, उद्या मला तीन लाख रुपये मिळाले– समज, म्हटलं हां.... समज मिळाले, तर मी कुठल्या कंपनीचे शेअर घेऊ ?

रविकिरण : (आईस्क्रीमवर ताव मारीत) फस्सक्लास कंपनी सांगतो. आताच डॅडींनी तिचे चार लाखांचे शेअर घेतले. अनिअन कार्बाईड. कांद्यापासून गॅस तयार करतात. कंपनी भलतीच फॉर्मात आहे. भांडवल चिक्कार मोठं आहे त्यांचं. सहज मिळतील तुम्हांला तीन लाखांचे शेअर्स !

आप्पाराव : बरं बरं.... पण कुठं बोलू नकोस हां ! आमच्या त्या चंडिकेकडे तर नकोच नको !

[चंद्रिकाबाई लोकनाथला घेऊन येतात.]

चंद्रिका. : (आप्पारावना) अहो, हे बघा कोण आलेत ... प्रत्यक्ष 'चुकते कुठे' मालिकेचे लेखक ! तुमच्याकडे आलेत, म्हणे. (लोकनाथला) आलेच मी. तुम्ही पाच मिनिटं बोला आमच्या मिस्टरांशी. लगेच कटाळून बाहेर याल तुम्हीही... (जातात.)

आप्पाराव : (लोकनाथला) केलंत माझं काम ?

लोकनाथ : (रविकिरणकडे नजर टाकून आप्पारावला) श्श.... काम झालंय्, पण जरा घोटाळा झालाय्.

आप्पाराव : घोटाळा ? तो कसा काय ?

लोकनाथ : (रविकिरणला) माझं काम कराल एक ? आत्ता चंद्रिकाबाईंनी एक मिठाईचं छोटंसं बॉक्स् टेबलवर ठेवलंय्, ते जरा घेऊन याल ?

रविकिरण : (उत्साहानं) मिठाईचं बॉक्स ना ? आणतो की ! (लगबगीनं जातो.)

लोकनाथ : दारातच मिठाईचं बॉक्स माझ्या हातून काढून घेतलं चंद्रिकाबाईंनी, मग मी तरी काय करणार ?

आप्पाराव : जाऊ दे, हो, मिठाईचं काय मोठंसं ?

लोकनाथ : तुमच्या लक्षात नाही आलं. त्या मिठाईच्या बॉक्समध्ये मिठाई नव्हती.

आप्पाराव : मिठाई नव्हती !

लोकनाथ : रत्नहार होता....नकली....
आप्पाराव : मग तो मिठाईच्या बॉक्समधून कशाला आणला !
लोकनाथ : नाहीतर नकली रत्नहाराला दागिन्याचं बॉक्स कोण देणार !

[ रविकिरण मिठाईचं बॉक्स घेऊन येतो. ]

आप्पाराव : इकडे द्या ते.
रविकिरण : नो नो नो, मला जरा नमुना तर बघू द्या.
लोकनाथ : अहो, पण त्यात मिठाई नाहीय्.
रविकिरण : फसवता काय मला ! आता तर म्हणालांत, मिठाईचं बॉक्स आहे. थांबा, मीच उघडतो.
लोकनाथ : हां हां....उघडू नका.
आप्पाराव : माझ्याकडे आणा, बघू या.

[ तिघांची लहानशी रस्सीखेच होते. त्यात बॉक्स उघडतं. ]

रविकिरण : बघा, आहे ना मिठाई, खोटं बोलत होता काय !

[ भराभर आतली मिठाई खाऊ लागतो. ]

लोकनाथ : अरेच्चा ! बॉक्स बदललं वाटतं ?
आप्पाराव : तर... बाहेर आज मिठाईची बॉक्सं रगड आणली आहेत त्या दळिद्री पाव्हण्यांनी.
लोकनाथ : चला, आपण बघून येऊ या...

[ लोकनाथ आणि आप्पाराव घाईघाईने जातात. ]

रविकिरण : चमत्कारिकच आहेत. खायचं नव्हतं, तर हे बॉक्स आणायला सांगितलं कशाला ? आता सगळं मलाच संपवावं लागणार !

[ सोनाली खाली येते. ती अतिशय वाईट मूडमध्ये आहे. ]

सोनाली : इथं येऊन खात बसलाय् ! कमाल आहे तुमची, मिस्टर रत्नपारखी !

रविकिरण : मला तुम्ही सबंध रत्नपारखी नका, हो, म्हणत जाऊ ! रविकिरण म्हणा. नुसतं रवि म्हटलंत, तरी चालेल.

सोनाली : नुसतं रत्न म्हटलं, तरी चालेल का...!

रविकिरण : हां हां ! फारच विनोदी स्वभाव आहे तुमचा !

[ चंद्रिकाबाई येतात. ]

चंद्रिका. : सोनाली, अग, पाहुणे निघालेसुद्धा.

सोनाली : असं ? मग हे रत्नपारखी काय करताहेत इथं ? अहो, सगळी पातेली रिकामी झाली. आता तुम्ही गेलात, तरी चालेल.

रविकिरण : तुम्हांला वाटतं, तेवढा काही मी खादाड नाही हां, सोनालीदेवी. मी थांबलोय्, तो खाण्यासाठी नव्हे. तुमचीच चौकशी करण्यासाठी. चंद्रिकाबाई म्हणाल्या, की कालपासून तुमचा मूडच गेलाय्.

सोनाली : हो ! माझा मूडच गेलाय्. आणि त्या पाठोपाठ आता तुम्हीही गेलात, तर बरं होईल.

रविकिरण : तुम्ही असं हळूच सुचवताय्... की, मी इथं थांबू नये.

सोनाली : (टेबलवर जोरजोराने हात आपटीत) मी हळूच सुचवत नाही. मी मोठमोठ्यानं ओरडून सांगते आहे, तुम्ही जा !

[ रविकिरण भेदरून पळत सुटतो. ]

चंद्रिका. : फार तोडून बोलतेस तू त्याला.

सोनाली : काही काळजी नको. माणूस इतका चिकट आहे– इतका चिकट आहे, की कितीही बारीक तोडला, तरी सगळे तुकडे लगेच चिकटतील. त्याच्या रक्तातच फेविकॉल मिसळलाय्.

चंद्रिका. : तुझ्याशी लग्न करायचं फार मनात आहे त्याच्या.

सोनाली : माझ्याशी लग्न ? हां हां... माझ्यापेक्षा तंदुरी चिकनवर अधिक प्रेम

क्र. २१८२५ दि. ३।१।८५
वा.
वि. नाट्य

आहे त्याचं ! तुला सांगून ठेवते मी, ममी...

चंद्रिका. : किती वेळा सांगितलं मॉम म्हणायचं, म्हणून ?

सोनाली : बरं मॉम ! मॉ ऽ म, तू जर माझं त्याच्याशी लग्न लावून दिलंस ना, तर मी सगळ्यांना सांगेन, की सावत्र आई म्हणून तू माझा केसानं गळा कापलास !

चंद्रिका. : अग, पण आपल्या पाहण्यात दुसरा एक तरी लक्षाधीश लग्नाचा आहे का ?

सोनाली : लक्षाधीश कशाला हवाय्, ग, लग्नासाठी ?

चंद्रिका. : मग आता कोट्यधीश राहिलेत का पूर्वीसारखे ?

सोनाली : तू, ममी...

चंद्रिका. : मॉम....

सोनाली : तू मॉम.... लक्षाधीश, कोट्यधीश यांच्याशिवाय दुसरं काही बोलतच नाहीस. खरं सुख पैशात नसतं, असं प्रत्येक कादंबरीत, बाबा कदम म्हणतात.

चंद्रिका. : कादंबरीतलं खरं नसतं. असं मी म्हणते.

लोकनाथ : (एकदम येऊन) फक्त 'चुकते कुठे' मालिकेतला शब्दन् शब्द खरा असतो. असं मी म्हणतो.

सोनाली : (चकित होऊन) लोकनाथ, तुम्ही ? (मग सावरून) आता आणखी कसला सल्ला द्यायला आलाय् ! बहुधा मी त्या लक्षाधीश रविकिरण रत्नपारखीशी लग्न करावं, असं सांगायला तुम्हांला मॉमनं बोलावलेलं दिसतंय्.

लोकनाथ : रविकिरण ? तो मला थोडासा खादाड वाटला.

सोनाली : थोडासा ? माणसं झोपेत चालतात, तसा हा झोपेत जेवतो !

चंद्रिका. : पण दिसायला चांगला आहे... स्मार्ट आहे...

सोनाली : मला नाही असले स्मार्ट पुरुष आवडत. सगळीकडे पुढं पुढं करणं, आगाऊपणा करणं, या गोष्टी आजकाल मुलींनी करायच्या. पुरुषाच्या जातीनं कसं शालीन, भिडस्त, लाजाळू असायला हवं !

चंद्रिका. : (धक्का बसून) पुरुषांनी ! लाजाळू असायला हवं ?

सोनाली : मला नवरा कसा हवाय्, सांगू ! छोटासा, हडकुळा, ज्याच्याकडे पाहिल्यावर दया येईल, असा....

[ सोनाली खाली येते. ती अतिशय वाईट मूडमध्ये आहे. ]

सोनाली : इथं येऊन खात बसलाय् ! कमाल आहे तुमची, मिस्टर रत्नपारखी !
रविकिरण : मला तुम्ही सबंध रत्नपारखी नका, हो, म्हणत जाऊ ! रविकिरण म्हणा. नुसतं रवि म्हटलंत, तरी चालेल.
सोनाली : नुसतं रत्न म्हटलं, तरी चालेल का...!
रविकिरण : हां हां ! फारच विनोदी स्वभाव आहे तुमचा !

[ चंद्रिकाबाई येतात. ]

चंद्रिका. : सोनाली, अग, पाहुणे निघालेसुद्धा.
सोनाली : असं ? मग हे रत्नपारखी काय करताहेत इथं ? अहो, सगळी पातेली रिकामी झाली. आता तुम्ही गेलात, तरी चालेल.
रविकिरण : तुम्हांला वाटतं, तेवढा काही मी खादाड नाही हां, सोनालीदेवी. मी थांबलोय्, तो खाण्यासाठी नव्हे. तुमचीच चौकशी करण्यासाठी. चंद्रिकाबाई म्हणाल्या, की कालपासून तुमचा मूडच गेलाय्.
सोनाली : हो ! माझा मूडच गेलाय्. आणि त्या पाठोपाठ आता तुम्हीही गेलात, तर बरं होईल.
रविकिरण : तुम्ही असं हळूच सुचवताय्... की, मी इथं थांबू नये.
सोनाली : ( टेबलवर जोरजोराने हात आपटीत ) मी हळूच सुचवत नाही. मी मोठमोठ्यानं ओरडून सांगते आहे, तुम्ही जा !

[ रविकिरण भेदरून पळत सुटतो. ]

चंद्रिका. : फार तोडून बोलतेस तू त्याला.
सोनाली : काही काळजी नको. माणूस इतका चिकट आहे– इतका चिकट आहे, की कितीही बारीक तोडला, तरी सगळे तुकडे लगेच चिकटतील. त्याच्या रक्तातच फेविकॉल मिसळलाय्.
चंद्रिका. : तुझ्याशी लग्न करायचं फार मनात आहे त्याच्या.
सोनाली : माझ्याशी लग्न ! हां हां... माझ्यापेक्षा तंदुरी चिकनवर अधिक प्रेम

क्र. 29825 ता. ३।८।२५
वि. ना१२७

आहे त्याचं ! तुला सांगून ठेवते मी, ममी...

चंद्रिका. : किती वेळा सांगितलं मॉम म्हणायचं, म्हणून ?

सोनाली : बरं मॉम ! मॉ ऽ म, तू जर माझं त्याच्याशी लग्न लावून दिलंस ना, तर मी सगळ्यांना सांगेन, की सावत्र आई म्हणून तू माझा केसानं गळा कापलास !

चंद्रिका. : अग, पण आपल्या पाहण्यात दुसरा एक तरी लक्षाधीश लग्नाचा आहे का ?

सोनाली : लक्षाधीश कशाला हवाय्, ग, लग्नासाठी ?

चंद्रिका. : मग आता कोट्यधीश राहिलेत का पूर्वीसारखे ?

सोनाली : तू, ममी...

चंद्रिका. : मॉम....

सोनाली : तू मॉम.... लक्षाधीश, कोट्यधीश यांच्याशिवाय दुसरं काही बोलतच नाहीस. खरं सुख पैशात नसतं, असं प्रत्येक कादंबरीत, बाबा कदम म्हणतात.

चंद्रिका. : कादंबरीतलं खरं नसतं. असं मी म्हणते.

लोकनाथ : (एकदम येऊन) फक्त 'चुकते कुठे' मालिकेतला शब्दन् शब्द खरा असतो. असं मी म्हणतो.

सोनाली : (चकित होऊन) लोकनाथ, तुम्ही ? (मग सावरून) आता आणखी कसला सल्ला द्यायला आलाय् ! बहुधा मी त्या लक्षाधीश रविकिरण रत्नपारखीशी लग्न करावं, असं सांगायला तुम्हांला मॉमनं बोलावलेलं दिसतंय्.

लोकनाथ : रविकिरण ? तो मला थोडासा खादाड वाटला.

सोनाली : थोडासा ? माणसं झोपेत चालतात, तसा हा झोपेत जेवतो !

चंद्रिका. : पण दिसायला चांगला आहे... स्मार्ट आहे...

सोनाली : मला नाही असले स्मार्ट पुरुष आवडत. सगळीकडे पुढं पुढं करणं, आगाऊपणा करणं, या गोष्टी आजकाल मुलींनी करायच्या. पुरुषाच्या जातीनं कसं शालीन, भिडस्त, लाजाळू असायला हवं !

चंद्रिका. : (धक्का बसून) पुरुषांनी ? लाजाळू असायला हवं ?

सोनाली : मला नवरा कसा हवाय्, सांगू ? छोटासा, हडकुळा, ज्याच्याकडे पाहिल्यावर दया येईल, असा....

[ सोनाली खाली येते. ती अतिशय वाईट मूडमध्ये आहे. ]

सोनाली : इथं येऊन खात बसलाय् ! कमाल आहे तुमची, मिस्टर रत्नपारखी !

रविकिरण : मला तुम्ही सबंध रत्नपारखी नका, हो, म्हणत जाऊ ! रविकिरण म्हणा. नुसतं रवि म्हटलंत, तरी चालेल.

सोनाली : नुसतं रत्न म्हटलं, तरी चालेल का...!

रविकिरण : हां हां ! फारच विनोदी स्वभाव आहे तुमचा !

[ चंद्रिकाबाई येतात. ]

चंद्रिका. : सोनाली, अग, पाहुणे निघालेसुद्धा.

सोनाली : असं ? मग हे रत्नपारखी काय करताहेत इथं ? अहो, सगळी पातेली रिकामी झाली. आता तुम्ही गेलात, तरी चालेल.

रविकिरण : तुम्हांला वाटतं, तेवढा काही मी खादाड नाही हां, सोनालीदेवी. मी थांबलोय्, तो खाण्यासाठी नव्हे. तुमचीच चौकशी करण्यासाठी. चंद्रिकाबाई म्हणाल्या, की कालपासून तुमचा मूडच गेलाय्.

सोनाली : हो ! माझा मूडच गेलाय्. आणि त्या पाठोपाठ आता तुम्हीही गेलात, तर बरं होईल.

रविकिरण : तुम्ही असं हळूच सुचवताय्... की, मी इथं थांबू नये.

सोनाली : (टेबलवर जोरजोराने हात आपटीत) मी हळूच सुचवत नाही. मी मोठमोठ्यानं ओरडून सांगते आहे, तुम्ही जा !

[ रविकिरण भेदरून पळत सुटतो. ]

चंद्रिका. : फार तोडून बोलतेस तू त्याला.

सोनाली : काही काळजी नको. माणूस इतका चिकट आहे– इतका चिकट आहे, की कितीही बारीक तोडला, तरी सगळे तुकडे लगेच चिकटतील. त्याच्या रक्तातच फेविकॉल मिसळलाय्.

चंद्रिका. : तुझ्याशी लग्न करायचं फार मनात आहे त्याच्या.

सोनाली : माझ्याशी लग्न ? हां हां... माझ्यापेक्षा तंदुरी चिकनवर अधिक प्रेम

२९८२५ नाट्य

आहे त्याचं ! तुला सांगून ठेवते मी, ममी...

चंद्रिका. : किती वेळा सांगितलं मॉम म्हणायचं, म्हणून ?

सोनाली : बरं मॉम ! मॉ ऽ म, तू जर माझं त्याच्याशी लग्न लावून दिलंस ना, तर मी सगळ्यांना सांगेन, की सावत्र आई म्हणून तू माझा केसानं गळा कापलास !

चंद्रिका. : अग, पण आपल्या पाहण्यात दुसरा एक तरी लक्षाधीश लग्नाचा आहे का ?

सोनाली : लक्षाधीश कशाला हवाय्, ग, लग्नासाठी ?

चंद्रिका. : मग आता कोट्यधीश राहिलेत का पूर्वीसारखे ?

सोनाली : तू, ममी...

चंद्रिका. : मॉम....

सोनाली : तू मॉम.... लक्षाधीश, कोट्यधीश यांच्याशिवाय दुसरं काही बोलतच नाहीस. खरं सुख पैशात नसतं, असं प्रत्येक कादंबरीत, बाबा कदम म्हणतात.

चंद्रिका. : कादंबरीतलं खरं नसतं. असं मी म्हणते.

लोकनाथ : (एकदम येऊन) फक्त 'चुकते कुठे' मालिकेतला शब्दन् शब्द खरा असतो. असं मी म्हणतो.

सोनाली : (चकित होऊन) लोकनाथ, तुम्ही ? (मग सावरून) आता आणखी कसला सल्ला द्यायला आलाय् ! बहुधा मी त्या लक्षाधीश रविकिरण रत्नपारखीशी लग्न करावं, असं सांगायला तुम्हांला मॉमनं बोलावलेलं दिसतंय्.

लोकनाथ : रविकिरण ? तो मला थोडासा खादाड वाटला.

सोनाली : थोडासा ? माणसं झोपेत चालतात, तसा हा झोपेत जेवतो !

चंद्रिका. : पण दिसायला चांगला आहे... स्मार्ट आहे...

सोनाली : मला नाही असले स्मार्ट पुरुष आवडत. सगळीकडे पुढं पुढं करणं, आगाऊपणा करणं, या गोष्टी आजकाल मुलींनी करायच्या. पुरुषाच्या जातीनं कसं शालीन, भिडस्त, लाजाळू असायला हवं !

चंद्रिका. : (धक्का बसून) पुरुषांनी ! लाजाळू असायला हवं ?

सोनाली : मला नवरा कसा हवाय्, सांगू ! छोटासा, हडकुळा, ज्याच्याकडे पाहिल्यावर दया येईल, असा....

चंद्रिका : (किंचाळून) दया ?

सोनाली : हो! ज्याला पाहिल्याबरोबर पदराखाली घ्यावंसं वाटेल....

चंद्रिका. : सोनाली, चावटपणा करू नकोस.

सोनाली : म्हंजे... ज्याची मला आई व्हावंसं वाटेल– अशाच माणसाशी मला लग्न करायचंय्.

चंद्रिका. : आणखी एखाद्या भीक मागणाऱ्या, केस कापायला खिशात दमडी नसलेल्या, गाणी म्हणणाऱ्या, चित्रं काढणाऱ्या माणसाशी नाही का करायचं तुला लग्न ?

सोनाली : (स्वप्नाळूपणे) माझ्यासमोर आला, की ज्याचा धीर खचेल, भीतीनं तोंडून शब्द फुटणार नाही, चेहरा लाजेनं लालबुंद होईल, सुचेनासं होऊन जो हातातल्या रुमालाशी चाळा करीत राहील, कापऱ्या पायाच्या अंगठ्यानं जमीन उकरत राहील—

चंद्रिका. : सोना.... आहे कोण हा माणूस ?

सोनाली : आता कुठला माणूस ? (लोकनाथकडे हात करून) यांचं म्हणणं, की मी अशा माणसाला कायमचं विसरून जावं !

चंद्रिका. : अगदी बरोबर आहे !

सोनाली : माझ्या हातून निसटून डॉगी पळाला, तर जिवाचं रान करून, एका सायकलला टक्कर देऊन, एक स्कूटर आडवी पाडून, कारसमोर मरता मरता वाचून डॉगीला माझ्याकडे परत आणून देणाऱ्या माणसाला— (स्फुंदत) यांचं म्हणणं मी पोलिसात द्यावं !

चंद्रिका. : हे यांनी तुला कधी सांगितलं, मला माहीत नाही; पण अगदी योग्य तेच सांगितलं. तुला पाहिल्याबरोबर कापरं भरणाऱ्या आणि लाजेनं लालबुंद होणाऱ्या कुठल्याही क्षुद्र जंतूशी तू यापुढं बोलायचं नाहीस. एखाद्या झुरळाशी, नाहीतर पॉपकॉर्नच्या फाटक्या पिशवीशी माझ्या मुलीचं लग्न व्हावं, असं मला बिलकुल वाटत नाही. मग ती सख्खी नसली न् सावत्र असली, तरीसुद्धा ! (लोकनाथला) द्या—द्या हे जरा तिला समजावून ! (जातात.)

सोनाली : माझी समजूत घालायला तुम्हांला मॉमनं इथं बोलावलं असलं, तर आत्ताच्या आत्ता चालते व्हा.

लोकनाथ : माझं जरा ऐकणार का ?

सोनाली : ऐकतेच तर आहे ! कुठून तुमचा सल्ला घेतला, असं झालंय् ! 'चुकते कुठे ?' नंबर एक ! तुमचा सल्ला घेणे !

लोकनाथ : (खिशातून पंचवीस रुपये काढून) हे तुमचे पैसे परत.

सोनाली : का ? सल्ला तर तुम्ही दिलात ?

लोकनाथ : तो विसरून जा ! तुमचा दररोज पाठलाग करणारी आणि तुमचा कुत्रा परत आणून देणारी व्यक्ती एक महान् पुरुष आहे. एक कलंदर कलावंत आहे ! एक भावनाप्रधान धुंद प्रेमिक आहे !

सोनाली : (आनंदून) खरंच ?

लोकनाथ : आणि मुख्य म्हंजे माझा अत्यंत जवळचा मित्र आहे !

सोनाली : असेना का ? माणसात दोष असायचेच !

लोकनाथ : तेव्हा आता तो कुठंही भेटला, तरी त्याच्या थोबाडीत मारायची, अगर त्याला पोलिसात द्यायची गरज नाही.

सोनाली : या प्रामाणिक सल्ल्याबद्दल ते पंचवीस रुपये खिशातच ठेवा. अहाहा, कलावंत ! धुंद प्रेमिक ! जिंदगी प्यार का गीत है...

[नाचत गात बागेत जाते. बाहेरच्या दारातनं आप्पाराव आत येतात.]

आप्पाराव : सगळी बॉक्सा शोधली. भांचोद, प्रत्येक मिठाईच्या बॉक्सात मिठाई ! काय खाऊची आसा ती !

[त्यांच्या पाठोपाठ चंद्रिकाबाई येतात.]

चंद्रिका. : अहो, तुम्हांला काय वेड लागलंय्, की काय ? सगळी मिठाईची बॉक्सेस् उघडून बघताय्, ते !

लोकनाथ : आता मी बघतो ! (जातो.)

चंद्रिका. : म्हंजे काय ? हे चालले, की काय, आता बॉक्सं उघडायला ! चाललंय् काय इथं ?

[सोनाली पुन्हा नाचत गात बागेतून येते... आणि जिन्यानं वर जाते.]

चंद्रिका. : (चकित होऊन) अहो, बघा तरी तिच्याकडे! आत्ता रडत ओरडत होती. आणि आता नाचतेय्! नक्की तिच्या डोक्यावर परिणाम झालाय. पाहिलंत, तुम्ही तिच्या लग्नाचं कुठं बघत नाही, म्हणून आता काय होतंय्, ते!

आप्पाराव : तू आज वाढदिवस केलंस, म्हणान् हो सगळो गोंधळ चाललोहा... आमच्या कोकणात दिवस एकदाच करतंत... तेरावो! तू कित्याक् करतंस वाढदिवस आणि धाडदिवस... उगाच पैशाची नासाडी!

चंद्रिका. : माझाच माहेरचा पैसा नासत्येय् ना? तुमचा नाही! आणि मला काही हौस नाही आल्येय्, वाढदिवस करायची! पण कांहीतरी निमित्तानं पार्ट्या कराव्या लागतात. पोरीला एखादा बरासा लक्षाधीश, कोट्यधीश मिळावा, म्हणून!

आप्पाराव : बरासा! हे कसले बरे लोक! चुलीत घातला एकेकाला, तर एक वेळची पेज नाय जाऊची! यांच्यांत एकजण कोकणचो नाय्!

चंद्रिका. : तुम्ही बसा कोकणाचा जप करीत! आणि पोरगी राहू दे लग्नावाचून!

आप्पाराव : लग्नावाचून बरी राहील? कोकणी माणसाचा तडाखा ठाऊक नाय तुला! फक्त करीन, तर आत्ता नवरा येऊन पडेल माझ्या मुलीसाठी!

[आणि खरंच, त्यांच्या चुटकीनं येऊन पडावा, तसा सदू टेकाडे दारातनं आत येतो.]

चंद्रिका. : तुम्ही? तुम्ही कोण? इकडून कुठून आलात?

सदू : (गर्भगळित होऊन) मी... म्हंजे पुढच्या दारातनं बरीच मंडळी बाहेर पडत होती, म्हणून मागच्या दारानं—

चंद्रिका. : आहात कोण पण तुम्ही?

सदू : मी...मी....

आप्पाराव : (चंद्रिका. ना) तू मोठ्यान् आरडा नुको हां! तो नाव इसारलो, बघ, सोताचा. ऐकलाय, तू घाबरा नुको हांऽ! नीट सांग आठवून...

सदू : (धैर्य गोळा करून) मी ..मी आप्पाराव वाडकर.

चंद्रिका. व आप्पाराव : (आश्चर्याने) काऽय?

सदू : आपलं, तुम्ही वाडकर नाही का! मग मी कसला वाडकर! मी...मी... आठवलं– मी डेकाटे.
चंद्रिका. : डेकाटे ?
सदू : आपलं टेकाडे! सदू...सदू...सदू टेकाडे.
चंद्रिका. : आलात कुठून पण तुम्ही ?
सदू : आम्ही ना? आम्ही कोकणातून!
आप्पाराव : (किंचाळून) कोकणातून! मेल्या, मग असो भेट मारे... पटकी इली ती तुझ्याऽर!

[ हर्षातिरेकाने त्याला मिठी मारतात. ]

चंद्रिका. : आत्ता तुम्ही कोकणातून आलात!
सदू : नाही. आता महालक्ष्मीहून आलो. पण आमचं मूळ गाव कणकवली.
आप्पाराव : कणकवली ? (त्याला पुन्हा मिठी मारतात.)
चंद्रिका. : अहो, घुसमटून मरेल तो! आधीच काय आहे...! हूं! कणकवली, म्हणे ! ( जिन्यानं वर जातात. )
आप्पाराव : तू जातंस कधी कणकवलेक्...!
सदू : कधी कधी जातो.
आप्पाराव : जाऊंक व्हया. माणसाक् आपल्या गावाचो अभिमान व्हयो. तुझां लगीन झालाहा, पेकाटे ?
सदू : ( दुरुस्त करीत ) टेकाडे.
आप्पाराव : (गोंधळून) टेकाडे... म्हंजे !
सदू : म्हंजे... माझं नाव टेकाडे.
आप्पाराव : मग काय झाला !
सदू : नाही. तुम्ही पेकाटे म्हटलंत.
आप्पाराव : असा ! तां कित्याक् !
सदू : ( ओशाळवाणं हसून ) तुम्हांला वाटलं–माझं नाव पेकाटे आहे–
आप्पाराव : काय आहे !
सदू : पेकाटे !
आप्पाराव : ' टेकाडे ' म्हणालास ना आत्ता !

सदू : ' टेकाडे ' आहे–पण तुम्ही म्हणालात, म्हणून मी...

आप्पाराव : कोणी कायय् म्हणांदे...आपण आपला नाव नाय बदलूचा ! अभिमान व्हयो, आपल्या नावाचो ! कोकण्याक् तर व्हयोच व्हयो. खरां का नाय !

सदू : नाही.

आप्पाराव : काय नाही ?

सदू : माझं लग्न झालेलं नाही.

आप्पाराव : मी खय म्हटलां, झालां म्हणान् ?

सदू : तुम्ही विचारलंत मघा. लग्न झाल का, म्हणून. ते झालेलं नाही. पण मला करायचंय्....तुमच्या....

[ सोनाली धावतच खाली येते. ]

सोनाली : मॉम म्हणाली, की खाली एक फेफरं आलेला माणूस आलाय् मी लगेच ओळखलं, की ते तुम्हीच असणार ! खर म्हंजे मीच तुमच्याकडे यायला हवं होतं कालच्या प्रकाराबद्दल तुमची माफी मागायला !

सदू : राहू दे. ती सगळी लोकनाथची चूक होती.

आप्पाराव : हो ना....वस्तू मिठाईच्या बॉक्समध्ये ठेवायची, म्हंजे...

सदू : मिठाईची बॉक्स...?

सोनाली : तुम्ही त्यांच्याकडे लक्ष नका, हो, देऊ !

सदू : नाही देत. तसा मी तुमच्याचकडे आलो होतो. तब्येतीची विचारपूस करायला.

सोनाली : तब्येतीची ? मला कुठं काय झालंय् ?

सदू : तुमच्या तब्येतीची नाही ! तुमच्या कुत्र्याच्या....

सोनाली : ओ...डॉगीच्या ! थॅंक्यू...व्हेरी काइन्ड ऑफ यू...( थाबून ) पण डॉगीला तरी कुठं काय झालंय् ?

सदू : नाही ! मला वाटलं, आज सकाळी असं एकदम धावत सुटल्यामुळं त्याला काही त्रास...

सोनाली : फार प्रेम दिसतंय् तुमचं कुत्र्यावर !

सदू : हो ना ! फारच प्रेम आहे माझं कुत्र्यावर.

सोनाली : ( लाजत लाजत ) माझंसुद्धा फार फार प्रेम आहे !

[ लाजेनं सदूचा चेहरा लालबुंद झालेला. हात रुमालाशी चाळा करण्यात गुंतलेले. कापत असलेल्या पायाचा अंगठा जमीन उकरत असलेला. आणि तोंडानं पुटपुटणं चालू....'माझंसुद्धा फार फार प्रेम आहे...' सोनालीचीही अवस्था साधारण अशीच ! आप्पा कौतुकानं पाहत आहेत. तिघांची अशी समाधी लागलेली असतानाच एकाएकी चंद्रिकाबाई खाली येतात. थबकून, चाललेला प्रकार पाहतात. ]

चंद्रिका. : ( ओरडून ) सोनाली...काय चाललंय् ?

सोनाली : माझंसुद्धा फार फार प्रेम...मॉम...

चंद्रिका : हाच ना तो तुझा कल्पनेतला माणूस ? लाजेनं लाल होणारा, रुमालाशी चाळा करणारा. आणि जमीन उकरणारा ... ?

सदू : मी जमीन उकरणारा नाही...मी चित्रकार आहे, चित्रकार.

चंद्रिका. : ( भयंकर संतापून ) चित्रकार ? म्हंजे लफडेबाज, व्यसनी, कलंदर, कंगाल कलावंत ? दिसतंय् पाहा कसं मरतमढ ! असल्या कृमीकीटकाला द्यायला माझी पोरगी वर आलेली नाही !

सोनाली : मॉ...म !

आप्पाराव : हे बघ, तो आमच्या कोकणातलो...

चंद्रिका. : चूप...! तुम्ही मधे पडाल, तर बघा ! कर्मदरिद्री, बावळट माणसाशी लग्न केल्याचं प्रायश्चित्त मला एक मिळतंय्, तेवढं पुरे !

आप्पाराव : कोण कर्मदरिद्री–बावळट ? मी ?

चंद्रिका. : नाही तर किती नवरे आहेत मला ? खुळचट कुठले ! गप्प बसा ! आणि तुम्ही, हो, टेकाडे का डोंगरे कोण असाल, ते–आत्ताच्या आत्ता या घरातनं चालू लागा. आणि पुन्हा या चंद्रिकाविहार बंगल्यापासून मैल-भराच्या टापूत जरी दिसलात ना, तरी तुमचं बखोट धरून तुम्हांला सरळ तुमच्या त्या कणकवलीच्या खोपटात पोचवून यायला सांगणारेय् मी वॉचमनला....

सोनाली : अग, पण, मॉम...

चंद्रिका. : आणि तू पण आता कशी घराबाहेर पडतेस, ते मी बघते ! उद्यापासनं डॉगीला घेऊन मी जात जाईन. ( सदूला ) काय, हो, अजून तुम्ही

इथेच ! एकदा सांगितलेलं समजत नाही तुम्हांला ! वॉचमन....

सदू : नको....जातो मी ! ( घाईघाईनं जातो. )

सोनाली : ( रडत ) सदू–सदू....

चंद्रिका. : वर चल आधी....

सोनाली : ( पायऱ्या चढता चढता स्फुंदत ) आज माझी सख्खी आई जिवंत असती, तर...

चंद्रिका. : सिनेमातले संवाद म्हणून नकोस. चल वर...

[ दोघी आरडाओरड करीत वर जातात...लोकनाथ बाहेरच्या दारातून आत येतो. ]

लोकनाथ : छे ! रत्नहाराचा बॉक्स गायब ! मग पार्टीच्या लोकांनी रत्नहार मिठाई समजून खाल्ला, की काय, कोण जाणे ! इथं कसली गडबड चालली होती ?

आप्पाराव : जंगी रणधुमाळी ! चंद्रिकाबाई बाडकर ऊर्फ पॅटन रणगाडा हिनं सदू टेकाडेचा धुव्वा उडवला ! लेकाचा पाय लावून पळाला पाठच्या बाजूला....इथं असा...

लोकनाथ : अरे, अरे ! म्हंजे स्ट्रॅटेजी नंबर वन् पार पडली...पण नंबर टू फुकट गेली ! काही हरकत नाही...मारा जोराचा करायला हवा....उद्या पहाटेच सदूला घेऊन जातो, सोनालीच्या भेटीला, पार्कमध्ये !

आप्पाराव : आणि चंद्रिका स्वतःच डॉगीला घेऊन पार्कमध्ये गेली, तर !

लोकनाथ : ( विचार करीत ) तर...तर... मग सदू इथंच येईल उद्या पहाटे. मी त्याला मागच्या बागेत थांबवतो... तुम्ही ऑल क्लिअर झाल्यावर सिग्नल द्यायचा...कसा द्याल ?

आप्पाराव : शिटी वाजवीन...( अत्यंत विचित्र आवाज काढीत ) पुर्रर्र....पुर्रर्र...

लोकनाथ : ( तोंड वाकडं करीत ) नको...हा आवाज काहीतरीच वाटतो... त्यापेक्षा असं करा...सोनाली कुत्रा घेऊन गेली, तर तुम्ही भुंका.... ( आप्पाराव भुंकून दाखवतो. ) शाब्बास...आणि चंद्रिकाबाई गेल्या, तर तुम्ही आरवा....कोको–च–कोऽअसे...

आप्पाराव : को...कोको....च...को ऽ ऽ

[ रविकिरण धावत येतो. त्याच्या हातात मिठाईचं बॉक्स आहे. ]

आप्पाराव : आता ह्येका आणखी खंयचो कुत्रो चावलो...!

रविकिरण : (अतिशय एक्सायटेड्.) कुत्रा नाही चावला... पण भलताच प्रकार घडलाय्! रस्त्यामध्ये तोंडात टाकण्यासाठी मिठाई बरी, म्हणून मी जाता जाता बाहेर कोपऱ्यात पडलेलं एक मिठाईचं बॉक्स उचललं....आणि रस्त्यात ते उघडतो, तर आत काय असेल!

लोकनाथ : ते बॉक्स इकडे आणा, रविकिरण...

रविकिरण : छे छे! मला ते चंद्रिकाबाईंच्या स्वाधीन करायला हवं... (घाईघाईनं वर जाऊ लागतो.) चंद्रिकाबाई चंद्रिकाबाई....

आप्पाराव : थांबा, हो! अहो रविकिरण...(पण तो जातोच.) मेलंय्... आता मी मेलंय्! ठार मेलंय्! तो हार त्या चंडिकेच्या हातात पडलो, की सगळी चौकशी सुरू होतली. पयल्यापासून शेवटपर्यंत...

लोकनाथ : आणि तुमच्याबरोबर माझीसुद्धा...

आप्पाराव : चल, चल...भायेर पड आधी.. खंय तरी दडान् बसू या ..

[ एवढ्यात धाडधाड पायऱ्या उतरून चंद्रिका. येतात. त्यांच्या हातात मिठाईचं बॉक्स आहे. त्यांच्या पाठोपाठ रविकिरण. ]

चंद्रिका. : (संतापलेल्या) हे बघा, रविकिरण...मला तुमच्या खादाडपणाचा अगदी वीट आलाय्. तुम्ही भरल्या पोटावर खायला मिठाईचं बॉक्स कसं उचललत...आणि त्यात कसली मिठाई तुम्हांला सापडली ..असल्या घाणेरड्या वर्णनांमध्ये मला बिलकुल इंटरेस्ट नाही! समजलं?

[ बॉक्स त्याच्या अंगावर फेकून बाहेरच्या दारानं निघून जातात. बॉक्स खाली पडताच उघडतो आणि त्यातला रत्नहार बाहेर पडतो. आप्पाराव तो घाईघाईनं बॉक्समध्ये भरतात, आणि बॉक्स छातीशी कवटाळून अत्यानंदानं, चमत्कारिक आवाजात हसत वर निघून जातात. हतबुद्ध रविकिरण, लोकनाथला काहीतरी स्पष्टीकरण देऊ लागतो... तोच...]

प ड दा

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[दुसऱ्या दिवशी सकाळी. 'चंद्रिकाविहार'मध्ये आप्पाराव कानटोपी घालून बेसूर आवाजात 'रघुपती राघव गजरी गजरी...तोडित बोरे शबरी....शबरी...!' म्हणत येरझारा घालीत आहेत.
चंद्रिकाबाई बागेतून येतात व बाहेरच्या दिवाणखान्यात जाऊ लागतात.]

चंद्रिका. : काय पण सोंग! गाणं म्हणताहेत! अहाहा ऽ!

आप्पाराव : उगाच टेर घेऊ नकोस हां माझ्या गाण्याची. गावच्या देवळात 'मानापमान' केला होता. थेतूर धैर्यधराचो पार्ट केलो होतो मी!

चंद्रिका. : तुम्ही धैर्यधर! म्हणजे ती भामिनी गुपचुप लक्ष्मीधराबरोबरच पळून गेली असणार!

आप्पाराव : काय गायलं होतंय्! काय गायलं होतंय्! एकसारखे नुस्ते वन्स मोर... वन्स मोर! (गाऊ लागतात.) 'चंद्रिका ही जणू ठेवि या...'

चंद्रिका. : उजेड पडला गाण्याचा...! (जातात.)

[जिन्यावरून पायाचा आवाज न करता सोनाली खाली उतरून येते. येतानाच तोंडावर बोट ठेवून, 'बोलू नका'...अशी खूण करते. आप्पाराव तिला खुणेनंच 'कुठं चाललीस?' असं विचारतात. ती खुणेनंच 'बाहेर' असं सांगते. ते त्यावर खुणेनं आणखी काहीतरी विचारतात. ती तशीच खुणेनं उत्तर देते.... बराच वेळ ही खुणांची भाषा चालल्यावर जेव्हा ती जायला निघते, तेव्हा चंद्रिकाबाई अचानक येतात.]

चंद्रिका. : कुठं चालली होतीस गुपचूप?

सोनाली : म्हंजे काय? रोजच नाही का मी या वेळी डॉगीला फिरवायला...

चंद्रिका. : काही नाही जायचं. काल सांगितलं ना तुला... आजपासून मी घेऊन जाणारेय् डॉगीला.

सोनाली : अग, पण डॉगीला सवय नाहीये तुझी! चावला, बिवला तर...

चंद्रिका. : चावू दे, चावला, तर....वाडकर घराण्याच्या अब्रूला कालिमा लागण्यापेक्षा मला कुत्रा चावला, तरी बेहत्तर!

आप्पाराव : असं पाहिजे! चंडिका ही जणू ठेवि या...

चंद्रिका. : पाऊल टाकलंस, तर बघ घराच्या बाहेर! मी आलेच त्या डॉगीला फिरवून!

[जातात.]

सोनाली : (हुंदके देत) पाहिलंत, आप्पा– मॉमनं मला कसं कैदेत टाकलंय्!

आप्पाराव : (एकदम कोंबड्याचा आवाज काढीत) कोको...च...को!

सोनाली : (दचकून) काय म्हणालात?

आप्पाराव : काही नाही! आमचा तो सिग्नल आहे.... (पुन्हा ओरडतात.) कोकोच कोऽ कोकोच कोऽ!

[तशी बागेच्या दारातून सदू टेकाडे आत येतो.]

आप्पाराव : लाईन क्लिअर.... चंद्रिका नॉट हिअर! कोकोऽच कोऽ!

सदू : कोकोऽच कोऽ!

सोनाली : (आप्पारावांना) म्हणजे? तुम्हांला माहीत होतं, हे बागेतच आहेत.... ते...? (आप्पाराव मुंडी हलवतात.) तुम्हांला कसं कळलं....?

आप्पाराव : ते आमचं सीक्रेट आहे! (सदूला) सांगू? सांगू?

सदू : (दोन्ही गालावर थापट्या मारीत 'नाही नाही' अशा खुणा करतो.) नाही हां....सीक्रेट पोटातच ठेवायचं!

आप्पाराव : डॉक्टर म्हणतात, पोटात काय ठेवलं, तर अल्सर होतो....मी सांगतलंय्! त्याचं काय आहे, सोनल्या...लोकनाथनं याला इथं पाठवलं.

सदू : नाही....म्हणजे तसं माझ्याही मनात यायचं होतंच! काल मी एकदम रणांगणातून पळ काढला... म्हणून तुमचा गैरसमज झाला असेल. पण मी तसा काही भि...भि....भित्रा नाहीये हां...! (आप्पारावांना) चंद्रिकाबाई नक्की नाहीयेत ना घरात?

आप्पाराव : नाही!

सदू : मग मी तुम्हांला ठणकावून सांगतो, की आप्पाराव, मला तुमच्या मुलीशी लग्न करायचंय्!

आप्पाराव : पण हिच्या आईची या लग्नाला परवानगी नाहीये ना!

सोनाली : (हिरमुसली.) ती नाहीच देणार परवानगी!

आप्पाराव : अगदी नक्की नाही ना!

सोनाली : नक्की नाही!

आप्पाराव : मग माझी फुल परमिशन! तिनं कशालाही नाही म्हटलं, की आम्ही हो म्हटलंच!

[लोकनाथ येतो.]

लोकनाथ : स्ट्रॅटेजी नंबर टू सक्सेसफुल! प्रेमी जीवांचं मीलन! आता स्ट्रॅटेजी नंबर थ्री...चंद्रिकाबाई लग्नाला कशा तयार होतील?

आप्पाराव : ती नाय तयार होऊंची! तिचा माझ्याशी आधीच लगीन झाला हा!

लोकनाथ : तसं नाही, हो! त्या यांच्या लग्नाला कशा तयार होतील? या प्रश्नाचं एकमेव उत्तर—कुमारी ब्रह्मकुमारी देवी...

सदू : कुमारी ब्रह्मकुमारी देवी? काय करते ही डबलकुमारी?

लोकनाथ : भविष्य सांगते! मी काढलेल्या माहितीप्रमाणे चंद्रिकाबाईचा भयंकर विश्वास आहे तिच्यावर! तेव्हा स्ट्रॅटेजी नंबर थ्री! तिच्यामार्फत चंद्रिकाबाईचं हृदयपरिवर्तन! त्यासाठी आत्ताच मी ब्रह्मकुमारीच्या घरी जाऊन आलो.

सदू : मग? करते म्हणाली हृदयपरिवर्तन?

लोकनाथ : ती घरी नव्हती! इथंच यायला निघालीय्. म्हंजे मी पटकन् लिफ्ट मिळवली आणि आलो. ती नाही ना अजून आली?

सदू : तिला म्हणावं.... चंद्रिकाबाईना सांगा, की सोनालीचं लग्न फक्त स... टे.... अशी आद्याक्षरे असलेल्या चित्रकाराशीच करून द्या...

लोकनाथ : हे फारच ढोबळ होईल! असं का कुणी भविष्य सांगतं?

सोनाली : मग?

लोकनाथ : मी बघतो, तिला काय सांगायचं, ते....

सदू : तू त्या कुमारीला तोंड दे! मी या कुमारीला तोंड द्यायला माडीवर घेऊन जातो....

आप्पाराव : जा. पण चंडिका आली, की छूऽ व्हायला मात्र विसरू नका... मी सिग्नल देईन... कोकोच कोऽ!

सोनाली : हो हो! (दोघं खिदळत वर निघून जातात.)

लोकनाथ : कुमारी ब्रह्मकुमारी देवी, म्हणे! खरं सांगू का, आप्पाराव, मला असल्या कुमाऱ्यांना आणि देव्यांना भेटायला बिलकुल आवडत नाही! ज्योतिष्याच्या नि भविष्याच्या नावाखाली त्या लोकांना गंडवतात. आणि चंद्रिकाबाईसारख्या भाबड्या बायका त्यांच्या भजनी लागतात.

[लोकनाथच्या पाठीमागेच एक जाडसर तरुणी येऊन उभी. तिला पाहिल्यावर आप्पासाहेब लोकनाथला गप्प बसण्याच्या खुणा करू लागतात. पण लोकनाथ बोलण्याच्या रंगात आलेला.]

लोकनाथ : (आप्पारावांना) आता तुम्हीच सांगा ... यांना हे असं कुमारी ब्रह्मकुमारीदेवी...असं डबल कुमारी का लावावं लागतं? त्या कुमारी आहेत, हे एकदा सांगून आपल्याला पटणार नाही, म्हणूनच. की नाही? आणि कसं पटणार? यांचं लग्नाचं वय कधीच टळून गेलेलं असतं. (आप्पारावांच्या हालचाली लक्षात येऊन) तुम्ही का असं तोंड वेडंवाकडं करताय्? बरं नाही का वाटत? (आप्पाराव लोकनाथच्या पाठीमागे उभ्या असलेल्या तरुणीकडे निर्देश करतात ) ह्या...ह्या...ह्या कोण?

तरुणी : मी कुमारी ब्रह्मकुमारी!

लोकनाथ : (चमकून) काय?

तरुणी : आणि तुम्ही म्हणता, तसं माझं लग्नाचं वय टळून गेलेलं नाही. समजलं?

लोकनाथ : हॅं! मग कशा असाल तुम्ही ब्रह्मकुमारी!

आप्पाराव : आहेत, आहेत! तरी मी मघापासून खुणा करतोय्. पण तुमचं लक्ष जाईल तर ना? ब्रह्मकुमारीदेवी, चंद्रिका बाहेर गेलीय्. येईल एवढ्यात. जरा बसा. (जातात.)

लोकनाथ : छे छे! माझा मुळीच विश्वास नाही बसत! कुठं त्या सामुद्रिकासारख्या रूक्ष विषयात लुडबुडणारी ती जडजंबाल बाई, आणि कुठं तुमच्यासार-

सुंदर, आकर्षक, तरुणी !

ब्रह्मकुमारी : हे बघा, उगाच चमचेगिरी करू नका !

लोकनाथ : उगाच कशी करीन ? कारण आहे, म्हणून तर ! (ती रागानं पाहते.) काय, हो, तुम्ही खोटं भविष्य सांगता ना ?

ब्रह्मकुमारी : काय म्हणालात ?

लोकनाथ : म्हंजे बघा....हा एक तरुण आणि एक तरुणी यांच्या सबंध आयुष्याचा प्रश्न आहे !

ब्रह्मकुमारी : हे पाहा, तुम्ही अधिक फाजिलपणा केलात ना, तर मी सरळ पोलिस स्टेशनला फोन करीन ! मला अशीतशी समजू नका !

लोकनाथ : तुमचा हा तेजस्वीपणा मला फार आवडला ! माझं काम तुम्हीच करू शकाल, याची मला...

ब्रह्मकुमारी : आता जाता, की करू पोलिस स्टेशनला फोन....!

लोकनाथ : बरं बरं... तुमचा मूड सुधारेपर्यंत मी बागेत थांबतो. तुम्ही इथंच बसा, चंद्रिकाबाईंची वाट पाहत !

[ बागेत जातो. दुसऱ्या दारातून इन्स्पेक्टर घोंड साध्या वेषात येतात. ]

इन्स्पेक्टर : नमस्कार ! आपण कुमारी ब्रह्मकुमारी देवी का ?

ब्रह्मकुमारी : हो, काय काम आहे ?

इन्स्पेक्टर : आपली कीर्ती फार ऐकलीय्.

ब्रह्मकुमारी : हो ! मी त्रिकालज्ञानी आहे. मर्त्य मानवांना मी अध्यात्माचं मार्गदर्शन करते. ज्योतिष सांगते. वर्तमानपत्रात राशिभविष्य लिहिते....

इन्स्पेक्टर : छान छान ! तुमच्या घरी जाऊन आलो. तिथं कळलं, की तुम्ही इथं आला आहात. तुमचं मार्गदर्शन घेण्याची फार इच्छा होती...

ब्रह्मकुमारी : असं ? पण अतिशय श्रीमंत लोकांनाच माझं मार्गदर्शन परवडतं. मी एका वेळेचे पाचशे रुपये घेते.

इन्स्पेक्टर : घ्या ना.... (तिला पैसे देतो.) कधीपासून तुम्हांला हात दाखवण्याची इच्छा होती....

ब्रह्मकुमारी : (त्याचा हात पाहत) एका विलक्षण कर्तबगार पुरुषाचा हात आहे हा !

इन्स्पेक्टर : मग, ब्रह्मकुमारीबाई, आता पाहाच माझी कर्तबगारी! (बिल्ला दाखवीत) मी इन्स्पेक्टर धोंड! कसलाही अभ्यास नसताना, श्रीमंतांना खोटी भविष्यं सांगून पैसे उकळण्याबद्दल तुम्हांला अटक करायला आलोय् मी!

ब्रह्मकुमारी : (ओरडत) सोडा, मला सोडा... ! धावा, हो, धावा....मला वाचवा!

[लोकनाथ धावत येतो.]

लोकनाथ : कोण? इन्स्पेक्टर धोंड? तुम्ही माझ्या–या लोकनाथ लुकतुकेच्या–मैत्रिणीला अटक करताय्?

इन्स्पेक्टर : ही तुमची मैत्रीण! अरेरे! मग हिला सोडून देऊ, म्हणता!

लोकनाथ : बाय ऑल मीन्स! इन्स्पेक्टर, कालची कविता पुरी झाली असली, तर घेऊन या...कधीतरी...

इन्स्पेक्टर : येस्, सर! गुड डे, सर! (जातो.)

ब्रह्मकुमारी : तो खराखुरा पोलिस इन्स्पेक्टर आहे!

लोकनाथ : नाही तर काय पेंढा भरलेला आहे?

[इन्स्पेक्टर परत येतो.]

लोकनाथ : आता काय राहिलं?

इन्स्पेक्टर : माझ्या खुणेच्या नोटा–

[ब्रह्मकुमारी नोटा देते. इन्स्पेक्टर जातो.]

ब्रह्मकुमारी : (लोकनाथला) आज तुम्ही नसता, तर माझी धडगत नव्हती!

लोकनाथ : का? मघाशी तर तुम्ही मला पोलिसात द्यायला निघाला होता!

ब्रह्मकुमारी : आणि तुम्ही ते मनात न ठेवता माझ्या हाकेला धावून आलात!

लोकनाथ : असहाय तरुणींच्या रक्षणासाठी प्राध्यापक लोकनाथ लुकतुके आपल्या सर्व शक्तीनिशी धावून जातात!

ब्रह्मकुमारी : आणि मी तर अगदीच असहाय आहे, हो! अख्ख्या मुंबई शहरात मला कुणाचाच आधार नाही...मी एकटीच आहे!

लोकनाथ : तसं म्हटलं, तर मला तरी दुसरं कोण आहे!

ब्रह्मकुमारी : बोलूनचालून तुमच्यासारख्याच्या मैत्रीचाच मला आधार आहे. लुकतुकेसाहेब—

लोकनाथ : मला लुकतुकेसाहेब म्हणू नका, हो ! नुसतं लोकनाथ म्हणा ! लोक समजत नसाल, तर नुसतंच नाथ म्हणा !

ब्रह्मकुमारी : ना ऽ थ !

लोकनाथ : ब्रह्मा ऽ

[ आप्पाराव येतात. ]

आप्पाराव : आं... ? मघाशी ही दोघं एकमेकांना फाडून खात होती ना ! आणि आता... ? हूं.... !

लोकनाथ : चल, ब्रह्मा, आपण बागेत जाऊ. तिथं मी तुला माझी स्ट्रॅटेजी नंबर थ्री सविस्तर समजावून देतो.

आप्पाराव : जावा–जावा, बागेत जावा !

[ विचित्र आवाज काढून हसत राहतात. ती दोघं बागेत जातात. त्यांच्यांत गुंतल्यामुळं आप्पारावना चंद्रिकाबाई पाठीमागे येऊन उभ्या राहिल्याचं लक्षात येत नाही. मग ते हसत हसत वळतात, आणि... ]

आप्पाराव : आं...तू एवढ्यात इलंस ? मी बघितलां नाय तुका येताना ! आता काय करूचा ? ( अचानक ओरडून ) कोकोच...को ऽ !

चंद्रिका. : ( दचकून ) आं... ? वेड लागलं, की काय, तुम्हांला ?

आप्पाराव : ( ओरडून ) कोकोच कोऽ ! ( चंद्रिकाबाईंना ) तू जरा थंय चल बघू या दिवाणखान्यात. ती तुझी ब्रह्मकुमारी इली आसा... चल दाखवतंय्....

[ जिन्यावरून सदू चोरपावलांनी उतरून जाऊ लागतो... त्याच्यामागे सोनाली दबकत दबकत येते. आप्पाराव 'कोकोच ....को ऽ' असं ओरडत, सदूच्या दिशेचा हात ट्रॅफिक पोलिस हलवतात, तसा हलवीत चंद्रिकाबाईंना दिवाणखान्यात घेऊन जातात.
पण सदू आणि सोनाली सटकू लागणार, इतक्यात चंद्रिकाबाई परत येतात. ]

चंद्रिका. : (आप्पारावांना) मला काय इतके मूर्ख समजलात तुम्ही? कोंबड्यासारखं आरवताय्.... म्हंजे नक्की काहीतरी कारस्थान आहे तुमचं! (सदूला आणि सोनालीला पाहून) स्टॉप! हॅण्ड्स् अप्! असाल, तिथं उभे राहा! (आप्पांना) हेच–हेच तुमचं कारस्थान, की नाही? (सदूला) आणि काय, हो, काल तुम्हांला घालवून दिलं, तरी आज परत आलात चटावलेल्या बोक्यासारखे?

सदू : नाही–मी–बोक्यासारखा कुठं! पण मी.... आपलं....

चंद्रिका. : तत पप करू नका... काय? विचार काय आहे तुमचा?

सदू : विचार म्हंजे... विचार!.. तुम्ही हे असं एकदम ओरडून बोलता ना... त्यामुळं माणसाचा धीर-धीर जरा खच-खचतो. पण, चंडिकाबाई, आपलं चंद्रिकाबाई... मी तुम्हांला एकदाच आणि अखेरचं... म्हंजे एकदम फायनल सांगतो, की मी आणि सोनाली लग्न करणार आहोत!

चंद्रिका. : काय म्हणालात?... परत बोला!

सदू : परत कसं बोलणार? एकदा फायनल सांगितलं ना? तुम्हांला ऐकायला जरा कमी येतं का?

चंद्रिका. : मला कमी ऐकू येत नाही.... तुम्ही बोलताय् मात्र जास्त! तुमच्यासारख्या दीडदमडीच्या, मासिकांत चित्रं काढणाऱ्या दळिद्री चित्रकाराची हिंमत तरी कशी झाली, सरदार वाडकरांच्या घराण्यातल्या मुलीला मागणी घालण्याची? तिचं लग्न रविकिरण रत्नपारखींशीच होणार, समजलात?

सोनाली : प्राण गेला, तरी मी त्या उघड्या तोंडाच्या कचऱ्याच्या पेटीशी लग्न करायची नाही. चल, सदू, आपण दूर दूर जाऊ!

चंद्रिका. : कुठं निघालात?

सोनाली : जिथं मुलींवर जुलूम–जबरदस्ती करणाऱ्या दुष्ट सावत्र आया नसतील, तिथं!

[ ती आणि सदू दिवाणखान्याच्या दारानं जातात. ]

चंद्रिका. : सोनाली– त्या भुरट्या चित्रकाराबरोबर तू... त्याच्याबरोबर...

[ चंद्रिकाबाई त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागतात. एवढयात बागेच्य दारातून ब्रह्मकुमारी घाईघाईनं येते.... ]

ब्रह्मकुमारी : भयंकर, चंद्रिकाबाई, सिम्पली भयंकर...
चंद्रिका. : अहो, काय भयंकर ?
ब्रह्मकुमारी : हाच.. तुमच्या सोनालीच्या लग्नाचा प्रॉब्लेम !
चंद्रिका. : अगबाई, तुम्हांला कसं कळलं ? खरोखरीच त्रिकालदर्शी, हो, तुम्ही !

[ पटकन् पाया पडते. ]

ब्रह्मकुमारी : एका जाडगेल्या श्रीमंत माणसाबरोबर तुम्ही तिचं लग्न ठरवताय्. आद्याक्षरं—र...र....
चंद्रिका. : नीट पार पडेल ना ते लग्न...?
ब्रह्मकुमारी : नाही ! चंद्रिकाबाई, माझ्यानं सांगवतसुद्धा नाही ! इतकं भयंकर भविष्य दिसतंय् मला... हे लग्न झालं, तर लग्नाच्या पहिल्या रात्रीच नवऱ्या मुलाचा अपमृत्यू होणार ! अजीर्णानं !
आप्पाराव : अगदी पटण्यासारखं आहे !
चंद्रिका. : तुम्ही गप्प बसा ! ब्रह्मकुमारी देवी, हे संकट टळण्यासारखं नाही का ? म्हंजे समजा, त्या दिवशी नवऱ्या मुलाला सक्तीनं उपाशीच ठेवलं, तर...?
ब्रह्मकुमारी : त्या दिवशी उपाशी ठेवलं, तरी तो आठवडाभरात अजीर्णानंच मरणार...
आप्पाराव : कधीही मेला, तरी तो अजीर्णानंच मरणार !
चंद्रिका. : पण, ब्रह्मकुमारीदेवी, मग सोनालीचं लग्न करायचं तरी कोणाशी ?
ब्रह्मकुमारी : मला तरी तिच्या नशिबात एक चित्रकार दिसतोय् !
चंद्रिका. : ( संशयानं ) म्हंजे ? सोनालीचं प्रकरण तुम्हांलासुद्धा कळलं, की काय ?
ब्रह्मकुमारी : छे, छे ! मला कुठून कळणार ? हे केवळ त्रिकालज्ञान ! बाकी माझा काही संबंध नाही, हो !

[ घाईघाईनं बागेत जाते. ]

चंद्रिका. : काय भयंकर भविष्य सांगून गेली ही ब्रह्मकुमारीदेवी ! ( आप्पारावांना ) यात सगळा दोष तुमचा आहे !

आप्पाराव : माझो ? तो रविकिरण अजीर्णान् पोट फुटान् मरतलो, यात माझो खंयचो दोष ?

चंद्रिका. : त्यात नसेल. पण तो दुसरा लुंगासुंगा सोनालीच्या भोवती घुटमळतोय्, तो–

आप्पाराव : हां... तो बाताडे !

चंद्रिका. : बाताडे नाही.... टेकाडे ! त्याला मारे कोकणातला म्हणून मिठ्या मारल्यात... आता निस्तरा...

[ सदू आणि सोनाली येतात. ]

सोनाली : आमचं सगळं आता पक्कं ठरलंय्. पंधरा दिवसांच्या आत आम्ही लग्न करून टाकणार आहोत.

चंद्रिका. : आता ब्रह्मकुमारीनंच सांगितलं, म्हणून– नाहीतर मी जन्मात दिली नसती तुमच्या लग्नाला परवानगी !

लोकनाथ : पण मी म्हणतो, चंद्रिकाबाई, ती ब्रह्मकुमारी लाख सांगेल...आपण ठेवायचा कशाला तिच्या भविष्यावर विश्वास.... ?

चंद्रिका. : नाही, हो ! असं भलतंसलतं बोलू नका. त्रिकालज्ञानी आहे ती...तिचं भविष्य हटकून खरं ठरतं ..

लोकनाथ : मग काय ? नाइलाजच आहे ! सोनालीचं लग्न करून द्यायलाच हवं या फाटक्या चित्रकाराबरोबर !

चंद्रिका. : नुसतं लग्न करून देऊन उपयोग काय ? ही मसणी वाढलीये लाडांत... हिचा खर्च या भंगार माणसाला परवडणारेय् ?

सोनाली : त्याची तू बिलकुल काळजी करू नकोस, मॉम् ! आम्ही सगळा विचार करून ठेवलाय् ! आप्पा मला लग्नात माझ्या आजीचा रत्नहार देणारेय्त. लग्नानंतर तो मी लगेच विकून टाकणारेय्.

आप्पाराव : रत्नहार विकणार ? ( त्यांना ठसका लागतो. )

सोनाली : मग ? त्याचे सहज दोन–तीन लाख रुपये येतील ! येतील ना, आप्पा ?

आप्पाराव : येतील ! येतील...( खोकतात. )

चंद्रिका. : तुम्हांला काय झालं एकदम खोकत सुटायला ?
आप्पाराव : नाही–पण रत्नहार विकायलाच हवा का ?
सोनाली : नाहीतर उपयोग काय त्याचा ? तिजोरीतच पडून राहणार तो ! त्यापेक्षा विकून टाकला, तर नुसत्या त्याच्या व्याजावर आमचा संसार मजेत चालेल. होय, की नाही, रे सदू ?
सदू : प्रश्नच नाही !
सोनाली : मग, मॉम–आता करायची ना लग्नाची तारीख पक्की ?
चंद्रिका. : करायलाच हवी ! नाहीतर तुझा काय भरवसा ! पळूनसुद्धा जाशील तू लग्नाशिवाय तशीच !

[ सदू, सोनाली आणि चंद्रिकाबाई वर जातात. आप्पाराव कपाळावर हात मारीत खाली बसतात... ]

लोकनाथ : काय झालं, आप्पाराव ?
आप्पाराव : बुडालंय् ! बुडालंय्....ठार बुडालंय् ! लोकेश्वरा....मोठो पुढाकार घेवून तू ह्या लगीन जमयलंस ! आता तुका तां मोडूक येत ?
लोकनाथ : काहीतरी अभद्र काय बोलता ?
आप्पाराव : अभद्र होऊची पाळी इली हा, म्हणानच अभद्र बोल्तंय् ! आता लगीन उभ्या रवतंला–माका रत्नहार देऊचो पडतलो ! लगीन झाल्याबरोब्बर सोनल्या रत्नहार विकूक जातंला ! आणि मग ?—
लोकनाथ : मग काय ?
आप्पाराव : मगे रत्नहार बदललेलो, डुप्लिकेट आसा, ह्यां सगळ्या दुनियेक् समजतंला आणि माझी फटफजिती जातंली ना...य ? मगे... ? आता तूच काय तो रस्तो काढ ह्येच्यातसून !
लोकनाथ : तुम्ही असं करा–आप्पाराव, तुम्ही असं करा–तुम्ही असं करा–

[ सटकतो. तो गेल्याचं लक्षात येताच आप्पाराव त्याच्या मागे पळत सुटतात. ]

**का ळो ख**

## प्रवेश दुसरा

[ आणखी पंधरा दिवसांनंतर पाच वाजण्याचा सुमार. सदू टेकाडेचा फ्लॅट. फ्लॅट रिकामा आहे. लॅच–की लावून दार उघडलं जातं आणि गजा व माला आत येतात. माला ही काळीसावळी, पण अतिशय चुणचुणीत मुलगी, बोलणं थोडं भडक. ]

गजा : हं... माला, हे आपलं काश्मीर !

माला : काश्मीर म्हंजे ?

गजा : म्हंजे उद्या सदूशेठचं लग्न ! सकाळी दहा वाजता चंद्रिकाविहारमध्ये.

माला : आणि आपलं लग्न– दुपारी दोन वाजता...पुणतांबेकरांच्या शुभमंगल कार्यालयात. एक मंगळसूत्र आणि एक पेढ्यांचा पुडा यांच्यासकट एकावन्न रुपयांत !

गजा : लग्न झालं, की माझा मालक हनिमूनला काश्मीरला ! आणि माला आणि मालाचा मालक हनिमूनला, इथं !

माला : अस्सं ! म्हणून हे आपलं काश्मीर !

गजा : आणि हनिमून संपला, की आपण... ( कात्री चालवल्याप्रमाणे ) कच् कच् कच्, कच् कच् !

माला : म्हंजे खिसे कापायचे ! होय ना !

गजा : खिसे नाही कापायचे ! टेलरिंग शॉप काढायचं. माला, इतके दिवस आपण चोर म्हणून लोकांचे खिसे कापले ! आता, शिंपी होऊन खिसे शिवून देऊ ! हवं तर ते शिवताशिवता गिऱ्हाइकाचा खिसा कापू !

माला : ( खट्टू होऊन ) तुझं अगदी पक्कंच झालेलं दिसतंय् टेलरिंग शॉपचं !

गजा : किती समाधान आहे, माला, असं सभ्य माणसासारखं जगण्यात—

माला : –बावळटपणा आहे !

गजा : नाहीतर ते पोलिसांना चुकवायचं – चोरीचा माल विकायचा – एकसारखी धास्ती–कधी कोण पकडेल, याची ! माला, पेन जागेवर ठेव... आपलं नाहीये ते...

माला : पेन ! कुठाय् पेन !

गजा : तुझ्या पोलक्यात !

माला : ( आश्चर्य व्यक्त करीत ) च्याआयला ! तिकडे कसं गेलं ते ?
गजा : अगदी भलत्याच सफाईनं गेलं. पण, माला, आपलं काय ठरलंय् ? आता ती सफाई विसरून जायची !
माला : ( नाइलाजानं पेन जागेवर ठेवीत ) इतक्या लहान वयात धंदा बंद करायचा ? आणि तोही संसाराला पैशाची गरज असताना ?
गजा : पण, राणी, विचार कर– लग्नानंतर, उचलेगिरी करताना तुला पोलिसांनी उचललं, तर...
माला : तर काय, मी नेहमीसारखी सुटेन. ( डोळ्यात पाणी आणून ) साहेब, माझी म्हातारी आई कॅन्सरनं अंथरुणाला खिळली आहे !
गजा : माला, तुझी आइ दहा वर्षांपूर्वी वारली !
माला : अरे, पण आई म्हटलं, की कुणाच्याही डोळ्यांत टचकन् पाणी येतं. ( पुन्हा ॲक्टिंग करीत ) साहेब, आईच्या औषधाला पैसा नाही, म्हणून हे पाप करावं लागलं मला. साहेब, गेले तीन दिवस तिच्या पोटात अन्नाचा कण...
गजा : बस बस ! माझ्यानं नाही ऐकवत तुझ्या आईचे हाल ! माला, घड्याळ खाली ठेव ! ते आपलं नाही ! शिवाय नादुरुस्त आहे.
माला : मी जातं, गजा– संध्याकाळी भेटूच. आपल्या नेहमीच्या ठिकाणी.
गजा : थांब, ग... एवढी घाई काय आहे ?
माला : जरा दोन-चार दुकानांतनं चक्कर मारून येते. हीच वेळ गर्दीची !
गजा : बघ, माला– मी तुला काय सांगतलय् ?
माला : अरे, पण उद्या लग्न...आणि चार वस्तूसुद्धा जमवायला नकोत ? तू अजिबात घाबरू नकोस. मी बरोबर काळजी घेईन !

[ बोलता बोलता टेबलवरचा शोभेचा चंदेरी घोडा पर्समध्ये टाकून पसार होते. गजा थोडी आवराआवर करतो. पोस्टमन फटीतून पत्रं टाकतो, ती उचलून ठेवतो. टेबलवर सदूच सिगारेटचं पाकीट पडलेलं दिसतं. त्यातली एक सिगारेट काढून ओठात ठेवणार, इतक्यात विचार बदलून ती परत पाकिटात ठेवतो. पश्चात्तापानं, ती उचलणाऱ्या हातावर दुसऱ्या हातानं फटके मारतो. एवढ्यात दारावरची बेल वाजते. गजा दार उघडतो. लोकनाथ घाईघाईनं आत शिरतो. ]

लोकनाथ : लावून घे दार. तो म्हातारा येतोय्.

गजा : कोण म्हातारा?

लोकनाथ : आपल्या सदूचा सासरा व्हायचाय् तो, रे! आप्पाराव! त्याला चुकवण्यासाठी मी इथं आलो. दार लाव, म्हणतो ना—

[ गजा दार लावू लागतो. पण त्याला बाजूला करून आप्पाराव घुसतात. ]

आप्पाराव : लोकमान्या—मी आधी काय करू, तां सांग...लगीन उद्यावर इला! उद्या माझी अब्रू जाईल, रत्नहार खोटो म्हटल्या ऽ र!

लोकनाथ : मी काय सांगितलं होतं तुम्हांला? शेअर्स विकून टाका आणि गहाण ठेवलेला रत्नहार सोडवून घ्या! बस्! त्यात एवढं काय कठीण आहे?

आप्पाराव : सांगितलास तां खऱ्या. म्हणून मी.... ( पिशवीतून शेअर सर्टिफिकेटस् काढून दाखवीत ) हे शेअर विकूक् गेलं होतंय्...

लोकनाथ : ( शेअर्स पाहत ) अनियन कार्बाइड? या कंपनीचे शेअर्स घ्यायला कुणी सांगितलं तुम्हांला?

आप्पाराव : रविकिरण रत्नपारखीनं!

लोकनाथ : रविकिरणनं? मग बरोबर आहे! अहो, नुकताच त्या कंपनीत स्फोट झाला न् कंपनी बंद झाली! आता या शेअर्स सर्टिफिकेटांचे पतंग करा पतंग!

आप्पाराव : माका जरा निराळो सल्लो दिल्यानी. म्हणाले, या कागदांच्यो सुरळ्यो करा, आन् घाला...

लोकनाथ : पिशवीत! मग आता नाद सोडा रत्नहाराचा.

आप्पाराव : मी खूप नाद सोडीन. पण त्या सोनला आणि चंडिका, रत्नहार खोटो आसा, ह्या कळल्यावर माझो प्राण घेतल्याशिवाय रवतीत?

लोकनाथ : मग असं करा— ( विचार करीत ) हां....रत्नहार नाहीसाच करा. म्हणावं, चोरानं चोरला....

आप्पाराव : नायसो करतलंस कसो! रत्नहार माझ्याजवळ नायच हा!

लोकनाथ : तुमच्याजवळ नाही? म्हंजे गेला कुठं? कालपर्यंत तर तुमच्याचकडे होता.

आप्पाराव : काल होतो. आज नाय्! उद्या लगीन, म्हणान् चंडिकेन् ताब्यात घेतलोहा. सोनालीक् देऊच्या सामानात ठेवूच्यासाठी!

लोकनाथ : म्हंजे आता नुसता चोरीला गेला, असं सांगून चालणार नाही! खराच चोरीला जायला हवा...

आप्पाराव : चोरीक् कसो जातलो? तू चोरशीत!

लोकनाथ : (चमकून) मी? छे छे! काहीतरीच काय? माझं काम तुम्हांला मार्ग दाखवायचं. चोऱ्यामाऱ्या करण्याचं नाही! चोर कोण शोधायचा, तो तुमचा तुम्हीच शोधा. मी येतो! माफ करा! मी फारच घाईत आहे. (जातो.)

आप्पाराव : चुकचुके, अरे चुकचुके! गेलोच हो! आता चोर खंयसून शोधूचो? सगळया नुसत्या रेमूक्या डेमूक्या झालां. (विचारात पडतो.)

[ एवढ्यात दारावरची बेल वाजते. गजा दार उघडायला जातो.]

आप्पाराव : (विचारातच) वाडकरांचो रत्नहार चोरूचो, म्हंजे तां असातसा काम नाय त्येका पट्टीचो चोर व्हयो!

[ इन्स्पेक्टर घोंड आत येतात. पाठोपाठ गजा...]

आप्पाराव : आं...? चोराचा नाव काढल्याबरोबर पोलिस हजर...?

गजा : लुकतुकेसाहेब आत्ताच गेले! थोडक्यासाठी चुकामूक झाली!

इन्स्पेक्टर : मला त्यांना कविता दाखवायची होती! बरं, येतो तर मी! (जाऊ लागतो.)

आप्पाराव : इन्स्पेक्टरसाहेब, जरा बसा तर खरं! (गजाला) जा, दोन कप चहा घेऊन ये!

[ गजा जातो. ]

आप्पाराव : (टेबलवरचं सदूचं सिगरेटचं पाकीट उघडून समोर धरीत] घ्या... सिगरेट घ्या! तुमचं नाव काय म्हणालात?

इन्स्पेक्टर : घोंड...(सिगरेट घेऊन पेटवतो व ओढू लागतो.)

आप्पाराव : घोंडोपंत, कोण बरेशे चोरबीर आसत तुमच्या बघण्यात!

इन्स्पेक्टर : अहो, चोरांना काय तोटा? आपल्याभोवती...आजूबाजूला वाट्टेल तेवढे चोर असतात! आपल्याला ठाऊक नसतं, एवढंच! आता हाच इथला नोकर घ्या...दार उघडलं, तो हो! तुम्हांला वाटेल तरी का, की हा एकेकाळचा अट्टल चोर होता, म्हणून—?

आप्पाराव : काय, सांगतास काय...? चोर? खऱ्यानी...?

इन्स्पेक्टर : म्हंजे.... आता सुधारलाय् तो! पण एकेकाळचं सांगतोय्!

आप्पाराव : काय, हो, हे लोक आपली आपणच चोरी करतात, की दुसऱ्यांसाठी, पण...?

इन्स्पेक्टर : दुसऱ्यासाठी पण ऑर्डर घेतात...चोरीची! त्याला सुपारी म्हणतात ते.

आप्पाराव : सुपारी? म्हंजे तिच्यात पण प्रकार असतील! चिकनी सुपारी, खडे सुपारी, हाराची सुपारी—

इन्स्पेक्टर : तसं नाही. सगळ्याला सुपारीच म्हणतात. बरेच पैसे घेतात. दोनशे रुपये, तीनशे रुपये .

आप्पाराव : अरे बाप रे!...आपल्याजवळ नाहीत एवढे पैसे! इन्स्पेक्टर घोंगडे–तुम्ही त्या कुठल्याशा गॅस कंपनीबद्दल अलीकडे पेपरात आलं, ते वाचलंय् . ?

इन्स्पेक्टर : अलीकडे पेपर वाचायला वेळ कोणाला होतोय्? सकाळी उठलो, की ड्यूटीवर जाईपर्यंत मी कविता करीत बसतो!

आप्पाराव : मग छान! (पिशवीतून शेअर्स काढून दाखवीत) पेपरात असं आलं होतं, की ही कंपनी सध्या भलतीच फॉर्मात आहे–तिच्या शेअर्सची किंमत दिवसेंदिवस वाढत चाललीय्. हे सगळे तीन लाखांचे शेअर्स–आता त्यांची किंमत सहज (मोजल्यासारखं करीत) पावणेचार लाख झाली असेल! पण कागदाची किंमत पावणेचार लाख असून उपयोग काय? माझ्या खिशात आत्ता दमडी नाय!

इन्स्पेक्टर : बघू! (शेअर्स पाहिल्यासारखं करीत) मग हे का नाही तुम्ही विकून टाकीत!

आप्पाराव : मी म्हातारा कुठं जाऊ शेअर्स विकायला?

इन्स्पेक्टर : समजा– मी तुम्हांला तीनशे रुपये दिले, तर द्याल हे मला...?

आप्पाराव : तीनशे?

इन्स्पेक्टर : हो! आत्ता तेवढेच आहेत माझ्या खिशात!

आप्पाराव : अहो, पावणेचार लाख रुपये कुठं आणि तीनशे कुठं? मला फसवताय् तुम्ही!

इन्स्पेक्टर : पाहा, बुवा! तीनशे कमी असले, तरी आता तुमच्या कामाला येतील. नायतर ते कागद हयातभर उशाशी ठेवून त्याचा तुम्हांला फायदा काय? उगाच दुसऱ्या कोणाची तरी धन!

आप्पाराव : बघा हां– मला व्यवहारातलं काही कळत नाही! तुम्ही मला फसवत तर नाही?

इन्स्पेक्टर : कमालच करता! पोलिस इन्स्पेक्टर कधी कोणाला फसवेल? (त्यांना शंभराच्या तीन नोटा काढून देतो.) हे घ्या. रोख तीनशे हां. आता या ट्रान्सफर डीडवर सही करा. (आप्पाराव सही करतात.) छान सौदा झाला! म्हातारबुवा, जन्मभर माझी आठवण काढाल. जातो मी!

[शेअर सर्टिफिकेट्स घेऊन घाईघाईने जातो. आप्पाराव विचित्र आवाजात हसत गाणं गुणगुणत नोटा पाकिटात ठेवतात. ट्रेमध्ये दोन चहाचे कप घेऊन गजा बाहेर येतो.]

गजा : हे काय, इन्स्पेक्टर गेले? मग एक कप—

आप्पाराव : अरे, त्यात काय? तू पिऊन टाक. बस, बस इथं, आणि पी चहा.

गजा : पिऊ? पण काय, हो? इन्स्पेक्टरांसाठी केलेला चहा, मालकांना न सांगता पिऊन टाकला, तर ती चोरी नाही ना होणार?

आप्पाराव : बिलकुल नाही! सुपारी घेणार का, बोल!

गजा : वा–चहाबरोबर सुपारी! आणा इकडे मी फोडून देतो.

आप्पाराव : पण या कानाचं त्या कानाला कळता कामा नये. माझ्या घरातल्याच चोरीची सुपारी देतोय्! फोडशील ना ती?

गजा : बाप....रे! तसली सुपारी? मला वाटलं, खायची!

[माला गच्चीच्या खिडकीमधून आत येते. चंदेरी घोडा ठेवते व गुपचूप परत जाऊ लागते. तिच्याकडे पाठ असल्यामुळे या दोघांनाही ती दिसत नाही.]

ग्रं. क्र. २९८२५ नों. दि. ३।८।८८
वि. ...आंटणुं... क्र. ................



आप्पाराव : फक्त एक चोरी! बस्, फार मोठी नाही. छोटीशी, छानशी, सुंदरशी चोरी!

[ माला हे ऐकून थांबते आणि फर्निचरच्या आड दडून पुढचं बोलणं ऐकते. ]

गजा : चोरी! आणि मी! नाही, रे, बुवा...आपण आता कम्प्लीट सुधारलोय्. आपल्याला कोणी टाकसाळीत नेलं, तरी आपण तिथला एक पैसा उचलणार नाही.

आप्पाराव : बघ....तीनशे रुपये देईन.

गजा : नाही म्हटलं ना एकदा? तीनशे रुपये नाही, अगदी तीन हजार रुपये दिलेत, तरी मी चोरी करणार नाही, म्हंजे नाही! आणि तुम्ही आमच्या सदूशेठचे सासरे, म्हणून इतका वेळ तुमची इज्जत ठेवली. दुसरा कोणी असता, तर त्याला सरळ हाताला धरून पोलिसात दिला असता.

[ त्वेषानं, चहाचे कप उचलून किचनमध्ये जातो. ]

आप्पाराव : काय दिवस इले! चोराचे पाय धरूक् लागतंहत. बाबा रे, चोरी कर, म्हणान्! म्हणतंत, मी नाय चोरी करूचंय्! कोकणात कोण असा म्हणात? नाव नको.

माला : ( लपल्या जागेवरून बाहेर येत ) मला सांगा, कसली चोरी करायचीय् तुमच्याकडे?

आप्पाराव : ह्या कोण? बाईच्या कपड्यांतलो शायडी का काय? छ्याः! कोण सांग-ताहां चोरी करूक्! हॅ– उगाच काय तां!

माला : झटकायचा प्रयत्न करू नका. मी सगळं ऐकलंय्. चोरी करायला गजा तयार नसला, तरी मी तयार आहे.

आप्पाराव : जा जा, पोरी...तुला हे काम जमायचं नाही. त्यासाठी गजासारखा अट्टल चोरच हवा. तीनशे रुपये रोख मोजतलंय्...हां उगीच नाय.

माला : हट्– तीनशे रुपये काय असणार तुमच्याकडे!

आप्पाराव : दाखवले, तर...!

माला : शक्यच नाही. दाखवा ना, दाखवा !

[ आप्पा खिसे चाचपतात. पाकीट मिळत नाही. ती हसते. ]

आप्पाराव : आत्ता तर होतं.

माला : तुमचं पाकीट इकडे आहे, आजोबा. (पाकीट दाखवते.) क्यों ? कैसी है मेरे हाथकी सफाई ?

आप्पाराव : फॅन्टॅस्टिक ! खरंच भलता हुशार आसंस हां तू ! तू माझा काम नक्कीच करतलंस.

माला : (पाकिटातल्या नोटा काढून घेऊन पाकीट त्यांच्या अंगावर फेकत) सॉरी, या कामात पैसे आगाऊ घ्यावे लागतात. नाहीतर चोरांनासुद्धा ठकवणारे महाचोर भेटतात आम्हांला. हां, आता बोला– काम काय आहे ?

आप्पाराव : माझ्या मुलीचं उद्या लग्न आहे. मलबार हिलवरच्या 'चंद्रिकाविहार' बंगल्यात. मुलीच्या आईला जावई फारसा पसंत नाही. म्हणून लग्न वरच्या घरीच, जास्त कुणाला न बोलावता व्हायचंय्! मुलीला लग्नात द्यायच्या सामानाची ट्रंक माडीवर असेल ! तिच्यातला रत्नहार तू चोरायचास.

माला : बरं ! हा सगळा गोंधळ व्हायचाय् कधी ?

आप्पाराव : उद्या सकाळी ! दहाच्या सुमारास. घराच्या बागेतल्या दरवाज्यानं तू यायचंस आणि रत्नहार घेऊन...हां ऽ

माला : मी सगळं बरोबर करते. ( आतल्या बाजूला अस्वस्थपणे पाहत ) आता निघा तुम्ही. (गजा बाहेर येतो, त्याला ) निघालेच आहेत ते.

[ आप्पाराव जातात. ]

गजा : तू कशी आलीस एवढ्यात परत ?

माला : घोडा, रे ! चुकून माझ्या पर्समध्ये आला होता.

गजा : घोडा पर्समध्ये आला होता ?

माला : ( टेबलावरचा दाखवीत ) हा, रे...

गजा : बाप, रे...तुला हा उचलताना मी पाहिलं नव्हतं. ( माला हसते. ) हसतेस काय ? सदूशेठना वाटलं असतं, मीच चोरला. त्यांनी मला ताबडतोब कामावरून....

माला : अरे, म्हणून तर लगेच परत आणून ठेवला ना मी ? शिवाय पहिल्याच दुकानदारानं सांगितलं, की तो खऱ्या चांदीचा नाही. नुसतं पाणी दिलेला आहे. विकून एक रुपयासुद्धा यायचा नाही.

गजा : बघ, माला, तुला सांगतो, प्रामाणिकपणातच खरा फायदा आहे.

माला : हो ना ! प्रामाणिकपणानं घोडा ठेवायला परत आले, म्हणून तर माझा फायदा झाला. आता पळते मी. अजून सगळीच दुकानं राहिल्येत.

[ खिडकीतून बाहेर जाते. एवढ्यात दारावरची बेल वाजते. गजा दार उघडतो. पाठोपाठ लोकनाथ आणि इन्स्पेक्टर आत येतात. ]

इन्स्पेक्टर : ( अतिशय संतप्त. ) कुठाय् तो म्हातारा ? नाही त्याला तुरुंगाची हवा खायला पाठवला, तर...

गजा : वाचले म्हातारबुवा ! नुकतेच गेले ! ( आत जातो. )

लोकनाथ : शांत व्हा ! शांत व्हा, इन्स्पेक्टर.

इन्स्पेक्टर : मला शांत व्हायला सांगता ? तुम्हीच मला सांगितलंत ना, की त्या शेअर्सची किंमत फक्त लहान मुलांना बसायला देण्याएवढी आहे ?

लोकनाथ : नाही ! मी म्हटलं, पतंग करण्याएवढी.

इन्स्पेक्टर : तेच ते ! पण या म्हाताऱ्यानं माझ्याकडून तीनशे रुपये घेतले. वर म्हणाला, मी तुम्हांला फसवीत तर नाही ? आणि मी आपला खुशीत होतो ! मला वाटत होतं, आपणच याला फसवतो आहोत !

लोकनाथ : मी त्यांना तुमचे पैसे परत द्यायला लावतो. मग तर झालं ? फक्त दोन दिवस थांबा–त्यांच्या घरात लग्न आहे. तेवढं आटपू द्या...

इन्स्पेक्टर : तुम्ही सांगता, म्हणून थांबतो. पण परवा मात्र माझे पैसे–

लोकनाथ : इन्स्पेक्टर, तुमच्यासारख्या कवीला अशी पैशांची काळजी करणं शोभून दिसत नाही ! हं...आता वाचा बरं तुम्ही लिहिलेली कविता....

इन्स्पेक्टर : ( खिशातून कागद काढीत ) ऐका हं...चंपूताई सदनच्या पाचव्या मजल्याच्या खिडकीतून खाली पाहताना.... कसं वाटतं नाव ?

लोकनाथ : फारच आकर्षक आहे! पुढं वाचा.

इन्स्पेक्टर : चंपूताई सदनच्या पाचव्या मजल्याच्या खिडकीतून खाली पाहताना...

लोकनाथ : नाव सांगितलंत...

इन्स्पेक्टर : हे नाव नव्हतं–पहिली ओळ होती!

लोकनाथ : अस्सं!

इन्स्पेक्टर : चंपूताई सदनच्या पाचव्या मजल्याच्या—

लोकनाथ : दुसरी ओळ पण तीच आहे का?

इन्स्पेक्टर : नाही! ही पहिलीच ओळ. दुसऱ्यांदा वाचत होतो.

लोकनाथ : सोडून द्या–पुढची ओळ वाचा–

इन्स्पेक्टर : पाहताना दिसतात रस्ते–
भेदक, दाहक, काळीज पिळवटणारे रस्ते.
ज्याच्यावरून फिरतात, मळमळणारी माणसं...
विद्रूप माणसं, जी एके काळी माणसं होती!
(स्वतःच) वाः!

लोकनाथ : पुढं वाचा...

इन्स्पेक्टर : विद्रूप माणसं, जी एकेकाळी माणसं होती...
कुरूप बायका, ज्या एकेकाळी बायका होत्या–
नागडी पोरं, जी एकेकाळी पोरं होती–
म्हातारी माणसं, जी एकेकाळी म्हातारी माणसं होती...

लोकनाथ : त्या... एकेकाळीवाल्या ओळी सोडून पुढं वाचा.

इन्स्पेक्टर : क्रूर लांडगे फिरतात रस्त्यांमधुनी
तुटून पडण्यासाठी निष्पाप पोलिसांवरी...
च्या आयला....!

लोकनाथ : 'च्या आयला' हा शब्द कवितेतला आहे!

इन्स्पेक्टर : हो! तो माझा उद्‌गार आहे! तुम्हीच म्हणालात ना, की कवितेच्या शेवटी कवीचा स्वतःचा काहीतरी उद्‌गार आला पाहिजे? कशी वाटली कविता!

लोकनाथ : इन्स्पेक्टर, तुम्हांला आयुष्य इतकं क्रूर, इतकं भयानक वाटतं...?

इन्स्पेक्टर : वा! मागं तुम्हीच तर म्हणाला होता, की कवितेत तसंच लिहावं लागतं, म्हणून!

लोकनाथ : नाही, इन्स्पेक्टर! गेल्या दहा दिवसांत माझा जीवनाकडे पाहण्याचा

दृष्टिकोनच साफ बदलून गेलाय्. प्रेम— शुद्ध प्रेम! बाकी सगळं झूट आहे. प्रेमाला मूर्खपणा समजण्याचा गाढवपणा मी इतके दिवस करीत होतो. पण आता माझे डोळे खाडकन् उघडलेत. इन्स्पेक्टर, खालच्या रस्त्या-मधून क्रूर लांडगे फिरत नसून लोकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करणाऱ्या सुंदर तरुणींचे तांडेच्या तांडे फिरताहेत...

इन्स्पेक्टर : मी बघून येतो....

लोकनाथ : खरोखरीचे नाही....कल्पनेतले! पण कल्पना ही शेवटी अनुभवावरच आधारलेली असते. —काय? अनुभव महत्त्वाचा! जा, ही कविता परत लिहून आणा...

इन्स्पेक्टर : बिलकूल लिहिणार नाही!

लोकनाथ : काय म्हणालात?

इन्स्पेक्टर : माझा आयुष्याचा अनुभव इतकाच वाईट आहे, सर! ज्या चंपूताई सदनच्या पाचव्या मजल्यावर, निष्पाप पोलिस इन्स्पेक्टरना फसवून तीनशे रुपयांना रद्दी कागद विकणारे क्रूर म्हातारे लांडगे भेटतात, तिथला अनुभव मला भेदकच वाटतो, सर... (हुंदके देत) दाहक, काळीज पिळवटणारा...

इन्स्पेक्टर : भळभळणारा, मळमळणारा....हूं....हूं...हूं...

[ ओक्साबोक्सी रडत निघून जातो.
त्याच उघड्या दारातून तोंडासमोर बॉक्सांचा ढीग धरलेला सदू टेकाडे लटपटत आत येतो, आणि गजाला हाका मारू लागतो... ]

लोकनाथ : गजा कशाला? मी आहे ना...

सदू : तू! इथंच आहेस? पण मला कुठं दिसतोय्स?

[ गजा आणि लोकनाथ त्याच्या डोळ्यांपुढची बॉक्सेस् खाली उतरवून घेतात. ]

सदू : हुश्श! लग्नात एवढी खरेदी करावी लागते, हे माहीत असतं, तर मी लग्नाच्या फंदात पडलोच नसतो!

गजा : साहेब, ही तुमची पत्रं ! (किचनमध्ये जातो.)
सदू : (लोकनाथला) बघ, रे...

[ दोन–तीन पत्रं त्याला देतो. एक–दोन पत्रं स्वतः बघतो...एवढ्यात गजा त्याला पाणी आणून देतो. ]

लोकनाथ : अरे, हे प्रायव्हेट पत्र दिसतंय्.... (वाचून दाखवीत) प्रिय सदू, तू कणकवलीचे दिवस विसरला नाहीस ना ! तुझ्या लग्नात येऊन भेटेन. तुझी शाली भुगे...

[ हे नाव ऐकताच पाणी पिणाऱ्या सदूच्या तोंडून पाण्याचा एक लांब फवारा उडतो आणि त्याला प्रचंड ठसका लागतो... ]

गजा : सदूशेठ...काय झालं, सदूशेठ... !
लोकनाथ : अरे सदू- झालं काय तुला एकाएकी !
सदू : आता काय उद्या माझं लग्न होत नाही, लोक्या...
लोकनाथ : म्हंजे...!
सदू : अरे, ही कणकवलीची शाली भुगे माझं लग्न मोडायला येतेय्...
लोकनाथ : का ! ती कशाला मोडेल तुझं लग्न !
सदू : लहानपणी घरच्या लोकांनी आमचं लग्न ठरवलं होतं.
लोकनाथ : मग काय झालं ! लहानपणीचं लहानपणी....
सदू : तुला कल्पना नाही–लहान गावात हा इज्जतीचा प्रश्न असतो. ती मुलगी आणि तिची फॅमिली– माझ्यावर केस करतील, त्यांची इज्जत गेली, म्हणून !
लोकनाथ : अरे, पण इतकी वर्षं तिची काही हालहवाल नाही, आणि नेमकी लग्नाच्याच वेळी येऊन ती टपकतेय्, म्हंजे...
सदू : म्हंजेच तिला लग्न मोडायचंय् ! लोक्या, आता तूच यातून काहीतरी मार्ग काढ.
लोकनाथ : (विचार करीत) स्ट्रॅटेजी नंबर फोर ! समजा, ही शालिनी भुगे तुझ्याशी ठरलेलं लग्न मोडायला आपणहून तयार झाली...

सदू : –तर सगळाच प्रश्न सुटेल. पण हे कसं काय जमायचं ?
लोकनाथ : समजा, तिला कळलं, की तू अगदी वाया गेलेला माणूस आहेस ! तर ती तुझा नाद सोडून सरळ निघून जाईल, की नाही !
सदू : पण मी वाया गेलोय्, असं तिला कसं वाटेल ?
लोकनाथ : समज–समज, आपण अशी सिच्युएशन तयार केली....( चुटकी वाजवून ) ही बघ...अशी...
सदू : कशी ?
लोकनाथ : थांब, रे–मला जरा विचार करू दे.
सदू : लौकर कर.
लोकनाथ : हां...शाली भुगे येते...तू तिची प्रेमानं विचारपूस करतोस....एवढ्यात धाडकन् दार उघडतं...दारात एक तरुणी उभी आहे. अंगात काळे मळके कपडे ... चेहरा पांढरा फटक–केस विस्कटलेले—
सदू : वर्णन राहू दे...ती करते काय, ते सांग....
लोकनाथ : तिच्या हातात, कपड्यांत गुंडाळलेलं एक मूल...
सदू : मूल ! बाप रे.. !
लोकनाथ : ती ओरडत येते...सदू, हे तुझं पाप ! सदू, तू याचा बाप...
सदू : हे जरा जास्त होतंय् ! कपड्यात गुंडाळलेलं मूलबील म्हंजे...
लोकनाथ : बरं ! मूल कटाप ! नाहीतरी मूल कुठून आणायचं, हा प्रश्नच आहे !
सदू : तरुणी कुठून आणायची, हाही प्रश्नच आहे !
लोकनाथ : आणि तो सोडवायला आता फक्त वीस तास बाकी आहेत. प्रोफेसर लोकनाथ लुकतुके, जगाच्या कल्याणासाठी हे आव्हान तुम्हांला घेतलंच पाहिजे. वीस तास–सीर्फ बीस घंटे ! शाली भुगे...एक तरुणी...वीस तास...आणि, सद्या, उद्या तुझं नि सोनालीचं लग्न झालंच पाहिजे.... लग्न झालंच पाहिजे...

का ळो ख

## प्रवेश तिसरा

[ काळोखातच सनई, चौघडा ऐकू येऊ लागतो...रंगमंच उजळू लागतो. 'चंद्रिकाविहार' बंगल्यातलं दालन. पलिकडच्या दिवाणखान्यात लग्नाची वर्दळ चालू आहे. येणाऱ्या–जाणाऱ्यांच्या बोलण्याचे आवाज... आप्पाराव हळूच सटकून यावं, तसे येतात. आणि पाठीमागच्या बागेत जाऊ लागतात. त्यांच्या पाठोपाठ सोनाली येते. तिच्या अंगावर लग्नाचा पोशाख. कपाळावर मुंडावळ्या. ]

सोनाली : आप्पा, बाहेर लग्नाची गडबड चाललीय् आणि तुम्ही सारखे बागेत कशाला जाताय्!

आप्पाराव : बघतंय्– कोण पाव्हणो हंयसून येताहा का, तां...

सोनाली : लग्नाचे पाहुणे बागेतून कशाला येतील, आप्पा, चोरासारखे? ते पुढच्याच दारानं येणार. हां, आता तुमचंच कोणी यायचं असलं, तर...

आप्पाराव : तू जा बघू या थंयसर...जाग्यावर बस जावून. नवरीमुलगी ना तू! मग फिरा नुको घरभर...

सोनाली : करू काय एका जागी बसून! अजून भटजींचाच पत्ता नाहीये...

आप्पाराव : शिरा मार त्या भटार. अजून इलो नाय, म्हंजे काय! अशान् घटका टळान् गेली म्हंजे! ह्या चंडिकेचा काय तरी कारस्थान असतला–भटाक् दडवून ठेवूचा...आणि लगीन मोडान्-टाकूचा...

[ चंद्रिकाबाई तावातावानं येतात. ]

चंद्रिका. : उगाच तोंडाला येईल ते भकू नका! मी मनाविरुद्ध लग्नाला परवानगी दिली, ते कुठंच गेलं! वर म्हणे, मी भटाला दडवून ठेवलंय्!

[ सदू घाईघाईने येतो. त्याच्याही कपाळावर मुंडावळ्या. ]

सदू : भटजींच्या मेव्हण्याचा आत्ता फोन आला होता! भटजी येऊ शकत नाहीत, म्हणून.

सोनाली : येऊ शकत नाहीत ! का ?

सदू : चाळीच्या नळावर ते घसरले, म्हणे ! त्यांचा पाय फ्रॅक्चर झालाय् !

चंद्रिका. : तरी मला या लग्नाचं पहिल्यापासूनच लक्षण ठीक दिसत नाहीये. नाहीतर नेमकं याच वेळी भटजींना पाय घसरून पडायचं कारण काय ?

सदू : कारण नळाची मोरी अतिशय चिकट झालीय्– असं मेहुणे म्हणाले.

चंद्रिका. : आगाऊपणा करू नका. भटजी नाहीत, तर लग्न कोण लावणार?

आप्पाराव : भटजी मिळेपर्यंत लगीन पुढे ढकललां, तर ?

चंद्रिका. : तुम्ही नका अक्कल पाजळू. पण मला वाटतं, पुढंच ढकलावं लग्न.

सोनाली : तुझी तरी कमाल आहे, मॉम ! भटजींसाठी लग्न पुढं ढकलायचं ! त्यापेक्षा कोणाला तरी पाठवा ना दुसऱ्या भटजींना आणायला !

आप्पाराव : कोणाला पाठवणार ? भरवशाचो आसा कोण ?

चंद्रिका. : रविकिरणला पाठवते.... (हाक मारते.) रविकिरऽण....

सोनाली : रविकिरण ? तो जाऊन बसेल कुठल्यातरी हॉटेलात. आणि चार तासांनी परत येईल हात हलवीत ! (सदूला) त्यापेक्षा तुम्हीच जा, हो !

सदू : (अस्वस्थपणे) नाही – म्हंजे मी गेलोच असतो ! पण माझ्याकडे कोणीतरी येणार आहे. मी जागेवर नसलो, तर गोंधळ होईल ! लोकनाथ सुद्धा अजून आलेला नाही.

सोनाली : बरं तर ! मीच गाडी घेऊन जाते, आणि कानाला धरून आणते एखाद्या भटाला... (जाते.)

सदू : अग अग....मुंडावळ्या तरी काढून जा...

[ तिच्या पाठोपाठ जातो. रविकिरण येतो. ]

रविकिरण : मला हाक मारीत होता ?

चंद्रिका. : काही नाही. तुम्ही येईपर्यंत होऊनसुद्धा गेलं काम ! (जाते.)

आप्पाराव : बरे सापडलात. काय, हो, मिस्टर रत्नपारखी ... दुसऱ्याचे पैसे म्हंजे तुम्हांला काय चुरमुरे वाटतात ! खुशाल मला त्या कांद्याच्या कंपनीचे शेअर्स घ्यायला सांगितलेत ! माझे तीन लाख तिथल्या तिथं त्या स्फोटात जळून नाय गेले...!

रविकिरण : कोण सांगतं ? तुम्हांला माहीतेय्....? स्फोटामुळं अनिअन कार्बाईड बंद झाली होती ... पण ती आता अमेरिकन लोकांनी चालवायला घेतलीय्. कालपासून शेअर्सचा भाव अचानक डब्बल झालाय्. तीन लाखांच्या शेअर्सवर आता तुमचा फायदा तीन लाख ! आहात कुठं ?

आप्पाराव : मेलंय् मेलंय् !

रविकिरण : का ? फायदा झाला, तर मरायला काय झालं ?

आप्पाराव : अहो– मी ते शेअर्स काल विकून टाकले...कोणाक्...हां...आठवलां त्येचा नाव. इन्स्पेक्टर दगडे...म्हणून कोण आसा ! तू माका सांग, अजून ह्यां भायेर कोणाक् ठाव्क नाय ना ?

रविकिरण : शेअरहोल्डर्सना कळवलंय्, म्हणे. उद्या–परवा पेपरात येईल.

आप्पाराव : मग आत्ता जाऊन त्या दगड्याकडून शेअर घेऊन येतंय्...त्येनी पेपर वाचूच्या पयले...मेल्यान् माका फसयला ! तीनशे रुपयांत सहा लाखांचे शेअर ! मी बरो तेका खाव्क देईन ! आत्ता जातंय् त्या गारगोट्याकडे !

रविकिरण : आत्ता कसे जाल ? कन्यादान कोण करणार ?

आप्पाराव : शिरा पडो त्या भटार ! अजून ह्या लगीन लागणाहा नाय ! इंय माझी डुबूची पाळी इली ! सगळा खिचाटपिचाट झाला !

रविकिरण : खिचाटपिचाट म्हंजे ?

आप्पाराव : एवढा समजणा नाय ? खिचाटपिचाट म्हंजे आडनपाडन उसकावासकी ! (जातात.)

रविकिरण : पण आडनपाडन उसकावासकी म्हंजे काय ?

[ त्यांच्या मागून जातो. दुसऱ्या बाजूनं लोकनाथला घेऊन सदू येतो. ]

सदू : कधीची तुझी वाट पाहतोय्. आणि तू आत्ता येतोय्स !

लोकनाथ : आत्तासुद्धा मोठ्या मुश्किलीनं आलो, बाबा ! सकाळी फायरब्रिगेडच्या लोकांच्या काव्यगायन स्पर्धा होत्या. तिकडे परीक्षक होतो. आता दुपारी बारा वाजता कफ परेड महिला विकास मंडळात परिसंवाद आहे. स्त्री–मुक्तीची खरी गरज स्त्रियांना, की पुरुषांना ? या विषयावर.

सदू : स्त्री-मुक्ती राहू दे ! तू त्या तरुणीची व्यवस्था करणार होतास, त्याचं काय झालं ? त्या, रे....पाप पाप ओरडत येणाऱ्या ! आत्ता कुठल्याही

क्षणी शाली भुगे इथं येईल...

लोकनाथ : बाप, रे ! अजून काहीच जमलेलं नाही !

सदू : खल्लास ! आता माझं लग्न मोडलं, समज !

लोकनाथ : असे हातपाय गाळू नकोस. मी बघतो, काय करता येतं, ते !

सदू : तो भट बघ...नेमका याच वेळी मोरीत पडला. नाहीतर एव्हाना लग्न लागूनसुद्धा गेलं असतं ! मग नंतर ती भुग्यांची शाली येवो, की फुग्यांची माली ! ( चडफडत ) काय होणार या देशाचं, ते समजत नाही. भटासारखे भट जर असे चहात पडणाऱ्या माश्यांसारखे मोऱ्यात पडायला लागले....

लोकनाथ : तू जा बघू बाहेर ! मग एखादी युक्ती सापडेपर्यंत शाली भुगेला बाहेरच्या बाहेर थोपवून धर.

सदू : म्हंजे तू गडावर आणि मी खिंड लढवू ? आता मुलगी मिळाल्यावर तोफेचे पाच बार काढायला विसरू नकोस, म्हंजे झालं.

[ चिडचिड करीत बाहेर जातो. एवढ्यात माडीवरून माला चोरपावलांनी खाली उतरते. लोकनाथ पाठीमागून तिची मानगूट पकडतो. ]

माला : ( किंचाळून ) मेले ऽ !

[ मग स्वतःच तोंडावर हात ठेवते. ]

लोकनाथ : कोण आहेस तू ?

माला : लग्नाला आलेल्या पाहुण्यांच्या अंगावर असा हात टाकणं तुम्हांला शोभत नाही.

लोकनाथ : हे असले कपडे घालून तू लग्नाला आली नाहीयेस. चोरी करायला आलीयस...

माला : काय चोरलं मी ? आहे माझ्या हातात काही ? आहे ?

लोकनाथ : हातात नाही ! गळ्यात आहे. या कपड्यांवर तो रत्नहार अजिबात शोभत नाही. दे आधी काढून ! दे...

माला : ( रत्नहार काढून देत ) घ्या. आता जाऊ मी ?

लोकनाथ : वा, ग... ! तुला काय वाटलं ! मी तुला अशीच जाऊ देईन !

माला : मग ? मला पोलिसात देणार आहात ? साहेब, हे सगळं मला माझ्या कॅन्सरनं बिछान्याला खिळलेल्या आईसाठी करावं लागतं. गेले तीन दिवस तिच्या पोटांत अन्नाचा कण नाही. म्हणून मी हे पाप...

लोकनाथ : ( तिच्या अभिनयानं थक्क होऊन ) ग्रेट ! तूच करायचंस हे काम !

माला : कसलं काम ?

लोकनाथ : हे आता करून दाखवलंस ना, तसंच एक नाटक तुला इथं करावं लागेल.... त्याला तयार नसलीस, तर मात्र तुला सरळ पोलिसात...

माला : नाटक कसलं, ते तर सांगा...

लोकनाथ : इथं पाठीमागच्या झुडुपात तू थांबायचंस.... थोड्या वेळानं नवरा मुलगा एका तरुण मुलीबरोबर येईल.... त्यावेळी तू धावत यायचंस आणि म्हणायचंस...

माला : बदमाश ! इतके दिवस माझ्याशी प्रेमाचे चाळे केलेत... आणि आता तुम्ही हिचे होणार ! असं काय पाहिलंत तुम्ही हिच्यात ? बरोबर... ?

लोकनाथ : ( चकित होऊन ) तुला कसं कळलं, काय बोलायचं, ते !

माला : साहेब, कितीतरी सिनेमांत पाह्यलाय् मी हा प्रसंग !— पण नंतर मला इथल्या माणसांनी, तू कोण ! कुठची ? असं विचारलं, तर.... !

लोकनाथ : तर काही बोलायचं नाही.... भावनावेगात एकदम बाहेर पडायचं...

माला : चालेल !

लोकनाथ : मग जा... लप जाऊन बागेतल्या झुडुपांमध्ये !

[ ती जाते. चंद्रिकाबाई घाईघाईनं येतात. ]

चंद्रिका. : (लोकनाथला पाहून ) अहो, भटजी नाही आलेले अजून ! लग्न कोण लावणार ? तुम्ही तरी आलात, ते बरं झालं...

लोकनाथ : म्हंजे ? मी लग्न लावू, की काय ?

चंद्रिका. : तुम्ही नाही, हो, चालणार ! भटजी म्हंजे जरा निर्मऽळ माणूस हवा ! पण आल्यासारखे जरा पाहुण्यांची समजूत घाला ! मुहूर्त टळून चालला, मुहूर्त टळून चालला... म्हणून काव काव करताहेत नुसते ! मी वर पळते...

लोकनाथ : सांभाळून... नाहीतर त्या भटजीसारखा तुमचा पण पाय...

[ चंद्रिकाबाई वर जातात... रविकिरण येतो. ]

रविकिरण : चंद्रिकाबाई.... चंद्रिकाबाई... छे! गेल्याच या वर!
लोकनाथ : कायमच्या नाहीत! खाली येणारेत...
रविकिरण : अहो, पण मुहूर्त टळून चाललाय्! मुहूर्त टळून चाललाय्...
लोकनाथ : अच्छा! म्हंजे त्या कावकाव करणाऱ्यापैकी तुम्ही एक तर....!
रविकिरण : छे, हो! मी कुठं काव काव करतोय्? पण माझ्या पोटातले कावळे मात्र-एकदाचं लग्न लागलं, की पहिल्या पंगतीला बसायला आपण मोकळे-काय?
लोकनाथ : अंहं... लगेच पहिल्या पंगतीला बसू नका! नाहीतर शेवटच्या पंक्तीपर्यंत पुन्हा भुकेनं व्याकूळ व्हाल!
रविकिरण : त्याच्यावर उपाय काढलाय् मी! मी एकदा पहिल्या पंगतीला जेवायला बसलो ना, की थेट शेवटच्या पंगतीलाच उठतो! अधेमधे जागेवरून उठतच नाही!
लोकनाथ : छान छान! आता तुम्ही असं करा.... जरा बाहेर जा... आणि भटजी येईपर्यंत लोकांना दम खायला सांगा...
रविकिरण : लोकांना सांगतो, हो, दम खायला! पण तोवर मी काय खाऊ?
लोकनाथ : मी करतो त्याची काहीतरी व्यवस्था. तुम्ही बिलकुल काळजी करू नका.
रविकिरण : बघा हं... (जातो.)

[ चंद्रिकाबाई वरून घाईघाईनं येतात. ]

चंद्रिका. : चोरी! चोरी! लोकनाथ, भयंकर गोष्ट घडलीये. लोकांत सांगायची चोरी! नाही सांगायची, तरी चोरी! चोरीच चोरी...! आता तुम्हीच काहीतरी मार्ग दाखवा...
लोकनाथ : चंद्रिकाबाई, एकसारख्या सगळ्यांना मार्ग दाखवून दाखवून माझा अगदी ट्रॅफिक सिग्नल झालाय्, हो! एका अडचणीतनं उपाय काढावा, तर लगेच नवी अडचण तयार...!

चंद्रिका. : नाही, हो! पण ही अडचण अशी तशी नाही! सोनालीला लग्नात द्यायच्या सामानाची ट्रंक माडीवर ठेवली होती... तिथं आत्ता गेले, तर काय विचारता....

लोकनाथ : –ट्रंक उघडी, आणि रत्नहार गायब!

चंद्रिका. : अगोबाई, तुम्हांला कसं कळलं? का त्या ब्रह्मकुमारीसारखे तुम्हीसुद्धा त्रिकालज्ञानी...

लोकनाथ : नुसतं त्रिकालज्ञान सांगत नाही, चंद्रिकाबाई, तुमची वस्तू परत सुद्धा आणून देऊ शकतो. अडचण निवारू शकतो. काळजी दूर करू शकतो. आजच भेटा : प्रोफेसर लोकनाथ लुकतुके... (खिशातून हार काढून देत) हा घ्या तुमचा चोरीला गेलेला रत्नहार... तुमच्याच गळ्यात ठेवा!

चंद्रिका. : कमालच केलीत, हो, लोकनाथ! तुम्ही लेखक आहात, की गुप्त पोलिस?

लोकनाथ : सध्या तरी फक्त ट्रॅफिक सिग्नल! हां, मात्र तो रत्नहार मुळात कोणी चोरला, हे मला विचारू नका!

चंद्रिका. : मी नाहीच विचारायची, मला चांगलं माहीत आहे, कोणी चोरला असणार, ते!

लोकनाथ : कोणी?

चंद्रिका. : आमचे हेच असले उद्योग करणार! दुसरं कोण?

लोकनाथ : चूक! साफ चूक! चंद्रिकाबाई, त्या अश्राप जीवाचा यात काहीसुद्धा संबंध नाही.

[ सदू टेकाडे धावत येतो. ]

सदू : आत्री! शाली भुगे आली...

चंद्रिका. : कोण आली म्हणतात हे? मी बघूनच येते... ( जातात. )

सदू : लपव...लपव मला कुठंतरी... ( पळत सुटतो. )

लोकनाथ : अरे सदू... थांब तरी... सदू... ( त्याच्या पाठोपाठ जातो. )

[ ब्रह्मकुमारी देवी आत येते. ]

ब्रह्मकुमारी : आं? इथं तर कुणीच नाही! ( वळते. )

म. वि. ग्रं. ठाणे. वाचनालय ठाणे.
क्र. २९८२५ नों. दि. ३।२।८५
वि. आ२८७

[ एवढ्यात चंद्रिकाबाई आत येतात. ]

चंद्रिका. : ( ब्रह्मकुमारीला ) ब्रह्मकुमारीदेवी, आज या लग्नाचं काही खरं दिसत नाही.

[ रविकिरण घाईघाईनं आत येतो. ]

रविकिरण : पहिल्या पंगतीला अजून वेळ आहे ना !
चंद्रिका. : अहो, इथं लग्नाचा नाही पत्ता...आणि पंगतीचं काय विचारताय् !

[ आप्पाराव आत येतात. ]

आप्पाराव : जावईबापू असे एकदम पळत का सुटले !
चंद्रिका. : तुम्ही चूप बसा. अजून ते खरे जावई व्हायचेत.
आप्पाराव : पण पळत सुटले, हे तर खरं ना !

[ तेवढ्यात सदू येतो. त्याच्यामागं लोकनाथ. सदू सरळ चालत ब्रह्मकुमारीपर्यंत येतो आणि पुन्हा पळत सुटतो. ]

आप्पाराव : जावईबापू...अहो जावईबापू....अहो, असे पळताय् काय.. !

[ सदूच्या मागं पळत जातात. ]

चंद्रिका. : तुम्ही कशाला पळताय् त्यांच्या मागं ? आधी जागेवर बसा, पाहू...

[ असं म्हणत म्हणत आप्पारावांच्या मागून जातात...]

रविकिरण : चंद्रिकाबाई, पंगतीला उशीर असेल, तर मी थोडं काहीतरी...

[ चंद्रिकाबाईच्या मागून धावत जातो... ]

ब्रह्मकुमारी : झालं काय या सगळ्यांना !

लोकनाथ : ते सदूच्या मागं धावताहेत.

ब्रह्मकुमारी : पण सदू का धावत सुटलाय् !

लोकनाथ : त्याच्या मागं एक महामाया लागलीय्. कणकवलीहून आलीय्, बया. याचं लग्न मोडायला. कोण साली भुग्यांची शाली आहे... इतकी वर्षे लग्नावाचून राह्यली....आणि आता आलीय् याच्या लग्नात बिब्बा घालायला !

ब्रह्मकुमारी : काय हो, तुम्हांला कधी समोरच्या बाईविषयी चांगलं बोलताच येत नाही का !

लोकनाथ : हे बघ, ब्रह्मा, ब्रह्मकुमारीला तुझ्या तोंडावर शिव्या देताना माझी चूक झाली. कारण ती तूच निघालीस. पण तुझ्यासमोर मी शाली भुगेला का म्हणून शिव्या देऊ नयेत ! तू काय शाली भुगे निघणार आहेस ?

ब्रह्मकुमारी : निघणार आहे, म्हंजे ! मी आहेच शाली भुगे ! सदू ऽऽ

[ सदू गेला, त्या दिशेनं धावत सुटते. लोकनाथ आश्चर्यचकित. ब्रह्मकुमारी गेली, त्याच्या उलट्या दिशेनं सदू धावत येतो. ]

सदू : ( लोकनाथला ) गेली वाटतं ती ? तू तिची समजूत घातलीस, की काय ?

[ ब्रह्मकुमारी परत येते. ]

ब्रह्मकुमारी : ( सदूच्या दिशेनं झेपावून ) सदू ऽऽ

[ तसा सदू परत धावत सुटतो. ]

लोकनाथ : ब्रह्मा ऽ, ब्रह्मा ऽ

[ तिच्या मागं धावतो.
दुसऱ्या बाजूनं चंद्रिका., आप्पा, आणि रविकिरण येतात. ]

चंद्रिका. : मी नक्की सांगते. हा सदू टेकाडा दिसतो, तेवढा साधा नाही. नक्की

त्याचं काहीतरी लफडं आहे. म्हणूनच पळत सुटलाय् असा भामट्या-सारखा! चला माझ्याबरोबर! कोण नवीन मुलगी आलीय्, ते आपण शोधून काढू.

[ त्यांना घेऊन बाहेर जाते.
दुसऱ्या दारातून लोकनाथ, ब्रह्मकुमारी आणि सदू यांना घेऊन येतो. ]

लोकनाथ : हे काय त्रांगडं आहे, सदू!

सदू : ( लोकनाथला हळूच ) मुलगी कुठं आहे! 'पाप, पाप' ओरडणारी...! तिनं आत्ता एन्ट्री घ्यायला हवी...

लोकनाथ : ती मरू दे! ही कोण आहे, सांग

ब्रह्मकुमारी : मी कणकवलीची शाली भुगेच आहे. पण गेली पाच वर्षं मी मुंबईतच असते...धंद्यासाठी नाव बदललं...

सदू : पण, शाले...आपल्या मैत्रीला किती वर्षं झाली! तेव्हाचं आता काय मनात ठेवायचं...! नाही का!

ब्रह्मकुमारी : वा, रे! तू तर म्हणाला होतास, की सबंध जन्मात मी तुला विसर-णार नाही!

सदू : तेव्हा मी लहान होतो, शाले! मला काही कळत नव्हतं. ( लोकनाथला ) मुलगी....पाप...पाप...

ब्रह्मकुमारी : म्हंजे, सदू...तू चक्क फसवणार होतास मला...

सदू : फसवणार होतो! अजून फसवणारेय्! भटजी येण्याची फक्त खोटी आहे!

लोकनाथ : ब्रह्मा, तुला कल्पना नाही हा किती वाया गेलाय्, याची.

सदू : हो ना...मी अगदी कामातून गेलोय्! आता कुठल्याही क्षणी एखादी मुलगी येईल आणि मला म्हणेल...

लोकनाथ : तेव्हा याच्याशी लग्न करण्याचा विचारच सोड! हवं तर मी तयार आहे तुझ्याशी लग्न करायला.

सदू : ( धक्का बसून ) तू!

लोकनाथ : गिन्हाइकांना अडचणीतून सोडवण्यासाठी प्रोफेसर लोकनाथ कुठलाही त्याग करायला तयार असतात.

ब्रह्मकुमारी : त्याग! मला वाटत होतं, की माझ्यावर प्रेम आहे, म्हणून तुम्ही माझ्याशी

लोकनाथ : ते सदूच्या मागं धावताहेत.

ब्रह्मकुमारी : पण सदू का धावत सुटलाय् ?

लोकनाथ : त्याच्या मागं एक महामाया लागलीय्. कणकवलीहून आलीय्, बया. याचं लग्न मोडायला. कोण शाली भुग्यांची शाली आहे... इतकी वर्षे लग्नावाचून राह्यली....आणि आता आलीय् याच्या लग्नात बिब्बा घालायला !

ब्रह्मकुमारी : काय हो, तुम्हांला कधी समोरच्या बाईविषयी चांगलं बोलताच येत नाही का !

लोकनाथ : हे बघ, ब्रह्मा, ब्रह्मकुमारीला तुझ्या तोंडावर शिव्या देताना माझी चूक झाली. कारण ती तूच निघालीस. पण तुझ्यासमोर मी शाली भुगेला का म्हणून शिव्या देऊ नयेत ! तू काय शाली भुगे निघणार आहेस ?

ब्रह्मकुमारी : निघणार आहे, म्हंजे ? मी आहेच शाली भुगे ! सदू ऽऽ

[ सदू गेला, त्या दिशेनं धावत सुटते. लोकनाथ आश्चर्यचकित. ब्रह्मकुमारी गेली, त्याच्या उलट्या दिशेनं सदू धावत येतो. ]

सदू : ( लोकनाथला ) गेली वाटतं ती ? तू तिची समजूत घातलीस, की काय ?

[ ब्रह्मकुमारी परत येते. ]

ब्रह्मकुमारी : ( सदूच्या दिशेनं झेपावून ) सदू ऽऽ

[ तसा सदू परत धावत सुटतो. ]

लोकनाथ : ब्रह्मा ऽ, ब्रह्मा ऽ

[ तिच्या मागं धावतो.
दुसऱ्या बाजूनं चंद्रिका., आप्पा, आणि रविकिरण येतात. ]

चंद्रिका. : मी नक्की सांगते. हा सदू टेकाडा दिसतो, तेवढा साधा नाही. नक्की

त्याचं काहीतरी लफडं आहे. म्हणूनच पळत सुटलाय् असा भामट्या-सारखा! चला माझ्याबरोबर! कोण नवीन मुलगी आलीय्, ते आपण शोधून काढू.

[ त्यांना घेऊन बाहेर जाते.
दुसऱ्या दारातून लोकनाथ, ब्रह्मकुमारी आणि सदू यांना घेऊन येतो. ]

लोकनाथ : हे काय त्रांगडं आहे, सदू!

सदू : ( लोकनाथला हळूच ) मुलगी कुठं आहे! 'पाप, पाप' ओरडणारी...! तिनं आत्ता एन्ट्री घ्यायला हवी...

लोकनाथ : ती मरू दे! ही कोण आहे, सांग

ब्रह्मकुमारी : मी कणकवलीची शाली भुगेच आहे. पण गेली पाच वर्षं मी मुंबईतच असते...धंद्यासाठी नाव बदललं...

सदू : पण, शाले...आपल्या मैत्रीला किती वर्षं झाली! तेव्हाचं आता काय मनात ठेवायचं...! नाही का!

ब्रह्मकुमारी : वा, रे! तू तर म्हणाला होतास, की सबंध जन्मात मी तुला विसरणार नाही!

सदू : तेव्हा मी लहान होतो, शाले! मला काही कळत नव्हतं. ( लोकनाथला ) मुलगी....पाप...पाप...

ब्रह्मकुमारी : म्हंजे, सदू...तू चक्क फसवणार होतास मला...

सदू : फसवणार होतो! अजून फसवणारेय्! भटजी येण्याची फक्त खोटी आहे!

लोकनाथ : ब्रह्मा, तुला कल्पना नाही हा किती वाया गेलाय्, याची.

सदू : हो ना...मी अगदी कामातून गेलोय्! आता कुठल्याही क्षणी एखादी मुलगी येईल आणि मला म्हणेल...

लोकनाथ : तेव्हा याच्याशी लग्न करण्याचा विचारच सोड! हवं तर मी तयार आहे तुझ्याशी लग्न करायला.

सदू : ( धक्का बसून ) तू!

लोकनाथ : गिऱ्हाइकांना अडचणीतून सोडवण्यासाठी प्रोफेसर लोकनाथ कुठलाही त्याग करायला तयार असतात.

ब्रह्मकुमारी : त्याग! मला वाटत होतं, की माझ्यावर प्रेम आहे, म्हणून तुम्ही माझ्याशी

लग्न करणार !

लोकनाथ : प्रेम ? तुझ्यावर प्रेम ! आत्ता पाच मिनिटांपूर्वी तू या सदू टेकाळ्याशी लग्न करायला तयार होतीस.

ब्रह्मकुमारी : म्हणून तर तुम्ही लगेच लग्नाला तयार झालात ना ? नाहीतर इतके दिवस लग्नाचं नाव काढत नव्हता.

लोकनाथ : म्हंजे ? नुसतं मला डिवचण्यासाठी तू याला धाक घालत होतीस ? मग चल, ब्रह्मा, आता आपण एकमेकांना बनविण्यात अधिक वेळ न घालवता (तिला कमरेशी पकडून बॉल डान्सच्या पद्धतीनं नाचत... गात...) कोठे तरी जाऊ बसुनी दिव्य विमानी–अज्ञात ठिकाणी– ड ड डा ड ड डा ... डा ड ड डा...डा ड ड डा डा ... तेथे चल, राणी, तेथे चल, राणी...

[ दोघेही नाचत नाचत जातात... ]

सदू : (हसत) वेडा...कामातून गेला आणि मला म्हणतो, लग्न कसे करावे ? डोके वापरून ! हा हा ! मला सांगतो हा ! मी तर कधीपासून लग्नाला तयार आहे !

[ सोनाली येते. तिच्या पाठोपाठ चंद्रिकाबाई. ]

सोनाली : हो ना ? मग चला– भटजी आले ! बसलेत होमाजवळ ! चला बाहेर !

चंद्रिका. : सोनाली, बाई, तुझा हा रत्नहार घे घाल तुझ्याच गळ्यात !

[ तिला रत्नहार देते. ]

सोनाली : पण, मॉम...तो तुझ्या गळ्यात कसा आला !

[ आप्पाराव घाईघाईनं आत येतात... ]

आप्पाराव : चला, चला...भायेर तो भट कोकलतोहा... मुहूर्त टळान् चालला... नवरा नवरी...सगळे चला बघू या भायेर... भटानु . मंगलाष्टकां सुरू करा...

[ सगळे घाईगर्दीनं बाहेरच्या दिवाणखान्यात जाऊ लागणार, एवढ्यात माला धावत धावत आत येते. ]

माला : ( सदूच्या अंगावर धावून जात ) बदमाश ! इतके दिवस माझ्याशी प्रेमाचे चाळे केलेत... आणि आता तुम्ही हिचे होणार ? असं काय पाहिलंत तुम्ही हिच्यात ?

[ ओक्साबोक्सी रडू लागते... सगळे चकित होतात. एकच गोंधळ उडतो. ]

माला : ( सोनालीला गदगदा हलवीत ) तू-तू माझा संसार मोडतेस...? शरम कशी नाही वाटत तुला ?

सोनाली : कोण आहेस तू ?

माला : असल्या फसव्या, लबाड माणसांच्यांत मला क्षणभरसुद्धा राहायचं नाही ! ही मी चालले...( पळत सुटते. )

सोनाली : पण आहे कोण ती ?

चंद्रिका. : कोणीही का असेना ! या माणसाची लायकी काय आहे, ते कळून चुकलं. आता हे लग्न मोडलं !

सदू : तुमचा काहीतरी गैरसमज—

चंद्रिका. : गैरसमज कसा होईल ? मला आधीच संशय आला होता, की तुमचं काहीतरी लफडं आहे....आता या प्रकरणाचा पुरता छडा लावल्याशिवाय मी स्वस्थ बसायचीच नाही ! आणि सगळा सोक्षमोक्ष लागेपर्यंत हे लग्नसुद्धा होऊ द्यायची नाही ! आज हे लग्न मोडलं, म्हंजे मोडलं....

सदू : ( रडत असलेल्या सोनालीला ) रडू नकोस, सोनाली ! प्लीज...

सोनाली : काही नका माझं सांत्वन करू. तुमच्या साध्या गबाळ्या दिसण्यावर मी विश्वास टाकला आणि शेवटी फसले.

चंद्रिका. : (सोनालीचं सांत्वन करताकरता तिच्या गळ्याकडे लक्ष जाऊन ) अग बाई, सोनाली... तुझ्या गळ्यातला रत्नहार...!

सोनाली : ( गळा चाचपून ) हार... माझा तीन लाखांचा हार... चोरीला गेला....?

[ किंकाळी फोडून बेशुद्ध पडते.... सगळे तिला शुद्धीवर आणण्याच्या प्रयत्नात. ]

आप्पाराव : (स्वतःशीच, मिटक्या मारीत) तां रांडग्या शब्दाचा पक्क्यां निघालां हां....!

[ एवढं बोलून इतरांबरोबर सोनालीला शुद्धीवर आणण्यासाठी धावपळ करू लागतात. ]

प ड दा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नों. दि ..............
क्र. ........................

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ त्याच दिवशी संध्याकाळी. सदू टेकाडेचा फ्लॅट. लोकनाथ पुन्हा पाट्याबिट्या लावून कन्सल्टन्सी मांडून बसलेला. बेल वाजते. तो दार उघडतो. दारात ब्रह्मकुमारी. ]

लोकनाथ : (हात पसरून) डाऽलिंग.... (ती त्याच्या मिठीत मावत नाही.)
ब्रह्मकुमारी : चावटपणा नको! माझ्या मागून कोण येतंय्, माहीतेय् का?
लोकनाथ : कोण? इन्स्पेक्टर घोंड?
ब्रह्मकुमारी : नाही? चंद्रिकाबाई!
लोकनाथ : हां. ते तुझं गिऱ्हाईक!
ब्रह्मकुमारी : माझं नाही! तुझं गिऱ्हाईक म्हणून येताहेत त्या... आल्याच!

[ चंद्रिकाबाई येऊन ठेपलेल्या. ]

चंद्रिका. : ( धापा टाकीत ) पाच मजले चढायचे, म्हंजे... त्यातनं आज पोटात अन्नाचा कण नाही.
लोकनाथ : का?
चंद्रिका. : या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत तोंडात पाणी घ्यायचं नाही, असं ठरवलंय् मी!
लोकनाथ : कुठल्या प्रकरणाचा? रत्नहार तर दुपारीच मिळवून दिला!
चंद्रिका. : तो परत चोरीला गेला...
लोकनाथ : बाप, रे! कधी गेला? लग्नाआधी, की लग्नानंतर?
ब्रह्मकुमारी : लग्न झालंच नाही, म्हणतात त्या.
लोकनाथ : काय म्हणता! लग्न मोडलं! मला नव्हतं माहीत!
चंद्रिका. : तुम्हांला कसं माहीत असणार! तुम्ही दोघं आधीच निघून गेलात. नंतर लग्न मोडलं!
लोकनाथ : पण मोडलं कसं? झाली भुगे तर...

[ब्रह्मकुमारी गप्प राहण्याची खूण करते.]

चंद्रिका. : मोडलं ते, मी म्हणते, उत्तमच झालं. भर लग्नात एक भुरटी मुलगी ज्याच्या गळयात येऊन पडते... अशा माणसाला मी कध्धीच मुलगी देणार नाही! पण देवीजी म्हणतात...

लोकनाथ : देवीजी?... हां हां... म्हंजे ही!

चंद्रिका. : या म्हणतात... ज्योतिषशास्त्राप्रमाणे सोनालीचं लग्न सदू टेकाडेशीच व्हायला हवं!

लोकनाथ : मग?

चंद्रिका. : मग काय?

चंद्रिका. : एकीकडे या सद्याचा मवालीपणा आणि दुसरीकडे ज्योतिषशास्त्र... यात काय करावं, हेच मला कळेनासं झालंय्. म्हणून देवीजींनी मला तुमचा सल्ला घ्यायचा सल्ला दिला.

ब्रह्मकुमारी : पण, चंद्रिकाबाई, यांनी तुम्हांला काही सल्ला देण्याआधी मला यांना परिस्थिती नीट समजावून द्यावी लागेल. अर्थात खाजगीत. तेव्हा तुम्ही जरा वेळ खिडकीतून निसर्गशोभा पाहता का?

चंद्रिका. : पाहते ना... पाहते...

[खिडकीशी जाऊन उभी राहते. लोकनाथ व ब्रह्मकुमारी तातडीची चर्चा करू लागतात.]

ब्रह्मकुमारी : ही तीच चोरटी मुलगी ना? मघा तुम्ही मला जिच्याबद्दल सांगत होता, ती...!

लोकनाथ : बहुधा तीच. फक्त तिचं सदूच्या गळयात पडण्याचं टायमिंग चुकलेलं दिसतंय्. मी सगळं सांगून टाकू का चंद्रिकाबाईंना?

ब्रह्मकुमारी : तिच्याबद्दल सांगितलंत, की माझ्याविषयीसुद्धा सांगावं लागेल. ब्रह्मकुमारी म्हंजे कणकवलीची शाली भुगे, हे चंद्रिकाबाईंना कळलं, तर... लोकनाथ, माझं एकुलतं एक भरवशाचं गिन्हाईकसुद्धा तुम्ही काढून घेणार!

लोकनाथ : बरं बरं... नाही मी सांगत!

चंद्रिका. : संपली का तुमची खाजगी चर्चा!

लोकनाथ : माझी खात्री पटली, चंद्रिकाबाई. तुम्ही सोनालीचं लग्न सदू टेकाडेबरोबरच करून द्यायला हवं.

चंद्रिका. : ( किंचाळून ) का... य ? त्या मवाल्याबरोबर ?

लोकनाथ : नाही, चंद्रिकाबाई ! मी तुम्हांला गॅरंटी देतो. सदू टेकाडे हा अगदी धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे ! हवं, तर तुम्ही असं करा. तुम्ही स्वतःच इथं थांबा आणि सदूच्या चालचालणुकीवर पाळत ठेवा...

चंद्रिका. : पाळत कशी ठेवायची ? मी इथं दिसले, तर तो सभ्यपणाचंच नाटक करणार !

लोकनाथ : मग असं करा... तुम्ही या खिडकीबाहेर उभ्या राहा.

चंद्रिका. : खिडकीबाहेर ?

लोकनाथ : त्यात काय झालं ? चांगली ऐसपैस जागा आहे तिथं ! तशीच वेळ पडली, तर उतरायला दोन फुटांवर शेजारच्या बिल्डिंगचा मागचा जिना आहे, सरळ ग्रीन चिकन हॉटेलच्या आवारात पोचणारा.

चंद्रिका. : आता तुम्हीच सांगताय्, म्हणून... नाहीतर असला खिडकीतून पाळत ठेवायचा येडचापपणा मी जन्मात कधी केला नसता.

[ लोकनाथ चंद्रिकाबाईंना खिडकीबाहेर घालवतो. ]

लोकनाथ : ( हात झटकीत ) हुश्श–

चंद्रिकाबाई : ( पुन्हा खिडकीत येऊन ) अहो....

लोकनाथ : काय झालं ?

चंद्रिकाबाई : अहो, पण तो रत्नहार चोरीला गेला, त्याचं काय ? तो सुद्धा तुम्ही एकाच फीमध्ये सापडून द्यायला हवा...

लोकनाथ : पाहू या...ती मुलगी भेटली, तर रत्नहारही मिळेल. तुम्ही राहा सदूच्या पाळतीवर. मी मुलीला शोधतो.

[ बळेबळेच तिचं डोकं खिडकीबाहेर घालवतो. ]

ब्रह्मकुमारी : कमाल आहे तुमची ! वाटेल ती कामं काय अंगावर घेता ! ती चोरटी मुलगी कुठनं सापडणार तुम्हांला ?

[ब्रह्मकुमारी गप्प राहण्याची खूण करते.]

चंद्रिका. : मोडलं ते, मी म्हणते, उत्तमच झालं. भर लग्नात एक भुरटी मुलगी ज्याच्या गळयात येऊन पडते... अशा माणसाला मी कध्धीच मुलगी देणार नाही ! पण देवीजी म्हणतात...

लोकनाथ : देवीजी ?... हां हां... म्हंजे ही!

चंद्रिका. : या म्हणतात... ज्योतिषशास्त्राप्रमाणे सोनालीचं लग्न सदू टेकाडेशीच व्हायला हवं !

लोकनाथ : मग !

चंद्रिका. : मग काय !

चंद्रिका. : एकीकडे या सद्याचा मवालीपणा आणि दुसरीकडे ज्योतिषशास्त्र... यात काय करावं, हेच मला कळेनासं झालंय्. म्हणून देवीजींनी मला तुमचा सल्ला घ्यायचा सल्ला दिला.

ब्रह्मकुमारी : पण, चंद्रिकाबाई, यांनी तुम्हांला काही सल्ला देण्याआधी मला यांना परिस्थिती नीट समजावून द्यावी लागेल. अर्थात खाजगीत. तेव्हा तुम्ही जरा वेळ खिडकीतून निसर्गशोभा पाहता का ?

चंद्रिका. : पाहते ना... पाहते...

[खिडकीशी जाऊन उभी राहते. लोकनाथ व ब्रह्मकुमारी तातडीची चर्चा करू लागतात.]

ब्रह्मकुमारी : ही तीच चोरटी मुलगी ना ? मघा तुम्ही मला जिच्याबद्दल सांगत होता, ती...?

लोकनाथ : बहुधा तीच. फक्त तिचं सदूच्या गळयात पडण्याचं टायमिंग चुकलेलं दिसतंय्. मी सगळं सांगून टाकू का चंद्रिकाबाईंना ?

ब्रह्मकुमारी : तिच्याबद्दल सांगितलंत, की माझ्याविषयीसुद्धा सांगावं लागेल. ब्रह्मकुमारी म्हंजे कणकवलीची शाली भुगे, हे चंद्रिकाबाईंना कळलं, तर... लोकनाथ, माझं एकुलतं एक भरवशाचं गिऱ्हाईकसुद्धा तुम्ही काढून घेणार !

लोकनाथ : बरं बरं... नाही मी सांगत !

चंद्रिका. : संपली का तुमची खाजगी चर्चा ?

लोकनाथ : माझी खात्री पटली, चंद्रिकाबाई. तुम्ही सोनालीचं लग्न सदू टेकाडेबरोबरच करून द्यायला हवं.

चंद्रिका. : ( किंचाळून ) का... य ? त्या मवाल्याबरोबर ?

लोकनाथ : नाही, चंद्रिकाबाई ! मी तुम्हांला गॅरंटी देतो. सदू टेकाडे हा अगदी धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे ! हवं, तर तुम्ही असं करा. तुम्ही स्वतःच इथं थांबा आणि सदूच्या चालचालणुकीवर पाळत ठेवा...

चंद्रिका. : पाळत कशी ठेवायची ? मी इथं दिसले, तर तो सभ्यपणाचंच नाटक करणार !

लोकनाथ : मग असं करा... तुम्ही या खिडकीबाहेर उभ्या राहा.

चंद्रिका. : खिडकीबाहेर ?

लोकनाथ : त्यात काय झालं ? चांगली ऐसपैस जागा आहे तिथं ! तशीच वेळ पडली, तर उतरायला दोन फुटांवर शेजारच्या बिल्डिंगचा मागचा जिना आहे, सरळ ग्रीन चिकन हॉटेलच्या आवारात पोचणारा.

चंद्रिका. : आता तुम्हीच सांगताय्, म्हणून... नाहीतर असला खिडकीतून पाळत ठेवायचा येडचापपणा मी जन्मात कधी केला नसता.

[ लोकनाथ चंद्रिकाबाईंना खिडकीबाहेर घालवतो. ]

लोकनाथ : ( हात झटकीत ) हुश्श—

चंद्रिकाबाई : ( पुन्हा खिडकीत येऊन ) अहो....

लोकनाथ : काय झालं ?

चंद्रिकाबाई : अहो, पण तो रत्नहार चोरीला गेला, त्याचं काय ? तो सुद्धा तुम्ही एकाच फीमध्ये सापडून द्यायला हवा...

लोकनाथ : पाहू या...ती मुलगी भेटली, तर रत्नहारही मिळेल. तुम्ही राहा सदूच्या पाळतीवर. मी मुलीला शोधतो.

[ बळेबळेच तिचं डोकं खिडकीबाहेर घालवतो. ]

ब्रह्मकुमारी : कमाल आहे तुमची ! वाटेल ती कामं काय अंगावर घेता ! ती चोरटी मुलगी कुठनं सापडणार तुम्हांला ?

लोकनाथ : गजा...

ब्रह्मकुमारी : गजा कोण !

लोकनाथ : माजी खिसेकापू. त्यांना त्यांच्या लायनीतले लोक बरोबर माहीत असतात ! आता चल बरं...जरा खाली जाऊन एकमेकांच्या सहवासाचा आनंद लुटू !

ब्रह्मकुमारी : का ! इथं काय वाईट आहे !

लोकनाथ : ती आहे ना.... ( खिडकीकडे बोट. ) आपल्या पाळतीवर !...चल...

[ दोघं बाहेर जातात...चंद्रिका. खिडकीतून डोकं आत घालतात. ]

चंद्रिकाबाई : अहो...अहो....गेली की काय ही दोघं बाहेर ! अरे कर्मा...आता काय करू ! मी तरी काय वेडी आहे ! घर रिकामं नि मी कशाला दडून बसलेय् !

[ खिडकीतून आत येते. एवढ्यात लॅच-की लावल्याचा आवाज. ]

चंद्रिकाबाई : कोणीतरी येतंय् वाटतं ! लपा लपा, चंद्रिकाबाई...

[ खिडकीत दडून बसते. दार उघडतं आणि गजा व माला येतात. ]

माला : ए गजा...असं नाही हां करायचं ! सांगून ठेवते ! तू दिवा लाव बरं— मला धडपडायला होतंय् काळोखात !

गजा : कुठाय् काळोख ! आज आपला मधुचंद्र नाही का सुरू झाला ! मग त्याचं चांदणं पडलंय् की टिपूर !

माला : चावटपणा करू नकोस. आधी दिवा लाव.

गजा : बरं, आधी दिवा—मग चावटपणा ! ( दिवा लावतो. ) आता मी—

माला : काही करायचं नाही. मला जाम भूक लागलेय् ! मी दोघांसाठी गरमा-गरम आम्लेट करते. तोवर तू कपडे बदल.

गजा : ( खिदळत ) कपडे बदलू, की काढू !

[ हातावर हात चोळीत हसत हसत बेडरूममध्ये जातो. ]

माला : ( पदर लांब धरून सिनेमातल्यासारखी नाचत )
आज ये मेरी जिंदगी–
देखो खुशीमें झूमती...
जाने चली....कहाँ....
जाने चलीऽ....कहाँऽ

[चंद्रिकाबाई खिडकीतून पाहतात. माला नाचत नाचत आत निघून जाते. चंद्रिकाबाईंना मुद्देमाल सापडल्याचा आनंद. त्या बंद खिडकीशी येऊन टकटक करतात. गजा नुसती अंडरवेअर घालून बाहेर येतो. खिडकी-बाहेर एक बाई दिसताच तसाच आत पळत सुटतो. चंद्रिका. त्याचा अवतार पाहून अधिकच हतबुद्ध. क्षणभरानं गजा खांद्यावर सदरा टाकून पायजम्याची नाडी बांधत बाहेर येतो. खोलीतला दिवा लावतो....]

गजा : ( खिडकी न उघडताच ) कोण तुम्ही ?
चंद्रिका. : ते कळेल नंतर !
गजा : ( तावदान किलकिलं करून ) काय पाहिजे तुम्हांला ?
चंद्रिका. : इथं हा कसला नंगानाच चाललाय् !
गजा : नाही ! अजून कुठं चालू झालाय् नंगानाच !
चंद्रिका. : मग ? ती पदर पाडून नाचणारी नटवी पोरगी कोण आहे ?
गजा : नटवी पोरगी ? इथं नाही कोणी नटवी पोरगी !
चंद्रिका. : खोटं बोलू नकोस. मी माझ्या डोळ्यांनी पाहिलंय् तिला. मला चौकशी करायचीय् त्या बाजारबसवीची.
गजा : तोंडाला येईल, ते बोलू नका. चालत्या व्हा पाहू इथून !

[तावदान धाडकन् लावून घेतो. चंद्रिकाबाईचं बोट बहुधा फटीत सापडलं असावं. त्या हायहुई करीत खिडकीतून अदृश्य होतात.]

माला : ( बाहेर येत ) काय झालं, गजा ? कुणाशी बोलतोयस तू ?
गजा : माला, तू आपल्या लग्नाच्या आधी कुठं जाऊन आलीस ?
माला : कुठं म्हणजे ? वाळकेश्वरला–देवळात !

गजा : नक्की ? कुठं हात चालवायला गेली नव्हतीस ना ?–खरं सांग.

माला : अरे, कशी जाईन मी–तू एवढं सांगितलं असताना ?

गजा : मग तुझी चौकशी करायला बाहेर एक स्त्री–पोलिस आलीय्, ती कशाला ?

माला : ( खिडकी उघडून तिच्यातून पलीकडे पाहत ) हॅ–ती काय स्त्री पोलिस नाहीये ! ती सरळ सरळ बाई आहे !

गजा : कुठली बाई ?

माला : मला काय माहीत ? पण मला कुणाच्या लफड्यात सापडायचं नाही ! मी फुटते इथनं. तू तिला घालव आणि मला खालच्या हॉटेलात भेट.

[ घाईघाईनं जाते.
चंद्रिकाबाई खिडकीशी येतात. पर्समधून एक दहाची नोट काढून खिडकीबाहेर हलवतात. गजा खिडकी उघडतो. ]

चंद्रिका. : काय, रे, केवढ्या जोरानं खिडकी लावून घेतलीस ? माझी बोटं चेमटली ना ?

गजा : वाईट सवय दाराच्या फटीत बोटं घालायची !

चंद्रिका. : हे दहा रुपये हवेत ना तुला ? मग आता सगळी माहिती दे पाहू पटा-पट–आधी तू कोण आहेस, ते सांग.

गजा : मी साहेबांचा सेक्रेटरी. दीड महिन्यापासनं त्यांचं काम बघतो.

चंद्रिका. : या दीड महिन्यात बाया किती वेळा आल्या सायबांकडे ?

गजा : एकदा पण नाही, बाई.

चंद्रिका. : बायका इथं येत नाहीत ? मग काय हे जातात बायकांकडे ?

गंजा : बिलकुल नाही. सदूशेठ म्हंजे अगदी धुतल्या तांदळासारखे स्वच्छ ! बाई नाही–बाटली नाही ! अफू नाही–गांजा नाही ! रेस नाही ! जुगार नाही. अहो, साधं शब्दकोडंसुद्धा सोडवता येत नाही त्यांना. आता आणा ते दहा रुपये. ( नोट खेचून घेतो. )

चंद्रिका. : साफ खोटं बोलतोय्स तू ! ( नोट त्याच्या हातातून हिसकावून घेते. ) आणि काय, रे, मघाची ती चोरटी मुलगी कुठाय् ?

गजा : ( संतापून ) काही सांगणार नाही. तुम्ही चालत्या व्हा !

[ खिडकी पुन्हा धाडकन बंद करतो व दिवा माल्वून निघून जातो. ]

चंद्रिका. : ( खिडकीवर ठोठावत ) अरे ए....चाललास कुठं ! अरे, मी पडेन खाली. हे बघ, पैसे देतेय् मी तुला... ( ठोठावताना खिडकी एकदम उघडते. ) मेला विसरला रागाच्या भरात कडी लावायला. ( खिडकीतून फ्लॅटमध्ये उतरत) आता मीच बघते, कुठं लपवलंय् ते त्या नटव्या चोरट्या सटवीला ! ( दिवा लावते. ) या खोलीत तर नाही ! आतल्या खोलीत असेल... ( बेडरूमच्या दारातून ) यूहू...बाहेर ये...( पॅसेजमध्ये जाऊन) यूहू...यूहू...यूहू...मेले, बाहेर ये, म्हंजे पोलिसात देते बघ तुला ! ( मधेच थांबून ) किचनमधून कसला वास येतोय् ! इकडे माझ्या पोटात पडलीय् आग ! काय मेलं चमचमीत केलंय्, ते तरी बघते...

[ किचनमध्ये जाते.
तिनं पोलिसाचं नाव काढताक्षणी लॅच-कीनं दार उघडून इन्स्पेक्टर धोंड आत आलेला...तो थोडी टेहळणी करतो. मग फर्निचरच्या मागे दडून बसतो. चंद्रिकाबाई एका प्लेटमधे आम्लेट घेऊन येतात. दुसऱ्या हातात मिरी-मिठाची भांडी. ]

चंद्रिका. : काय करणार ! या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावल्याखेरीज पाणी प्यायचं नाही, अशी प्रतिज्ञा केलीय् ना ! मग कोरडंच खावं लागणार आम्लेट !

[ आम्लेट खायला टेबलाशी बसतात. त्यावर मीठ शिंपडतात. मिरी शिंपडणार, इतक्यात त्यांच्या मागून इन्स्पेक्टर धोंड उभे राहतात. ]

इन्स्पेक्टर : हॅण्ड्स अप.... ( चंद्रिकाबाई मिरीच्या बाटलीसकट हात वर करतात. ) तुम्हांला अटक करण्यात आली आहे.

चंद्रिका. : मी...मला ..मला कशासाठी अटक ?

इन्स्पेक्टर : कशासाठी ! इथला नोकर मला खालीच भेटला. मला इथली लॅच–की देऊन म्हणाला, वर जाऊन बघा ! आमच्या खिडकीत एक संशयास्पद व्यक्ती वावरतेय्.

गजा : नक्की ? कुठं हात चालवायला गेली नव्हतीस ना ?—खरं सांग.

माला : अरे, कशी जाईन मी—तू एवढं सांगितलं असताना ?

गजा : मग तुझी चौकशी करायला बाहेर एक स्त्री-पोलिस आलीय्, ती कशाला ?

माला : (खिडकी उघडून तिच्यातून पलीकडे पाहत) हॅ—ती काय स्त्री पोलिस नाहीये ! ती सरळ् सरळ बाई आहे !

गजा : कुठली बाई ?

माला : मला काय माहीत ? पण मला कुणाच्या लफड्यात सापडायचं नाही ! मी फुटते इथनं. तू तिला घालव आणि मला खालच्या हॉटेलात भेट.

[ घाईघाईनं जाते.
चंद्रिकाबाई खिडकीशी येतात. पर्समधून एक दहाची नोट काढून खिडकीबाहेर हलवतात. गजा खिडकी उघडतो. ]

चंद्रिका. : काय, रे, केवढ्या जोरानं खिडकी लावून घेतलीस ? माझी बोटं चेमटली ना ?

गजा : वाईट सवय दाराच्या फटीत बोटं घालायची !

चंद्रिका. : हे दहा रुपये हवेत ना तुला ? मग आता सगळी माहिती दे पाहू पटापट—आधी तू कोण आहेस, ते सांग.

गजा : मी साहेबांचा सेक्रेटरी. दीड महिन्यापासनं त्यांचं काम बघतो.

चंद्रिका. : या दीड महिन्यात बाया किती वेळा आल्या सायबांकडे ?

गजा : एकदा पण नाही, बाई.

चंद्रिका. : बायका इथं येत नाहीत ? मग काय हे जातात बायकांकडे ?

गजा : बिलकुल नाही. सदूशेठ म्हंजे अगदी धुतल्या तांदळासारखे स्वच्छ ! बाई नाही—बाटली नाही ! अफू नाही—गाजा नाही ! रेस नाही ! जुगार नाही. अहो, साधं शब्दकोडंसुद्धा सोडवता येत नाही त्यांना. आता आणा ते दहा रुपये. (नोट खेचून घेतो.)

चंद्रिका. : साफ खोटं बोलतोय्स तू ! (नोट त्याच्या हातातून हिसकावून घेते.) आणि काय, रे, मधाची ती चोरटी मुलगी कुठाय् ?

गजा : (संतापून) काही सांगणार नाही. तुम्ही चालत्या व्हा !

[ खिडकी पुन्हा धाडकन बंद करतो व दिवा मालवून निघून जातो. ]

चंद्रिका. : ( खिडकीवर ठोठावत ) अरे ए....चाललास कुठं ! अरे, मी पडेन खाली. हे बघ, पैसे देतेय् मी तुला... ( ठोठावताना खिडकी एकदम उघडते. ) मेला विसरला रागाच्या भरात कडी लावायला. ( खिडकीतून फ्लॅटमध्ये उतरत) आता मीच बघते, कुठं लपवलंय् ते त्या नटव्या चोरट्या सटवीला ! ( दिवा लावते. ) या खोलीत तर नाही ! आतल्या खोलीत असेल...( बेडरूमच्या दारातून ) यूहू...बाहेर ये...( पॅसेजमध्ये जाऊन) यूहू...यूहू...यूहू...मेले, बाहेर ये, म्हंजे पोलिसात देते बघ तुला ! (मधेच थांबून) किचनमधून कसला वास येतोय् ! इकडे माझ्या पोटात पडलीय् आग ! काय मेलं चमचमीत केलंय्, ते तरी बघते...

[ किचनमध्ये जाते.
तिनं पोलिसाचं नाव काढताक्षणी लॅच-कीनं दार उघडून इन्स्पेक्टर धोंड आत आलेला...तो थोडी टेहळणी करतो. मग फर्निचरच्या मागे दडून बसतो. चंद्रिकाबाई एका प्लेटमधे आम्लेट घेऊन येतात. दुसऱ्या हातात मिरी-मिठाची भांडी. ]

चंद्रिका. : काय करणार ! या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावल्याखेरीज पाणी प्यायचं नाही, अशी प्रतिज्ञा केलीय् ना ! मग कोरडंच खावं लागणार आम्लेट !

[ आम्लेट खायला टेबलाशी बसतात. त्यावर मीठ शिंपडतात. मिरी शिंपडणार, इतक्यात त्यांच्या मागून इन्स्पेक्टर धोंड उभे राहतात. ]

इन्स्पेक्टर : हॅण्ड्स अप.... ( चंद्रिकाबाई मिरीच्या बाटलीसकट हात वर करतात. ) तुम्हांला अटक करण्यात आली आहे.

चंद्रिका. : मी...मला मला कशासाठी अटक ?

इन्स्पेक्टर : कशासाठी ! इथला नोकर मला खालीच भेटला. मला इथली लॅच–की देऊन म्हणाला, वर जाऊन बघा ! आमच्या खिडकीत एक संशयास्पद व्यक्ती वावरतेय्.

चंद्रिका. : कोण संशयास्पद ? मी !

इन्स्पेक्टर : छे : आता नुसता संशय नाही– मुद्देमालासकट पकडलंय् मी तुम्हांला ! बाईसाहेब, दुसऱ्यांच्या घरात खिडकीतून शिरायचं, ही घरफोडी होते, आणि वर त्यांच्या किचनमध्ये शिरून त्यांचं आम्लेट खायचं–ही चक्क चोरी होते– समजलात ?

चंद्रिका. : तसं काही नाही,, इन्स्पेक्टर– (बोलताना आपल्या हातात मिरीचं भांडं आहे, हे त्यांच्या लक्षात येतं, तिचं झाकण त्या उघडू लागतात.)

इन्स्पेक्टर : काय सांगायचं, ते आता पोलिस कोर्टात सांगा– चला माझ्याबरोबर मुकाट्यानं–

[चंद्रिकाबाईंना नेऊ लागतो. त्या, भांड्यातली मिरी त्याच्या तोंडावर फेकतात, आणि खिडकीतून पळून जातात. इन्स्पेक्टर घोंड या आकस्मिक हल्ल्यातून सावरायच्या आतच दरवाज्याची बेल वाजू लागते. इन्स्पे. शिंकत शिंकत जाऊन दार उघडतो. दारात सोनाली.]

सोनाली : इन्स्पेक्टर – तुम्ही काय करताय् इथं ?

इन्स्पेक्टर : शिंकतोय्, आक् छी : – आत्ता इथं एक जबरदस्त हॉय्-शी : छक् झाला !

सोनाली : काय झाला ?

इन्स्पेक्टर : हॉय् शॅक् – हल्ला !

सोनाली : सदू टेकाड्यांना नाही ना काही झालं ?

इन्स्पेक्टर : त्याना काय होणार ? हल्ला माझ्यावर झाला ! शॅक्—शॅक् ! एक बाई मिरीची पावडर माझ्या तोंडावर फेकून पळाली !

सोनाली : कशाला जाता असल्या हलक्या बायकांच्या वाटेला ?

इन्स्पेक्टर : वाटेला नव्हतो गेलो. मी तिला ॲक् शॅक् शॅक् करीत होतो !

सोनाली : बाई– ! तिला काय करीत होता ?

इन्स्पेक्टर : ॲक् – टॅक् – शॅक – अटक !

सोनाली : अटक केलीत, म्हणून काय झालं ? तिनं मिरचीपावडर तोंडावर फेकायची ! बिच्चारे !

इन्स्पेक्टर : थँक्यू फॉर युअर सिश् विश् वॉश – सिम्पथी : नाहीतर या जगात

पोलिसांना कोण सहानुभूती दाखवतं ! सगळ्यांची सहानुभूती चोरालाच !

सोनाली : खरं आहे !

इन्स्पेक्टर : मी जातो, बाई, अजून मला अंगात कपडे घालायचे आहेत–

सोनाली : इश्श – कपडे आहेत की तुमच्या अंगात !

इन्स्पेक्टर : हा युनिफॉर्म आहे. मी तो काढून टाकणार आहे !

सोनाली : अय्या...

इन्स्पेक्टर : आणि साधे कपडे घालणार आहे. आम्हांला आता एका हॉटेलवर रेड घालायची आहे ना...म्हणून !

सोनाली : बेस्ट ऑफ लक ! मस्त रेड घाला अगदी. मी इथं वाट पाहते सदू टेकाडेची...गुड नाईट !

इन्स्पेक्टर : गुड नॉश...विश टॉश गुड नाईट !

[ शिंकत शिंकत निघून जातो...तो गेल्यावर सोनाली खोलीची पाहणी करते...टेबलवर पडलेली आम्लेटची प्लेट उचलते, आणि आत घेऊन जाते. एवढ्यात लॅच–कीनं दरवाजा उघडून लोकनाथ आत येतो. प्लेट ठेवून सोनाली बाहेर येते. ]

सोनाली : अरे वा ! बरे भेटलात !

लोकनाथ : बरा भेटलो, म्हंजे ? तुम्हांला पाहूनच तर मुद्दाम वर आलोय् !

सोनाली : कशाला ? लग्न मोडलं, म्हणून माझं अभिनंदन करायला ?

लोकनाथ : हळू बोला ! खिडकी ऐकेल ! आणि माझ्यावर कशाला डाफरताय् ? लग्न काय मी मोडलं ?

सोनाली : मारे तरफदारी केलीत आपल्या मित्राची – शेवटी तो असा निघाला. मुलींना फसवणारा ! त्याला जाब विचारायलाच इथं आलेय् मी !

लोकनाथ : सदू काय जाब देणार ? तो बापडा त्या मुलीला ओळखतसुद्धा नाही !

सोनाली : त्याशिवाय का ती त्याच्या गळ्यात पडली ?

लोकनाथ : त्याच्या गळ्यात नाही ! ती तुमच्या गळ्यात पडली ! रत्नहार चोरण्यासाठी....

सोनाली : म्हणायचंय् काय तुम्हांला ?

लोकनाथ : ती मुलगी निव्वळ रत्नहार चोरायला आली होती! सदूनं फसवलं, वगैरे सगळं नाटक...

सोनाली : खरं सांगताय् !

लोकनाथ : खोटं कसं सांगेन! धंद्यातली सचोटी, हीच आमची कसोटी! आजच भेटा! लोकनाथ लुकतुके आणि...

सोनाली : म्हंजे सदू भामटा नाही? नक्की?

लोकनाथ : खात्री करून घ्यायची असेल, तर इकडे खिडकीखाली बसा....नाहीतर नको. तिथं आधीच एकजण... (खिडकीशी जाऊन बघत) आं! या कुठं गेल्या?

सोनाली : कोण कुठं गेल्या!

लोकनाथ : चंद्रिकाबाई...त्या इथं होत्या!

सोनाली : मॉ...म? ती कशी असेल इथं! तुमची तब्येत ठीक आहे ना!

लोकनाथ : अहो, खरंच होत्या. आता पडल्याबिडल्या नसल्या म्हंजे मिळवलं! खालच्या लोकांचे वांधे!

सोनाली : तुमचं लक्षण काही ठीक दिसत नाही. सदूबद्दल तरी खरं सांगताय्, की नाही, कोण जाणे, आता येऊ दे तो...चांगली खरडपट्टी काढते!

[ लॅच-कीनं दरवाजा उघडून थकला भागला सदू आत येतो. दोघंही एकमेकांकडे क्षणभर पाहत राहतात...मग– ]

सदू : सोनाली...

सोनाली : सदू....( अंतरावरून धावत येऊन एकमेकांना मिठी मारतात. )

[ लोकनाथ डोळे टिपतो. ]

सदू : सोनाली तू कशी काय आलीस?

सोनाली : माझं राहू दे. पण तू कुठं होतास इतका वेळ?

सदू : मी? मी दुःखात होतो. आपलं लग्न मोडल्याच्या दुःखानं मी गेले बारा तास उन्हात, पावसात, थंडीत, उपाशी वणवण वणवण भटकत होतो!

सोनाली : सदू, हे म्हणतात, ती सकाळची मुलगी नुसती हार चोरायला आली होती!

क्र. २९८२५ नों. दि ३।७।८६
वि. नाटक

सदू : तर! अग, त्या कैदासणीला मी याआधी कधीच पाहिलं नव्हतं...

सोनाली : खरंच, सदू? तू कित्ती कित्ती चांगला आहेस!

लोकनाथ : गिऱ्हाइकाचं समाधान हाच आमचा आनंद, मी जातो. (जातो.)

सोनाली : (प्रेमाने विव्हळत) सदू...

सदू : (डिट्टो) सोनाली...

सोनाली : तरी मला वाटलंच—की तुझ्यासारख्या माणसाला असल्या पोरीबिरींच्या भानगडी काय जमणार?

सदू : (किंचित दुखावून) का नाही जमणार? जमतील ना—त्यात काय? पण मी त्या करणार नाही—कारण माझं तुझ्यावरच प्रेम आहे!

सोनाली : सदू, आता तू मला सोडून कुठ्ठं कुठ्ठं जायचं नाहीस हं!

सदू : कुठ्ठं कुठ्ठं नाही. तू सुद्धा मला सोडून कुठ्ठं कुठ्ठं जायचं नाहीस हां!

सोनाली : मी ना? कुठ्ठं जाणार नाही तुला सोडून— हं, सदू, मी जरा जाऊन येते हं अर्ध्या तासात!

सदू : आं—?

सोनाली : तशी जात नाहीये, रे. पण इथं जवळच एक मैत्रीण राहते—तिच्याकडून रात्री बदलायला कपडे घेऊन येते!

सदू : म्हंजे, सोनाली—म्हंजे, सोनाली, आज रात्री तू खरंच इकडे राहणार! हुर्रेऽऽ... (हात चोळत) मी असं करतो— खाली ग्रीन चिकनमध्ये जाऊन चहाचे दोन कडकडीत कप मारतो! टु सेलिब्रेट अवर ब्रोकन वेडिंग नाइट! दोन कप!—मजा येईल! भलतीच मजा येईल!

सोनाली : मग? जाऊ ना मी?

सदू : पण लवकर परत येशील ना? सोनाली, तू येईपर्यंतचा पळ पळ मला युगासारखा वाटत राहील! आकाशात येणाऱ्या चंद्राकडे पाहून मी उसासे सोडत म्हणेन—(भसाड्या आवाजात) जा, रे, चंद्रा...

सोनाली : जाते जाते—(दारापर्यंत जाते.)

सदू : (विव्हलपणे हात हलवीत) सोनाली...

सोनाली : सदू...

[अत्यंत दुःखी अंतःकरणानं दोघं एकमेकांचा निरोप घेत असतानाच—]

**काळोख**

## प्रवेश दुसरा

[ ग्रीन चिकन हॉटेलचा काही भाग. वाद्यमेळ. न्यूऑन साईन्सचं हिरवं कोंबडं. महागड्या पण सवंग हॉटेलसारखी रंगीबेरंगी प्रकाश-योजना. समोर दिसणाऱ्या टेबलापाशी साध्या वेशातला इन्स्पेक्टर घोंड पाठमोरा बसला आहे. तेवढ्यात सदू येतो. वेटर त्याला वाटेतच अडवतो. ]

वेटर : आत अजिबात जागा नाहीये, साहेब. एकमेकांच्या मांडीवर बसलीयूत माणसं. इकडे या...इथं खुर्ची रिकामी आहे. चालेल ना !

रविकिरण : आपल्याला काय, कुठंही बसू. व्हिस्की मिळाल्याशी कारण !

वेटर : कुठली आणू , साहेब ? ॲक्रोबॅट, की गुड हेवन्स ?

रविकिरण : कुठली तरी आण, रे ... आग लागलीय्.

वेटर : ( घाबरून ) कुठं ?

रविकिरण : ( पोटावर हात ठेवून ) इथं.

वेटर : मग हरकत नाही. वन लार्ज ?

[ रविकिरण मान डोलावतो. वेटर जातो. ]

इन्स्पेक्टर : इथं .. व्हिस्की मिळते ?

रविकिरण : व्हिस्की ? अहो, शॅम्पेनसुद्धा मिळते. पण सगळ्यांना नाही, फक्त ओळखीच्या लोकांना. आणि कशातनं देतात माहीतेय् ? (खिदळत) चहाच्या किटलीतून !

इन्स्पेक्टर : ( त्याच्याच सारखा खिदळत) चहाच्या किटलीतून ? ते का, बुवा ?

रविकिरण : पोलिसांना गंडवायला ! द्या टाळी !

इन्स्पेक्टर : का पण ? या हॉटेलला लायसन्स नाही का लिकर विकायचं ?

रविकिरण : नाही ना ! पोलिस लोक कुठं मिळू देतात ? हरामखोर साले ! लायसन्स दिलं, तर यांचे हप्ते बुडतील ना ? जाम खाबू असतात पोलिस !

इन्स्पेक्टर : हो तर...जाम खाबू !

रविकिरण : मी जरा व्हिस्कीबरोबर खायला काय घेता येईल, ते बघून येतो.

[ जातो. तेवढ्यात सदू येतो. ]

सदू : ( इन्स्पेक्टरला ) मी इकडं बसलो, तर तुमची हरकत नाही ना!
इन्स्पेक्टर : छे छे! बसा ना...
सदू : वेटर... ( वेटर येतो, त्याला ) मस्तपैकी दोन कप चहा आण. कडकडीत.
वेटर : किटलीतून ना!
सदू : अर्थातच! नाहीतर कशातून आणणार चहा!
वेटर : कुठला ब्रॅण्ड, साहेब?
सदू : कुठलाही आण, रे! ब्रुक बॉण्ड, नाहीतर लिप्टन! त्यात काय विशेष?
वेटर : दोन लार्ज ना?
सदू : हो, दोन लार्ज कप! जा. ( वेटर जातो. )
इन्स्पेक्टर : काय हो, तुम्ही नेहमी येता वाटतं इथं चहा प्यायला!
सदू : छे, हो! आज पहिल्यांदाच आलो. भलतं महागडं आहे, हो, हे हॉटेल. मला काय परवडतंय्! पण आज विशेष आनंदात आहे, म्हणून आलो. ( थांबून ) मला तुम्हांला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतं!
इन्स्पेक्टर : शक्यच नाही! आज मी नेहमीपेक्षा अगदी वेगळेच कपडे घातलेत!
सदू : तरी पण... ( रविकिरण येतो. )
रविकिरण : ऑक्टोपस फ्राय खाऊन आलो. मस्त होता!
सदू : अरे, वा! तुम्ही कसे काय इकडे?
रविकिरण : काय करणार, हो! इथल्यासारखा ऑक्टोपस दुसरीकडे कुठंच...
सदू : हां....आत्ता आठवलं, मी यांना कुठं पाहिलं, ते!
रविकिरण : कुणाला? ( इन्स्पेक्टरचा निर्देश. ) यांना?
सदू : हो! लोकनाथनंच ओळख करून दिली होती. हे इन्स्पेक्टर घोंड!
रविकिरण : पोलिस इन्स्पेक्टर! अरे बाप, रे!
इन्स्पेक्टर : का? दचकायला काय झालं?
रविकिरण : कुठं काय? ( बोटं एकमेकांवर आपटीत...सहजतेचं ॲक्टिंग करीत ) टारा रीम... रीम... रीम... टारा रीम....
इन्स्पेक्टर : नाव काय, हो, तुमचं?
रविकिरण : माझं नाव! माझं नाव.... आता पक्के वांदे...
इन्स्पेक्टर : पक्या वांदे काय? मग माझं नाव शंकर आचार्य!

रविकिरण : ग्लॅड टु मीट यू, मिस्टर शंकर आचार्य! मी मघाशी तुमची नुसती गंमत करीत होतो, बरं का! या हॉटेलात दारूबिरू काही मिळत नाही. कायद्याला फार भिऊन वागणारे लोक आहेत हे!

सदू : मला कळत नाही, रविकिरण... तुमचं नाव रविकिरण रत्नपारखी असताना तुम्ही पक्या बांदे असं का सांगितलंत?

रविकिरण : रविकिरण....? कोण रविकिरण?

सदू : तुम्हीच! आज सकाळी नाही का आपली लग्नात गाठ पडली?

रविकिरण : हां...तो होय? तो माझा सख्खा जुळा भाऊ.

इन्स्पेक्टर : तुम्ही पक्या बांदे... मग रत्नपारखी तुमचा सख्खा जुळा भाऊ कसा असेल?

सदू : एवढं समजत नाही? ते तुमची गंमत करताहेत. तुम्ही नाही का शंकर आचार्य नाव सांगून त्यांची गंमत केली?

[ वेटर ट्रेमध्ये चहाच्या दोन किटल्या आणि कप घेऊन येतो. ]

रविकिरण : (वेटरला डोळा मारीत) हे कशाला आणलंस? मला चहा नकोय् आत्ता. घेऊन जा. परत घेऊन जा हा चहा...

वेटर : (हसत) चहा? हा हा! भलतेच विनोदी आहात, साहेब, तुम्ही. बरं चहात सोडा घालू, की पाणी?

रविकिरण : मला काहीही नकोय्.

[ एव्हाना सदू व्हिस्की कपात ओतून मजेत पिऊ लागतो. ]

वेटर : थांबा, साहेब, चहात घालायला बर्फ घेऊन येतो!

सदू : चहात बर्फ? हा हा! भलताच विनोदी आहे हा वेटर! पण मस्त आहे इथला चहा. थोडा जास्तच कडू आहे...पण चालेल, चालेल!

रविकिरण : (वेटरला) हे बघ, मी तुला सांगतोय्, की ती चहाची किटली परत घेऊन जा.

वेटर : असं रागवायला काय झालं, साहेब? तुम्ही व्हिस्की ऑर्डर केली होती ना? आपण नेहमी व्हिस्की चहाच्या किटलीतूनच देतो! खरंच ही व्हिस्की आहे, साहेब! (उघडून दाखवीत) गुड हेवन्स— घन लार्ज...

[ सदूला प्रचंड ठसका लागतो. ]

इन्स्पेक्टर : (उठून उभा राहत वेटरला) तुला ॲरेस्ट केलंय्. (रविकिरणला) तुम्हांला... (सदूला) आणि तुम्हांलाही...!

सदू : (प्रथमच प्यायलेली व्हिस्की डोक्यात गेल्यामुळे) कोण आपल्याला ॲरेस्ट करतो, ते बघतो!

[ इन्स्पेक्टरच्या नाकावर एक ठोसा लगावून देतो.
इन्स्पेक्टर खिशातली शिट्टी काढून मोठ्यानं वाजवतो. त्याबरोबर आणखीही शिट्या वाजतात. लोकांचा आरडाओरडा, गोंधळ! इन्स्पेक्टर शिटी वाजवण्यासाठी वळलेला पाहून सदू पळ काढू लागतो. पण इन्स्पेक्टर त्याला धरायला पुढं होतो. वेटर टेबलावरचा ट्रे उचलतो. सदू प्रसंगावधान राखून टेबलक्लॉथ उचलतो आणि इन्स्पेक्टरच्या तोंडावर टाकतो. पण इन्स्पेक्टर त्याची तंगडी पकडतो. वेटर शांतपणे हातातला ट्रे बाजूला ठेवतो व इन्स्पेक्टरला एक गुद्दा ठेवून देतो. इन्स्पेक्टर धडपडतो, सदू सुटतो व शेजारच्या जिन्यानं वर पळून जातो. इन्स्पेक्टर उठतो आणि एक गुद्दा लगावतो, तो मध्ये आलेल्या रविकिरणला लागतो. रविकिरण गरसमजानं वेटरला गुद्दा मारतो. तिघांची मारामारी होते. इतक्यात दिवे जातात. आणि खाडकन् काळोख होतो. (म्हणजे निळा प्रकाश पसरतो.) लोकांचा आरडाओरडा ऐकू येतो. काळोखातच लोकनाथ आणि ब्रह्मकुमारी जिन्याच्या दिशेनं जाऊ लागलेली दिसतात. ]

ब्रह्मकुमारी : किती छान सुचलं, हो, तुम्हांला! अगदी अचूक वेळी दिवे घालवलेत.

लोकनाथ : मग? तू मला समजलीस कोण? जगाच्या कल्याणा! लोकनाथा जाणा! हं, ही किल्ली घे आणि वर सदूच्या खोलीत जाऊन बैस. मी आलोच मागून.

[ जातो, ब्रह्मकुमारी जिना चढत असतानाच... ]

**काळोख**

रविकिरण : ग्लॅड टु मीट यू, मिस्टर शंकर आचार्य ! मी मघाशी तुमची नुसती गंमत करीत होतो, बरं का ! या हॉटेलात दारूबिरू काही मिळत नाही. कायद्याला फार भिऊन वागणारे लोक आहेत हे !

सदू : मला कळत नाही, रविकिरण... तुमचं नाव रविकिरण रत्नपारखी असताना तुम्ही पक्या वांदे असं का सांगितलंत ?

रविकिरण : रविकिरण....? कोण रविकिरण ?

सदू : तुम्हीच ! आज सकाळी नाही का आपली लग्नात गाठ पडली ?

रविकिरण : हां...तो होय ? तो माझा सख्खा जुळा भाऊ.

इन्स्पेक्टर : तुम्ही पक्या वांदे... मग रत्नपारखी तुमचा सख्खा जुळा भाऊ कसा असेल ?

सदू : एवढं समजत नाही ? ते तुमची गंमत करताहेत. तुम्ही नाही का शंकर आचार्य नाव सांगून त्यांची गंमत केली ?

[ वेटर ट्रेमध्ये चहाच्या दोन किटल्या आणि कप घेऊन येतो. ]

रविकिरण : (वेटरला डोळा मारीत) हे कशाला आणलंस ? मला चहा नकोय् आत्ता. घेऊन जा. परत घेऊन जा हा चहा...

वेटर : (हसत) चहा ? हा हा ! भलतेच विनोदी आहात, साहेब, तुम्ही. बरं चहात सोडा घालू, की पाणी ?

रविकिरण : मला काहीही नकोय्.

[ एव्हाना सदू व्हिस्की कपात ओतून मजेत पिऊ लागतो. ]

वेटर : थांबा, साहेब, चहात घालायला बर्फ घेऊन येतो !

सदू : चहात बर्फ ? हा हा ! भलताच विनोदी आहे हा वेटर ! पण मस्त आहे इथला चहा. थोडा जास्तच कडू आहे...पण चालेल, चालेल !

रविकिरण : (वेटरला) हे बघ, मी तुला सांगतोय्, की ती चहाची किटली परत घेऊन जा.

वेटर : असं रागवायला काय झालं, साहेब ? तुम्ही व्हिस्की ऑर्डर केली होती ना ? आपण नेहमी व्हिस्की चहाच्या किटलीतूनच देतो ! खरंच ही व्हिस्की आहे, साहेब ! (उघडून दाखवीत) गुड हेवन्स— घन लाजं...

[ सदूला प्रचंड ठसका लागतो. ]

इन्स्पेक्टर : (उठून उभा राहत वेटरला) तुला ॲरेस्ट केलंय्. (रविकिरणला) तुम्हांला... (सदूला) आणि तुम्हांलाही...!

सदू : (प्रथमच प्यायलेली व्हिस्की डोक्यात गेल्यामुळे) कोण आपल्याला ॲरेस्ट करतो, ते बघतो!

[ इन्स्पेक्टरच्या नाकावर एक ठोसा लगावून देतो.
इन्स्पेक्टर खिशातली शिट्टी काढून मोठ्यानं वाजवतो. त्याबरोबर आणखीही शिट्या वाजतात. लोकांचा आरडाओरडा, गोंधळ! इन्स्पेक्टर शिटी वाजवण्यासाठी वळलेला पाहून सदू पळ काढू लागतो. पण इन्स्पेक्टर त्याला धरायला पुढं होतो. वेटर टेबलावरचा ट्रे उचलतो. सदू प्रसंगावधान राखून टेबलक्लॉथ उचलतो आणि इन्स्पेक्टरच्या तोंडावर टाकतो. पण इन्स्पेक्टर त्याची तंगडी पकडतो. वेटर शांतपणे हातातला ट्रे बाजूला ठेवतो व इन्स्पेक्टरला एक गुद्दा ठेवून देतो. इन्स्पेक्टर धडपडतो, सदू सुटतो व शेजारच्या जिन्यानं वर पळून जातो. इन्स्पेक्टर उठतो आणि एक गुद्दा लगावतो, तो मध्ये आलेल्या रविकिरणला लागतो. रविकिरण गरसमजानं वेटरला गुद्दा मारतो. तिघांची मारामारी होते. इतक्यात दिवे जातात. आणि खाडकन् काळोख होतो. (म्हणजे निळा प्रकाश पसरतो.) लोकांचा आरडाओरडा ऐकू येतो. काळोखातच लोकनाथ आणि ब्रह्मकुमारी जिन्याच्या दिशेनं जाऊ लागलेली दिसतात. ]

ब्रह्मकुमारी : किती छान सुचलं, हो, तुम्हांला! अगदी अचूक वेळी दिवे घालवलेत.

लोकनाथ : मग! तू मला समजलीस कोण! जगाच्या कल्याणा! लोकनाथा जाणा! हं, ही किल्ली घे आणि वर सदूच्या खोलीत जाऊन बैस. मी आलोच मागून.

[ जातो, ब्रह्मकुमारी जिना चढत असतानाच... ]

**काळोख**

## प्रवेश तिसरा

[ सदू टेकाडेचा फ्लॅट. खिडकी उघडते, आणि सदू घरात शिरतो. त्याच्यावर 'ग्रीन चिकन'मध्ये चहा समजून प्यालेल्या व्हिस्कीचा अंमल चढलेला. तो दिवा लावतो, आणि दिवाणावर अंग टाकतो. एवढ्यात काहीतरी डोक्यात येऊन दिवा मालवतो आणि दिवाणाखाली अंगाची जुडी करून झोपून राहतो. काही क्षणांतच ब्रह्मकुमारी धावत येते आणि खिडकीतून आत शिरते. दिवा लावते आणि त्याच दिवाणावर अंग टाकते. सदू तिच्या पायांच्या एका बाजूनं दिवाणाखालून बाहेर पाहतो. मग तिकडून 'बाहेर पडून रांगत रांगत दुसऱ्या दिवाणाखाली जाऊन आडवा होतो.
त्याच वेळी ब्रह्मकुमारी दिवाणावर उठून बसते. पलिकडच्या दिवाणाकडे रांगत जाणाऱ्या सदूला पाहून मोठ्यानं किंचाळते. ]

सदू : श्श ! किंचाळू नकोस. पोलिस येतील.

ब्रह्मकुमारी : पोलिस...! (पुन्हा किंचाळते.)

सदू : किंचाळू नको म्हणतो, तर...

ब्रह्मकुमारी : न किंचाळून कसं चालेल ! तू घाबरवतोय्स मला....

सदू : तुला काय झालं घाबरायला ?

ब्रह्मकुमारी : पोलिसांनी रेड घातली ना खालच्या ग्रीन चिकन हॉटेलवर ! तिथं मी आणि लोकनाथ बसलो होतो.

सदू : मी पण. तिथं चहा भलताच मस्त करतात !

ब्रह्मकुमारी : चहा ! ती व्हिस्की होती, व्हिस्की !

सदू : तुला काय म्हणायचंय् ! मी व्हिस्की प्यालोय् ! छट् ! आपण दारू कधीच पीत नाही.

ब्रह्मकुमारी : ते आता पोलिसांना सांग ! ते सबंध बिल्डिंग शोधताहेत रेडमधून पळून गेलेल्यांसाठी.

[ दारावरची बेल वाजते. ]

सदू : पोलिस ! (दिवाणाखाली लपतो.)

ब्रह्मकुमारी : पोलिस कसे असतील ? लोकनाथ येणार होता आत्ता माझ्या मागून ! तोच असेल. जरासुद्धा धीर निघत नाही त्याला....

[असं म्हणतच दार उघडते. दारात इन्स्पेक्टर धोंड.]

ब्रह्मकुमारी : (किंचाळून) तुम्ही ? आत येऊ नका. मी बाहेर जायची तयारी करतेय्.

इन्स्पेक्टर : तुम्ही ? मघाशी तर इथं वेगळी मुलगी होती.

ब्रह्मकुमारी : ती मीच होते. सबंध संध्याकाळभर मी इथंच आहे. खालच्या हॉटेलात मी चुकून सुद्धा गेले नाही–

इन्स्पेक्टर : अस्सं–कुमारी ब्रह्मकुमारी देवी, मागल्या खेपेला तुम्ही माझ्या हातून पकडलं जाता जाता वाचलाय्– आता बघू, कोण तुम्हांला सोडवतं, ते !

[ब्रह्मकुमारी मोठ्यानं किंचाळते. दारातून लोकनाथ येतो.]

लोकनाथ : गुड इव्हनिंग, इन्स्पेक्टर धोंड. तुम्ही इथं काय करताय् ?

ब्रह्मकुमारी : (फुरंगटत) मला अटक करताहेत !

लोकनाथ : इन्स्पेक्टर, तुम्हांला ठाऊकच आहे, पंधरा दिवसांपूर्वी ही माझी मैत्रीण होती—

इन्स्पेक्टर : मग–! तुम्हांलाही धोका दिला ना हिनं ?

लोकनाथ : अंहं– तेव्हा ती माझी नुसती मैत्रीण होती. आता बायको होणार आहे ! आणि तुम्ही तिला अटक करता !

इन्स्पेक्टर : खरं म्हंजे, मी इथं आलो, तो त्या सदू टेकाडेला अटक करायला ! बेटा माझ्या हातात चांगला सापडला होता बेकायदा व्हिस्की पिताना ! एवढ्यात एका नालायक माणसानं दिवे घालवले–

[लोकनाथची प्रतिक्रिया.]

लोकनाथ : तुम्ही सदू टेकाडेला अटक करणार ! अहो, पण तो इथं आहेच कुठं ! एव्हाना सरळ हनीमूनला गेला असेल तो !

इन्स्पेक्टर : छे, हो! आत्ता तर मला खाली भेटला होता!

लोकनाथ : इन्स्पेक्टर, मला वाटतं, कविता करण्याच्या अतिश्रमांनी तुमच्या डोक्या-वर परिणाम झालाय्! तुम्हांला थोडी विश्रांतीची गरज आहे. गुड नाइट, इन्स्पेक्टर!

इन्स्पेक्टर : गुड नाइट! पण तो सदू टेकाडे मला भेटला, तर आज काही तो माझ्या हातून वाचत नाही!

[तिघेही बाहेर जातात. सदू लपल्या जागेतून बाहेर येतो. आळोखे पिळोखे देतो. दाराशी जातो. एवढयात पुन्हा चाहूल लागते, तशी तो धावत परत येतो. आणि पुन्हा दिवाणाखाली लपतो. खिडकीतून, माला आत येते.]

सदू : (दिवाणाखालून बाहेर येत) सोनाली–तू....? मी काय घाबरलो! (मालाला पाहून) आं–? तू कोण?

माला : (मोठ्यानं किंचाळून) चोर–चोर! धावा! धावा!

सदू : किंचाळू नकोस! मी चोर नाही–

माला : चोर नाहीस? मग इथं आमच्या घरात काय करतोयूस?

सदू : तुमच्या घरात?

माला : मग? (गुपित सांगितल्याप्रमाणे) इथला मालक गेलाय् हनीमूनला. तो परत येईपर्यंत आम्हीच त्याचं घर वापरतोय्! मी आणि माझा नवरा गजा–

सदू : खोटं सांगतेयूस! गजाचं लग्नच झालेलं नाही—

माला : झालंय्! आज दुपारीच! पुणतांबेकरांच्या मंगल कार्यालयात!

सदू : म्हंजे? तो आज गावाला जाणार म्हणाला, ते–

माला : खोटंच! आम्ही ही जागा वापरतोय्, असा संशय मालकाला येऊ नये, म्हणून गजानं तशी थाप मारलीय्! एक नंबरचा बावळट आहे गजाचा मालक! पण तू कोण आहेस?

सदू : मी–एक नंबरचा बावळट माणूस–गजाचा मालक!

माला : (एकदम रडू लागते.) ऊंहूं—हूं हूं हूं—

सदू : आता रडून काय होणारेय्?

[ ती अधिकच जोरानं, त्याच्या खांद्यावर डोकं ठेवून रडू लागते. याच वेळी चंद्रिकाबाई खिडकीत येतात व थक्क होऊन हा प्रकार पाहत राहतात. ]

सदू : श्श–हळू रड–तो इस्पेक्टर धोंडा केव्हा गडगडत येईल, याचा नेम नाही—

माला : ( रडत रडत ) साहेब–मला माफ करा—माझ्या म्हाताऱ्या आईसाठी मला हे करावं लागलं– ती कॅन्सरनं अंथरुणाला खिळली आहे ! तिच्या औषधासाठी पैसा नाही, म्हणून मला हे पाप–

[ चंद्रिकाबाई हळूच पायऱ्यांच्या दिशेला सटकतात. ]

सदू : ( तिच्या नाटकामुळे एकदम लक्षात येऊन ) अरेच्च्या ! आत्ता लक्षात आलं ! तू तीच मुलगी– सकाळी लग्नात येऊन गोंधळ उडवणारी ! काढ आधी– तो रत्नहार काढ !

माला : कुठला रत्नहार ?

सदू : उगाच वेड पांघरू नकोस– रत्नहार देतेस, की देऊ पोलिसात ? ( दारावरची बेल वाजते. ) अरे बाप रे, आले वाटतं पोलिस !

[ तत्क्षणी सदू दिवाणाखाली नाहीसा होतो. माला दार उघडते. गजा येतो. ]

माला : बघ, रे, गजा– हे माझ्यावर भलभलते आरोप करतात

[ सदू दिवाणाबाहेर येतो. ]

गजा : सदूशेठ– तुम्ही दिवाणाखाली काय करताय् ?

सदू : तुम्ही दोघं आधी इथं काय करताय् ?

गजा : पण तुम्ही हनीमूनला गेला होता ना ?

सदू : नाही. हिनं भर लग्नात येऊन सोनालीचा रत्नहार चोरला, म्हणून लग्न

पोस्टपोन्ड !

गजा : माला– म्हंजे तू वाळकेश्वरला देवळात गेली होतीस, ती—

सदू : चंद्रिकाविहार मधे ! रत्नहार चोरायला !

गजा : माला– आधी देऊन टाक रत्नहार परत !

माला : पण माझ्या कॅन्सर झालेल्या आईसाठी–

गजा : ( ओरडून ) यात तुझ्या आईचा काही संबंध नाहीये– रत्नहार देऊन टाक—

माला : घ्या—( रत्नहार गळयातून काढून सदूच्या अंगावर फेकते. )

गजा : आम्ही जातो, सदूशेट. आम्ही फूटपाथवर राहू ! पार्कमध्ये राहू !– पण पुन्हा नाही तुम्हांला त्रास देणार !

सदू : आय् ॲम् सॉरी, गजा ! मी स्वतःच्या घरी परत यायला नको होतं ! पण तुम्ही असं करा– आता सिनेमाला जा ! रात्री उशिरा परत याल, तोवर मला पकडून नेलं नसलं, तर मी बेडरूममध्ये असेन. तुम्ही किचनमध्ये झोपा ! कबूल ? हे घे सिनेमाला पैसे !

[ सदू त्याला पैसे काढून देतो, तोवर माला रत्नहार परत काढून घेते. दोघंही जातात. सदू उत्साहानं गाणं गुणगुणत बेडरूममध्ये जातो. क्षणभरानं चंद्रिका. आणि रविकिरण खिडकीत येतात. ]

चंद्रिका. : तुम्ही साक्षीला नव्हता, म्हणून मघा मला हात हलवीत परत जावं लागलं ! नाहीतर मी धडधडीत पाहिलं– बिचारीला आपल्या म्हाताऱ्या आईसाठी हे पाप करावं लागत होतं !

रविकिरण : बाप रे ! पाप करीत होती दोघंजण !

चंद्रिका. : सांगते काय–? चला– आपण आता थेट घरातच शिरलं पाहिजे !

[ दोघं खिडकीतून आत येतात. ]

चंद्रिका. : नीट बघा. दिवाणाखालीसुद्धा असायची ती दोघं

रविकिरण : बघतो–पण चावणार बिवणार नाहीत ना !

चंद्रिका. : रविकिरण—!

[लॅच-कीनं दरवाजा उघडून इन्स्पेक्टर घोंड आत आले आहेत, हे या दोघांच्या गावीही नाही. इन्स्पेक्टर त्यांच्या मागून मागून फिरतात. समोरासमोर येताच–]

इन्स्पेक्टर : मी तुम्हां दोघांनाही अटक करतोय्!

[आवाज ऐकून सदू बाहेर येतो. इन्स्पेक्टरना पाहून मागच्या मागेच किचनमध्ये पळ काढतो.]

रविकिरण : अटक! कशाबद्दल!

इन्स्पेक्टर : घरफोडीबद्दल! आणि पोलिसांवर हल्ला केल्याबद्दल! बाईसाहेब, मघाशी माझ्या तोंडावर मिरी फेकून हातावर तुरी दिल्यात! आता कुठं पळून जाल!

चंद्रिका : पण, इन्स्पेक्टरसाहेब –

इन्स्पेक्टर : चूऽप! (रविकिरणला) शटाप्!

रविकिरण : पण मी शटापच आहे!

[दारावरची बेल वाजते.]

इन्स्पेक्टर : कोणीतरी आलेलं दिसतंय्! त्याची आधी विल्हेवाट लावतो. मग तुमची! तुम्ही दोघंही या खोलीत जा!

[त्यांना बेडरूममध्ये घालवतो. दार बंद करून घेतो. कडी लावतो. भिंतीवर एका खिळ्याला कुलूप अडकवलेलं आहे, ते दाराला लावतो व चावी खिशात टाकतो. दरम्यान पुन्हा बेल वाजते. बेल ऐकून सदू किचनमधून बाहेर येतो. एका बाजूला उभा असलेला इन्स्पेक्टर त्याला दिसत नाही. तो सरळ दार उघडायला जातो.]

इन्स्पेक्टर : अरेच्या– हा घरातच आहे वाटतं!

[कपाटाच्या आड लपून उभा राहतो. लगेच सदू आणि आप्पाराव येतात. ]

आप्पाराव : कोकाट्या– दुपारपासून मुंबईची सगळी पोलीस स्टेशना पालथी घालतंय्! त्या वशाड पडल्या इन्स्पेक्टराक् शोधूच्यासाठी!

सदू : पण कुठला इन्स्पेक्टर हवाय् तुम्हांला?

आप्पाराव : मायझंयाचा नावच माका आठवत नव्हता. इन्पेक्टर दगडे शोधलो, पाथरे शोधलो, फातर्पेकर शोधलो, गारगोटे शोधलो. आणि इतक्या वेळान् आत्ता माका बरोब्बर आठवला नाव!

सदू : काय?

आप्पाराव : इन्स्पेक्टर धोंडसकर!

इन्स्पेक्टर : (कपाटामागून बाहेर येऊन) तुम्ही धोंडसकर शोधा, नाही तर दगडस्कर– मी मात्र तुम्हांलाच शोधतोय्!

आप्पाराव : (आनंदानं) कासोटे– होच तो रांडेचो!

सदू : बाऽपरे– इन्स्पेक्टर धोंड– (पळू लागतो.)

इन्स्पेक्टर : तू कुठं चाललास, सदू टेकाड्या...?

[त्याच्या मागे धावतो. दोघे एकमेकांना चुकवीत खोलीभर धावतात. शेवटी, इन्स्पेक्टर, सदूची गचांडी धरून त्याला एका मोढ्यावर बसवतो. ]

इन्स्पेक्टर : बस इथं. इथनं हाललास, तर बघ. मी तुला पोलिस स्टेशनवर घेऊन जाणारेय्! पण त्याआधी या म्हातारबुवांचा समाचार घेतो–

आप्पाराव : (धाय मोकलून) काय सांगू, हो तुम्हांला तीनशे रुपयांना ते कागद विकले, त्याचा मला भयंकर पश्चात्ताप होतो– देव माझ्यावर कोपणार तुमच्यासारख्या भल्या माणसाला फसवलं, तर! आणा ते कागद, बघू या. मी तुमचे पैसे परत दीतंय्!

इन्स्पेक्टर : नशीब, वेळीच तुम्हांला सद्बुद्धी आठवली! आत्ता घेऊन येतो मी ती शेअर सर्टिफिकेट्स! तुम्ही पैसे तयार ठेवा! आणि मी परत येईपर्यंत तुमच्यापैकी कोणी जागचं हललं, तर बघा–

[जाऊ लागतो...]

आप्पाराव : म्हणे, जागचा हलूचा नाय! वा– मोगलाई का काय? मी हलतंलंय्! (जागच्या जागी हलतात. इन्स्पेक्टर परत येतो. आप्पाराव स्थिर.) नाय–जागचो हलणंय् नाय!

इन्स्पेक्टर : हां! (जातो.)

आप्पाराव : फेंगाडे, तुमच्याकडे एक तीनशे रुपये निघतील?

सदू : तीनशे रुपये? नाही– तसे असतील अडीअडचणीला ठेवलेले! पण पैसे आणायला– इथून हलू कसा? इन्स्पेक्टरनं तर सांगितलंय्–

आप्पाराव : मी बघतंय् दाराकडे. तुम्ही हळूच यावा पैसे घेऊन. हां— जावा...

[सदू हळूच उठतो, आणि एकदम आत पळतो. आप्पाराव दाराकडे पाहत राहतात. एकदम बेडरूमच्या बंद दारावर आतून धक्के ऐकू येऊ लागतात. आप्पाराव चमकतात.]

आप्पाराव : ह्यां काय आणखीन्?

[पुन्हा अधिक जोरानं धक्के. सदू पैसे खिशात ठेवत बाहेर येतो.]

आप्पाराव : कोंगाटे– हंय तसला काय आसा? भायरला भितुरला?

सदू : भायरला भितुरला? हां– म्हणजे भुताटकी वगैरे? नाही– काहीच नाही! पण असं का वाटलं तुम्हांला?

[एकदम दारावर जोरजोरानं धक्के.]

आप्पाराव : मग ह्यां धबाधबा काय जातां?

रविकिरण : (आतून) दार उघडा, दार!

सदू : अरे, हा तर त्या ऑक्टोपसचा आवाज—पण तो इथं माझ्या बेडरूम-मध्ये कसा?

रविकिरण : (आतून) अहो, लवकर दार उघडा! मी खुर्चीवर उभा राहून बोल-

तोयू– आणि माझ्या बरोबरच्या बाई गुदमरून बेशुद्ध पडायला आल्या आहेत!

आप्पाराव : बऱ्या झालां. बाईक् घेऊन वेडरूमात मजा करूक् गेल्लंलंस? असाच व्हया तुका आणि तुझ्या बरोबरच्या त्या सटवाईक्! आसा कोण ही गावभवानी?

रविकिरण : ( आतून ) तुमची बायको! चंद्रिकाबाई!

आप्पाराव : ( धक्का बसून ) अरे, कर्मा! चंडिका–? आणि ह्यां छाकट्यावांगडा? तरी माका पयल्यापासूनच संशय होतो!

रविकिरण : ( आतून ) अहो, दार उघडा ना!

सदू : उघडतो हां– ( प्रयत्न करणार, एवढ्यात लक्षात येऊन ) पण कसं उघडणार? कुलूप आहे! आणि चावी माझ्याजवळ नाही!

रविकिरण : ( आतून ) अरे, देवा! ( एकदम मोठा आवाज. )

सदू : काय झालं, हो!

रविकिरण : ( आतून ) मी उभा होतो, ती खुर्ची मोडली!

सदू : आता कुठं म्हणून शोधायची, या कुलपाची चावी!

इन्स्पेक्टर : ( अचानक येऊन ) चावी शोधायची काही गरज नाही. ती माझ्या खिशात सुरक्षित आहे!

सदू : मग उघडा ना दार!

इन्स्पेक्टर : काही घाई नाही! आधीचं काम आधी! ( आप्पारावाला ) माझे पैसे–

आप्पाराव : ( सदूला ) पैसे द्या. ( इन्स्पेक्टरला ) आधी ट्रान्सफर डीडवर सही करा. मग पैसे. ( इन्स्पेक्टरला सही करून देतो. सदू पैसे देतो. शेअर सर्टिफिकेट्स हातात मिळताच आप्पाराव आनंदाच्या भरात मोठ्यानं ओरडतात... )

इन्स्पेक्टर : ( दचकून ) आं! इतका कसला आनंद झाला तुम्हांला?

आप्पाराव : नाय–कसलो नाय! शिरा मार, त्या शेअरचो आनंद करूचो, का बायलेचा दुःख करूचा, तांच माका कळणाहा नाय! तुम्ही उघडा दार–

[ इन्स्पेक्टर दार उघडतो. दोघंही बाहेर येतात. चंद्रिकाबाई दिवाणावर अंग टाकतात. ]

आप्पाराव : (चंद्रिकाबाईंना) अवदसे....त्या कोवळ्या पोराकू बिघडवतंस !

चंद्रिका. : मी मुळीच कोणाला बिघडवत नाहीये. उलट, हा सदू टेकाडे किती बिघडलाय्, हेच पाहायला मी इथं आले होते!

[सोनाली कपड्यांची पिशवी घेऊन येते.]

सोनाली : (आश्चर्यानं) मॉम–आप्पा–तुम्ही सगळी इथं !

चंद्रिका. : आले, म्हणून बरं झालं! मुद्देमालासकट पकडला मी याला– त्या पोरी-बरोबर!

सोनाली : (सदूला) खरं आहे हे!

सदू : साफ खोटं आहे! मी नुसतं तिला दरडावून तिच्याकडून तुझा रत्नहार काढून घेत होतो!

चंद्रिका. : अस्सं? मग आहे कुठं तो रत्नहार– ?

सदू : हा काय माझ्या खिशातच आहे! (खिसे चाचपतो. रत्नहार सापडत नाही.)

चंद्रिका. : पाहिलंस? मिळाला पुरावा याच्या खोटेपणाचा ?

सोनाली : (रडत) फसवलंस ना मला गोडगोड बोलून ? मी उगाच विश्वास ठेवला तुझ्यावर–

सदू : नाही, ग– खरंच सांगतो– विघ्नेश्शपथ, आत्ता होता तो रत्नहार–माझ्या खिशातच!

सोनाली : काही सांगू नकोस. मला तुझा शब्दसुद्धा ऐकायचा नाही–मला वाटत होतं, की तुझ्यासारखा बावळट माणूस कध्धी कध्धी विश्वासघात करायचा नाही–पण मी फसले—

सदू : (अजूनही आकांतानं शोधीत) रत्नहार! –कुठं गेला हा रत्नहार ?

[लोकनाथ, ब्रह्मकुमारी, गजा आणि माला येतात.]

लोकनाथ : जेव्हा होतो निरुपाय! तेव्हा प्रोफेसर लोकनाथाचे धरा पाय! सदू... (खिशातून काढून देत) हा रत्नहार!

सदू : तुझ्याकडे कसा आला तो ?

लोकनाथ : त्या चोरट्या मुलीचा पत्ता विचारायला मी गजाला गाठणार होतो, तर तो वाटेतच भेटला!

ब्रह्मकुमारी : आणि त्याच्याबरोबर ती मुलगी...

लोकनाथ : आणि मुलीकडे हा रत्नहार...

गजा : माफ करा, सदूशेठ. हिनं जाताजाता रत्नहार परत काढून घेतला!

माला : माझ्या कॅन्सर झालेल्या आईसाठी...

सदू : चूप...! ( सोनालीला रत्नहार दाखवीत ) मिळाला पुरावा ?

चंद्रिका. : ( मालाच्या अंगावर धावून जात ) भवाने, बोल....या माणसाशी तुझं लफडं आहे, की नाही ?

माला : लफडं ? यांच्याशी ? अहो, यांच्याशी लफडं करायला यांच्यांत आहे काय ? जन्मात कधी यांना एक पाकीट मारता यायचं नाही, की अर्धा खिसा कापता यायचा नाही. नाहीतर माझा गजा...

[ त्याला बिलगते. ]

सदू : सोनाली, आता तरी झाला तुझा गैरसमज दूर ?

इन्स्पेक्टर : हे बघा, तुमचे समज गैरसमज काय असतील, ते तसेच राहू देत. आधी तुम्ही सगळे पोलिस स्टेशनवर चला, बघू–

[ सगळ्यांमध्ये एकच गडबड उडते. ]

आप्पाराव : पण, इन्स्पेक्टर घोंड, तिनं एकदा सांगितलं ना, ती या घरात का शिरली, ते ?

इन्स्पेक्टर : कुठल्याही कारणानं शिरू देत; पण पोलिसांच्या तोंडावर मिरी फेकणं हा कायद्याच्या दृष्टीनं गुन्हा आहे.

चंद्रिका. : पण तुम्ही जर मला अटक करायला....

आप्पाराव : चूऽप ! मी बोलतोय् ना त्यांच्याशी ? ( त्यांच्या या नव्या आवेशानं चंद्रिकाबाई चकित होतात. ) आज मी सहा लाखांचा धनी झालोयू. आजपासून घर माझ्या ताब्यात. इन्स्पेक्टर घाटगे, उद्या 'चंद्रिका-विहार' मध्ये येऊन तुमची बक्षिसी घेऊन जा. हां, उद्या कदाचित

बंगल्याचं ‘ चंद्रिकाविहार ’ हे नाव बदलून ते ‘ आप्पाराव विहार ’ केलेलं असेल. पण तिथंच या...आणि आज हिला सोडून द्या...या बकाल ? बईत ही अशीच वागणार. उद्या घेऊन जातंय् मी तिला कोकणात !

चंद्रिका. : कोकणात !

आप्पाराव : मुकाट्यानं येणार, का आताच यांना घेऊन जाऊ दे लॉकअपमध्ये ?

चंद्रिका. : नको, नको ... उद्याच्या उद्या मी बोटीची तिकिटं काढते !

आप्पाराव : तू नको. मी काढतो. आता घरातला कर्ता पुरुष मी आहे ! सदू... तो रत्नहार...

सदू : सोनालीला देऊ ना ?

आप्पाराव : नको ! माझ्याकडे आण. आता मी त्याचं बरोबर काय करायचं, ते करतो. मी आता सहा लाखांचा असामी आहे !

[ सदू रत्नहार त्यांच्याकडे देतो. ]

लोकनाथ : मला वाटतं, माझ्या सगळ्या क्लायंट्सचं समाधान झालं ! गिऱ्हाइकाचं समाधान, हेच आमचं सुख !

इन्स्पेक्टर : माझं समाधान झालेलं नाही.

लोकनाथ : इन्स्पेक्टर, अहो कविता करणं एकदम कसं जमेल ? हळू हळू, हळू हळू...

इन्स्पेक्टर : त्याबद्दल नाही म्हणत मी ! मी या सदू टेकाड्यांना ॲरेस्ट करणार आहे...‘ ग्रीन चिकन ’ मध्ये व्हिस्की ऑर्डर केल्याबद्दल !

सदू : लोकनाथ, हे मला ॲरेस्ट करताहेत...

लोकनाथ : कमाल आहे तुमची, इन्स्पेक्टर ! माझ्या इतक्या जवळच्या मित्राला तुम्ही ॲरेस्ट करणार !

इन्स्पेक्टर : ( असहायपणे ) मग आम्ही करायचं तरी काय ? प्रत्येक वेळी कोणालाही पकडायला गेलं, की तुम्ही म्हणता ... हिला पकडू नको, ही माझी मैत्रीण आहे ! याला पकडू नको, हा माझा मित्र आहे ! अशानं पोलिसांचा धंदा चालायचा कसा ?

लोकनाथ : शांत व्हा ! शांत व्हा, इन्स्पेक्टर धोंड ! तुमच्यासारख्या कविमनाच्या माणसानं थोडा काव्यमय विचार करायला हवा ... हे बघा, ( आप्पाराव

आणि चंद्रिकाबाई यांच्याकडे बोट दाखवून) या दोघांनी एकमेकांना जन्माचं जखडून ठेवलंय्! (गजा–मालाकडे बोट दाखवीत) यांनी आजच एकमेकांना अडकवून टाकलंय्... (सदू सोनालीकडे बोट दाखवीत) या दोघांच्या पायांत लवकरच लग्नाची बेडी पडणार आहे... इतकंच नाही, तर...(स्वतः व ब्रह्मकुमारीचा निर्देश करीत) आम्ही दोघंही जन्मठेपेची शिक्षा भोगायला तयार झालो आहोत. मग मला वाटतं...आता तुम्हांला पकडण्यासारखा–एकटा राहिलेला माणूस एकच आहे....त्याला तुम्ही खुशाल पकडू शकता... (रविकिरणकडे बोट दाखवतो.)

रविकिरण : कोण! मी...!

[पळत सुटतो...त्याच्यामागे इन्स्पेक्टर घोंड पळत असतानाच...]

**प ड दा**

# प रि शि ष्ट

तांत्रिक अडचणींमुळे अंक ३– प्रवेश २ करणे अशक्य असल्यास अंक ३–प्रवेश ३– च्या सुरुवातीचे संवाद खालीलप्रमाणे बदलणे :

सदू : श्श ! किंचाळू नकोस. पोलिस येतील !
ब्रह्मकुमारी : पोलिस....? ( पुन्हा किंचाळते. )
सदू : किंचाळू नको, म्हणतो तर....
ब्रह्मकुमारी : न किंचाळून कसं चालेल ! तू घाबरवतोयस मला !

[ दारावरची बेल वाजते. ]

सदू : पोलिस ! ( दिवाणाखाली लपतो. )
ब्रह्मकुमारी : पोलिस कसे असतील ! लोकनाथ येणार होता आत्ता माझ्या मागून– तोच असेल ! जरासुद्धा धीर निघत नाही त्याला–

[ दार उघडते. लोकनाथ येतो. ]

सदू : पण काय, गऽ ? पोलिसांचं नाव काढल्याबरोबर तुला घाबरायला काय झालं ?
ब्रह्मकुमारी : पोलिसांनी रेड घातली ना खालच्या ' ग्रीन चिकन ' हॉटेलवर ! तिथं मी आणि लोकनाथ बसलो होतो....
सदू : आं ! मी पण तिथंच होतो ! वा ! चहा काय मस्त बनवतात तिथं ! अगदीच वेगळी टेस्ट ! थोडा बर्फ घालतात–
लोकनाथ : वेड्या, तो चहा नव्हता– व्हिस्की होती, व्हिस्की !
सदू : हॅ ! तुला काय म्हणायचंय्—मी व्हिस्की प्यालोय् ! अरे हट्, आपण दारू कधीच पीत नाही ! तो चहा होता, चहा ! व्हिस्की काय, कपातून आणि किटलीतून देतात ?
लोकनाथ : त्या हॉटेलात देतात ! त्यांना दारू विकायचं लायन्सस नाही, म्हणून ते बेकायदा व्हिस्की चहाच्या नावानं विकतात. त्यांच्या नेहमीच्या गिऱ्हाइ-

IRBK-0121825

कांना बरोबर ठाऊक असतं ! अरे, त्यासाठीच तर इन्स्पेक्टर धोंडांनी आज रेड घातली ना त्यांच्यावर !

सदू : म्हंजे मी खरंच व्हिस्की प्यालो ! तरीच मी न घाबरता दोन सणसणीत ठोसे लगावले त्या इन्स्पेक्टरला !

लोकनाथ : म्हणून तर अधिकच खवळलाय् तो ! सबंध बिल्डिंग शोधतोय् रेडमधून पळून गेलेल्यांसाठी !

सदू : तुला काय माहीत ?

लोकनाथ : मला नाही, तर दुसऱ्या कुणाला माहीत असणार ? तू त्याच्यावर चाल करून गेलास, तेव्हा नेमक्या वेळी दिवे विझवून तुझी सुटका कोणी केली, असं वाटतं तुला ?

सदू : तू ?

लोकनाथ : अर्थातच ! गिऱ्हाइकाचं संरक्षण, हेच आमचं कर्तव्य ! (दारावरची बेल वाजते.) सत्य आहे !

सदू : पोलिस—मी लपतो दिवाणाखाली !

लोकनाथ : लप. तू दार उघड, ब्रह्मा. घाबरू नकोस. मी आहे !

[ ब्रह्मकुमारी दार उघडते. दारात इन्स्पेक्टर धोंड. ]

ब्रह्मकुमारी : ( दारातच ) आत येऊ नका. मी बाहेर जायची तयारी करतेय्.

इन्स्पेक्टर : तुम्ही ? मघाशी तर इथं वेगळी मुलगी होती !

ब्रह्मकुमारी : ती मीच होते. सबंध संध्याकाळभर मी इथंच आहे. लालच्या हॉटेलात मी चुकूनसुद्धा गेले नाही—

इन्स्पेक्टर : अस्सं—कुमारी ब्रह्मकुमारी देवी, मागल्या खेपेला तुम्ही माझ्या हातून पकडलं जाता जाता वाचलाय्—आता बघू, कोण तुम्हांला सोडवतं, ते !

[ ब्रह्मकुमारी मोठ्यानं किंचाळते. ]

लोकनाथ : गुड इव्हनिंग, इन्स्पेक्टर धोंड. तुम्ही इथं काय करताय् ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. [illegible] नों. दि. [illegible]
वि. [illegible] क्र. ..................